विज्ञानाचे नवे रूप आणि संकटाचे वेगळे स्वरूप

ओमेगा अपग्रेडेड

अभिषेक ठमके

ई साहित्य प्रतिष्ठान

ArthReads
Explore the Meaning.

ओमेगा अपग्रेडेड

लेखक: अभिषेक ठमके

ArthReads
Explore the Meaning

ओमेगा अपग्रेडेड

या कादंबरीचे ई पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरूपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान लेखक अभिषेक उमके यांचे आभारी आहे.

या पुस्तकाचे ई प्रकाशन व विनामूल्य वितरण करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही या पुस्तकाचे प्रकाशक अर्थ रीडर्स पब्लिकेशन्सचे आभारी आहोत.

या पुस्तकावरील आपले अभिप्राय श्री अभिषेक उमके यांना abhishek.thamke@gmail.com या ई पत्त्यावर कळवावे.

धन्यवाद

सुनील सामंत
टीम ई साहित्य

esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237

ओमेगा अपग्रेडेड

प्रथम आवृत्ती

लेखक: अभिषेक ठमके

प्रूफ-रीडर: संजीवनी सुनील पाटील

मुखपृष्ठ डिझाइन: अभिषेक ठमके

प्रकाशक: अर्थ रीड्स पब्लिकेशन

प्रिंट मीडिया वितरक:

amazonkindle

प्रकाशन वर्ष: २०१९

किंमत: ₹१६०/-

कॉपीराइट सूचना

© २०१९ अभिषेक ठमके. सर्व हक्क राखीव.

हे पुस्तक अर्थ रीड्स पब्लिकेशनद्वारे प्रकाशित करण्यात आले आहे. या पुस्तकातील कोणताही भाग पुनरुत्पादित, संग्रहित किंवा कोणत्याही स्वरूपात किंवा कोणत्याही माध्यमाद्वारे – इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, छायांकन, रेकॉर्डिंग किंवा अन्यथा – लेखक आणि प्रकाशक यांची पूर्व लेखी परवानगी घेतल्याशिवाय प्रसारित केला जाऊ शकत नाही. मात्र, समीक्षणासाठी किंवा टीकात्मक लेखांसाठी वापरल्या जाणाऱ्या थोडक्याच उद्धरणांसाठी परवानगी आहे.

हे एक काल्पनिक साहित्य आहे. या पुस्तकातील व्यक्ती, पात्रे, स्थळे आणि प्रसंग हे लेखकाच्या कल्पनेतून साकारलेले आहेत

किंवा काल्पनिक स्वरूपात वापरण्यात आलेले आहेत. कोणत्याही वास्तविक व्यक्ती, घटना किंवा स्थळाशी साधर्म्य असल्यास ते निव्वळ योगायोग मानले जावे.

परवानगी किंवा चौकशीसाठी कृपया संपर्क साधा:

अभिषेक ठमके
बी/२०२, लक्ष्मीनारायण कृपा सो. लि.,
गोपीनाथ चौक, डोंबिवली (प.),
जिल्हा ठाणे, ४२१ २०२.
महाराष्ट्र, भारत.

प्रस्तुत पुस्तकाचे प्रकाशन भारतात करण्यात आले आहे.

सदर पुस्तक Amazon Kindle Unlimited अंतर्गत मोफत उपलब्ध आहे.

अभिषेक ज्ञानेश्वर ठमके यांची प्रकाशित पुस्तके

कादंबऱ्या

- **आउट ऑफ ऑफिस** (मराठी व इंग्रजी)
- **मॅग्नेट** (मराठी, इंग्रजी, हिंदी, मल्याळम, कन्नड व गुजराती)
- **शून्य क्रमांकाचे गाव** (मराठी)
- **ऑफिस वाईफ** (मराठी)
- **पुन्हा नव्याने सुरुवात** (मराठी)
- **मैत्र जीवांचे** (मराठी)
- **अग्नीपुत्र** (मराठी)
- **गुरुत्वाकर्षणाचा अंत** (मराठी)
- **ओमेगा अपग्रेडेड** (मराठी)
- **टेरर अटॅक ॲट डोंबिवली स्टेशन** (मराठी)

इंग्रजी साहित्य

- **Beyond Boundaries** – लघुकथासंग्रह
- **Out of Office** – कादंबरी
- **Magnet** – कादंबरी
- **Dating with Sia** – कादंबरी

माहितीपर व मार्गदर्शक पुस्तके

- **महाराष्ट्राचे शिल्पकार** – महाराष्ट्रातील युगपुरुषांवरील माहितीपर पुस्तक.
- **Design the Future** – नवोदित ग्राफिक डिझायनर्ससाठी उपयुक्त मार्गदर्शक पुस्तिका.
- **विज्ञानामागील सायन्स** – Quora मराठीवरील विज्ञानविषयक अभिषेक ठमके यांच्या लोकप्रिय लेखांचा संग्रह.

लघुकथासंग्रह

- **Night Walk** (मराठी)

संपादकीय कार्य

- **अर्थ मराठी दिवाळी अंक** – संपादक (२०१३ पासून)
- **आरंभ ई-मॅगझिन** – संपादक (४६ आवृत्त्या)

पुरस्कार व सन्मान

- **महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड्स २०१६** – *पुन्हा नव्याने सुरुवात*
- **बेस्ट प्रॉमिसिंग ऑथर पुरस्कार २०२०** – *पुन्हा नव्याने सुरुवात*
- **MSP राष्ट्रीय पुरस्कार २०२५** – *आउट ऑफ ऑफिस*
- **AISVPS राष्ट्रीय पुरस्कार २०२५** – *आउट ऑफ ऑफिस*
- **साहित्य गौरव पुरस्कार २०२५** – *आउट ऑफ ऑफिस*, *Beyond Boundaries* आणि *Dating with Sia*
- **IDAA बेस्ट दिवाळी अंक पुरस्कार** (२०१४, २०१५, २०२० व २०२४ – चार वेळा विजेते) – *अर्थ मराठी दिवाळी अंक*
- **BookStruck बेस्ट बुक कव्हर पुरस्कार २०१८** – *टेरर अटॅक ॲट डोंबिवली स्टेशन*
- **BookStruck बेस्ट विज्ञानकथा पुस्तक पुरस्कार २०१८** – *अग्नीपुत्र*
- **BookStruck बेस्ट कादंबरी पुरस्कार २०१८** – *पुन्हा नव्याने सुरुवात*

एका कल्पनेचा प्रवास

नमस्कार!

विज्ञानकथा हा साहित्यप्रकार मला एका खास कारणासाठी नेहमीच आकर्षित करतो. इथे चमत्कार, दैवी शक्ती किंवा अशक्य वाटणाऱ्या घटनांपेक्षा मानवी बुद्धिमत्ता, जिज्ञासा आणि संशोधनाच्या सामर्थ्याचा गौरव केला जातो. एखादा शोध मानवजातीच्या कल्याणासाठी असो किंवा विनाशासाठी, त्यामागे असते ती माणसाची विचारशक्ती, कल्पकता आणि नवनिर्मितीची जिद्द. विज्ञानकथांचा खरा आत्मा हाच आहे, आणि याच कारणामुळे हा साहित्यप्रकार मला नेहमीच जवळचा वाटतो.

माझ्या यापूर्वीच्या लेखनात सैनिक, वैज्ञानिक आणि पोलिस अधिकारी हे केंद्रस्थानी होते. **'ओमेगा अपग्रेडेड'** हीदेखील अशाच विश्वातील कथा आहे; मात्र यावेळी केंद्रस्थानी आहे **'ओमेगा'**— मानवासारखा विचार करू शकणारा, निर्णय घेऊ शकणारा आणि भावनांना समजून घेण्याचा प्रयत्न करणारा एक रोबो.

आपल्यापैकी प्रत्येकाकडे एखादे वेगळे कौशल्य असते. कुणी बुद्धिमत्तेने समृद्ध असतो, कुणी कलागुणांनी, तर कुणी शारीरिक सामर्थ्याने. पण अनेकदा आपण याच सामर्थ्याचा उपयोग इतरांना कमी लेखण्यासाठी किंवा त्यांना दुखावण्यासाठी करतो. त्या क्षणी मिळणारे समाधान आपल्यासाठी क्षणिक असते; परंतु

समोरच्या व्यक्तीच्या मनावर त्याचे परिणाम अनेकदा आयुष्यभर टिकून राहतात. काळाचे चक्र सतत फिरत असते. कधी आपण सामर्थ्यवान असतो, तर कधी परिस्थिती आपल्यालाच असहाय्य बनवते. **'ओमेगा अपग्रेडेड'** ही केवळ एका रोबोची कथा नाही; ती बुद्धिमत्ता, सत्ता, भावना आणि त्यांच्या परिणामांची कथा आहे.

या कादंबरीची बीजे २०१३ मध्ये रोवली गेली. कल्पना होती, संशोधन सुरू होते, पण कथा पूर्णत्वाला जात नव्हती. दरम्यान माझ्या इतर कादंबऱ्या प्रकाशित झाल्या, जगाने *Ransomware* सारख्या सायबर हल्ल्यांचा अनुभव घेतला आणि तंत्रज्ञानही झपाट्याने बदलत गेले. अनेकदा असे वाटले की, आपण या विषयावर लिहिण्यास उशीर तर करत नाही ना? पण प्रत्येक वेळी एकच विचार मनात आला—योग्य वेळी पूर्ण झालेली कथा ही घाईघाईत लिहिलेल्या कथेपेक्षा नेहमीच अधिक प्रभावी असते.

म्हणूनच मी या कादंबरीसाठी वेळ घेतला. पुन्हा संशोधन केले, नवे संदर्भ गोळा केले, जाणकारांशी चर्चा केली आणि कथेला नव्याने आकार दिला. अनेक वर्षांच्या या प्रवासानंतर **'ओमेगा अपग्रेडेड'** वाचकांसमोर आली.

या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली, तेव्हा **Artificial Intelligence (AI)** ही संकल्पना सर्वसामान्यांच्या दैनंदिन चर्चेचा भाग नव्हती. ती संशोधन संस्था, विद्यापीठे आणि काही मोजक्या तंत्रज्ञान कंपन्यांपुरती मर्यादित होती. आज

परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. AI आपल्या मोबाईलमध्ये, कार्यालयात, शिक्षणात, आरोग्यसेवेत आणि सर्जनशील क्षेत्रातही पोहोचली आहे. आपण यंत्रांशी संवाद साधतो, त्यांच्याकडून उत्तरे मिळवतो, चित्रे तयार करतो, लेखन करतो आणि निर्णय प्रक्रियेतही त्यांची मदत घेतो. काही वर्षांत तंत्रज्ञानाने घेतलेली ही झेप खरंच आश्चर्यकारक आहे.

या बदलांकडे पाहताना मला अनेकदा 'ओमेगा अपग्रेडेड' ची आठवण होते. ही कादंबरी भविष्याचा दावा करणारी नाही, किंवा AI च्या उत्क्रांतीचा अचूक अंदाज वर्तवणारीही नाही. पण कृत्रिम बुद्धिमत्ता किती प्रगत होऊ शकते, तिला निर्णय घेण्याची क्षमता मिळाल्यास काय घडू शकते, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे—**बुद्धिमत्ता विकसित करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच तिला योग्य मूल्ये देणेही आवश्यक आहे**, हा विचार ही कथा मांडण्याचा प्रयत्न करते.

तंत्रज्ञान कधीच चांगले किंवा वाईट नसते; त्याचा वापर करणाऱ्याचा हेतू त्याचे स्वरूप ठरवत असतो. म्हणूनच या कादंबरीकडे केवळ विज्ञानकथा म्हणून न पाहता, मानवी स्वभाव, संशोधनाची जबाबदारी आणि तंत्रज्ञानाच्या नैतिक मर्यादांवर भाष्य करणारी कथा म्हणूनही पाहावे, अशी माझी इच्छा आहे.

मनोगतात अजूनही बरंच काही सांगता येईल. पण माझा नेहमीच एक विश्वास राहिला आहे—लेखकापेक्षा त्याची कथा

अधिक बोलकी असावी. त्यामुळे आता मी इथेच थांबतो आणि तुम्हाला थेट **'ओमेगा अपग्रेडेड'** च्या विश्वात प्रवेश करण्यासाठी आमंत्रित करतो.

या पुस्तकाच्या माध्यमातून मराठी वाचकांना विज्ञानकथेचा वेगळा अनुभव देण्याचा माझा प्रयत्न आहे. पुस्तक आवडले तर ते इतरांपर्यंत जरूर पोहोचवा. काही उणिवा जाणवल्या, तर त्या मला नक्की कळवा. प्रत्येक प्रतिक्रिया मला अधिक समृद्ध लेखक बनवत राहते.

आणि जर या कादंबरीमुळे एखाद्या वाचकाच्या मनात विज्ञान, संशोधन किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी नव्याने कुतूहल निर्माण झाले, तर तीच माझ्यासाठी सर्वात मोठी पोचपावती असेल.

आपलाच,

अभिषेक ठमके

अनुक्रमणिका

प्रकरण १ - इथन फॉक्स 13

प्रकरण २ - डॉ. अल्बर्ट ताहीर 24

प्रकरण ३ - वर्ल्ड सायन्स एक्स्पो 41

प्रकरण ४ - विघ्वंसाचा प्रारंभ 57

प्रकरण ५ - विघ्वंस 65

प्रकरण ६ - अपग्रेडेशन 83

प्रकरण ७ - संकटाची चाहूल 94

प्रकरण ८ - CAPTCHA 105

प्रकरण ९ - अभिजीतचा संशय 114

प्रकरण १० - सिक्रेट सायन्स 124

प्रकरण ११ - सर्व्हर हॅकिंग 139

प्रकरण १२ - निसटलेलं संकट 151

प्रकरण १३ - ऑपरेशन ओमेगा 162

प्रकरण १४ - ओमेगाचा पहिला संदेश 170

प्रकरण १५ - नव्या जगाची घोषणा 183

प्रकरण १६ - युद्धाची तयारी 201

प्रकरण १७ - मिशन ओमेगा 215

प्रकरण १ - इथन फॉक्स

✦ ✦ ✦

सकाळचे साडेनऊ वाजले होते.

कॅलिफोर्नियातील मेनलो पार्क येथे असलेल्या फेसबुकच्या मुख्यालयाबाहेर नेहमीप्रमाणेच गजबज सुरू होती. जगाच्या कानाकोपऱ्यातून आलेले उमेदवार आपल्या स्वप्नांना कवटाळून मुलाखतीसाठी रांगेत उभे होते. कुणी रेझ्युमेची शेवटची उजळणी करत होतं, तर कुणी मोबाईलवर नोंदी वाचत स्वतःलाच धीर देत होतं. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उत्सुकता होती, थोडीशी भीती होती आणि आयुष्य बदलण्याची एक मूक आशाही होती.

त्याच गर्दीतून एक तरुण शांतपणे रिसेप्शन काऊंटरकडे आला. स्मितहास्य करत त्याने आपली फाईल काऊंटरवर अलगद ठेवली.

"गुड मॉर्निंग."

रिसेप्शनिस्टनेही हसत प्रतिसाद दिला.

"गुड मॉर्निंग, सर."

नेहमीच्या सवयीने तिने फाईल उघडली. पहिल्याच पानावरचं नाव वाचताच तिच्या चेहऱ्यावर ओळखीचं स्मित उमटलं.

"मिस्टर इथन फॉक्स..."

तिने मान वर करत त्याच्याकडे पाहिलं.

"पुन्हा आलात?"

इथनने हलकेच हसत मान डोलावली.

"हो. पण यावेळी नोकरी मिळवण्यासाठी आलो आहे."

"मागच्या वेळीही अगदी हेच म्हणाला होता."

"बरोबर. पण त्या वेळी माझ्याकडे नवीन प्रोग्रामिंग फ्रेमवर्कचा अनुभव नव्हता. यावेळी तोही मिळवून आलो आहे. त्यामुळे आता नकार द्यायचा असेल, तर वेगळं कारण शोधावं लागेल."

रिसेप्शनिस्टच्या चेहऱ्यावर नकळत हसू उमटलं.

"आणि समजा... यावेळीही निवड झाली नाही तर?"

"मग पुन्हा अर्ज करेन."

तो अगदी सहजपणे म्हणाला.

"तुम्ही खरंच हार मानत नाही, नाही का?"

"स्वप्न बदलण्यापेक्षा स्वतःला बदलणं मला जास्त योग्य वाटतं."

क्षणभर दोघांमध्ये शांतता पसरली.

गेल्या काही वर्षांत त्या रिसेप्शनिस्टने हजारो उमेदवार पाहिले होते. पहिल्याच अपयशानंतर अनेकांनी दुसऱ्या कंपनीचा मार्ग धरला होता. काही जण दुसऱ्या प्रयत्नानंतरच निराश झाले होते. पण इथन वेगळा होता. प्रत्येक वेळी नकार स्वीकारून तो शांतपणे परत जायचा आणि काही महिन्यांनी स्वतःला अधिक सक्षम बनवून पुन्हा याच दारात उभा राहायचा.

तिने त्याची फाईल पुन्हा चाळली.

"तुमचं प्रोफाइल मी अनेकदा पाहिलं आहे. तुमच्या पात्रतेवर सिलिकॉन व्हॅलीतील कोणतीही मोठी कंपनी तुम्हाला सहज नोकरी देईल. मग फेसबुकचाच एवढा आग्रह का?"

इथनने काचेच्या भिंतीतून दिसणाऱ्या विस्तीर्ण कॅम्पसकडे एक नजर टाकली.

"ऑफर्स खूप आल्या."

तो शांत स्वरात म्हणाला.

"पण प्रत्येक नोकरी करिअर घडवते... प्रत्येक संस्था स्वप्न पूर्ण करत नाही."

रिसेप्शनिस्ट त्याच्याकडे लक्षपूर्वक ऐकत होती.

"माझ्यासाठी फेसबुक ही फक्त कंपनी नाही. जगभरातील अब्जावधी लोकांना एकमेकांशी जोडण्याची कल्पना आहे. त्या प्रवासाचा छोटासा भाग व्हायचं आहे."

त्याच्या आवाजात दिखाऊपणा नव्हता; होता तो केवळ प्रामाणिक विश्वास.

रिसेप्शनिस्टने मुलाखतीचं टोकन त्याच्या हातात दिलं.

"ऑल द बेस्ट, मिस्टर फॉक्स."

"थँक यू."

"मनापासून इच्छा आहे... यावेळी तुमची प्रतीक्षा संपावी."

इथनने फक्त स्मितहास्य केलं आणि प्रतीक्षागृहातील एका रिकाम्या खुर्चीवर जाऊन बसला.

ही त्याची पहिली मुलाखत नव्हती.

फेसबुकच्या मुख्यालयात नोकरीसाठी अर्ज करण्याची ही त्याची **आठवी वेळ** होती.

मागील सातही मुलाखतींमध्ये तो अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचला होता; मात्र प्रत्येक वेळी एखाद्या किरकोळ कारणामुळे त्याची निवड हुकली होती. एकदा संस्थापकाचं नाव सांगताना तो क्षणभर गोंधळला होता, तर दुसऱ्या वेळी मेसेंजरच्या वैशिष्ट्यांऐवजी इन्स्टाग्रामची माहिती सांगू लागला होता. चुका

मोठ्या नव्हत्या; पण फेसबुकसारख्या संस्थेत कधी कधी छोट्याशा दुर्लक्षाची किंमतही मोठी मोजावी लागते.

सततच्या मुलाखतींमुळे आता रिसेप्शनपासून एच.आर. विभागापर्यंत अनेक कर्मचारी त्याला नावाने ओळखू लागले होते.

तेवढ्यात स्पीकरवरून आवाज घुमला.

"मिस्टर इथन फॉक्स."

इथनने खोल श्वास घेतला. हातातील फाईल नीट पकडत त्याने कोटाची घडी सरळ केली आणि आत्मविश्वासाने मुलाखतीच्या केबिनकडे पावलं टाकली.

दरवाज्यावर हलकासा ठोका देत त्याने आत प्रवेश केला.

"मे आय कम इन?"

"कम इन, मिस्टर फॉक्स."

समोर बसलेल्या एच.आर. अधिकाऱ्याने त्याच्याकडे पाहत स्मितहास्य केलं.

"मला वाटलंच, कम्युनिकेशन विभागात भरती निघाली की तुम्ही हमखास दिसणार."

"ही संधी सोडणं माझ्यासाठी शक्यच नव्हतं."

"या, बसा."

इथन समोरच्या खुर्चीत बसला.

एच.आर.ने त्याचा अद्ययावत अर्ज बारकाईने चाळला.

"तुम्हाला कल्पना आहे का? या कार्यालयात काम करण्यासाठी जगभरातून लाखो अर्ज येतात."

"हो."

इथनने शांतपणे उत्तर दिलं.

"कारण ही फक्त कंपनी नाही... जगाला जोडणाऱ्या सर्वात मोठ्या तंत्रज्ञान संस्थांपैकी एक आहे."

एच.आर.ने समाधानाने मान हलवली.

"मागच्या सात मुलाखतींमध्ये आम्ही जवळजवळ सर्व नियमित प्रश्न विचारले आहेत. त्यामुळे आज थेट विषयाला हात घालूया."

इथनने होकारार्थी मान डोलावली.

"तुमच्या मते कम्युनिकेशन विभागात ही नवीन भरती का सुरू करण्यात आली आहे?"

इथनने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिलं.

"फेसबुकने आपल्या विविध कम्युनिकेशन प्लॅटफॉर्म्सना अधिक सुरक्षित, वेगवान आणि एकसंध करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेषतः मेसेंजर आणि व्हॉट्सॲप यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर तांत्रिक बदल सुरू आहेत. अब्जावधी वापरकर्त्यांचा संवाद कोणत्याही अडथळ्याशिवाय, सुरक्षित आणि अखंड सुरू राहावा, यासाठी स्वतंत्र टीमची आवश्यकता आहे. माझ्या मते ही भरती त्याच प्रकल्पाचा भाग आहे."

एच.आर.ने त्याच्याकडे समाधानाने पाहिलं.

"चांगलं निरीक्षण."

तिने पुढचा प्रश्न विचारला.

"तुमच्यापेक्षा अधिक अनुभवी, अधिक पात्र आणि अनेक विशेष कौशल्य असलेले उमेदवार बाहेर बसले आहेत. मग आम्ही त्यांच्याऐवजी तुमचीच निवड का करावी?"

क्षणभर केबिनमध्ये शांतता पसरली.

इथनच्या चेहऱ्यावर मात्र किंचितही अस्वस्थता नव्हती.

"कारण प्रोग्रामिंग माझ्यासाठी केवळ व्यवसाय नाही."

तो शांत, पण ठाम आवाजात म्हणाला.

"ती माझी विचार करण्याची भाषा आहे. कोडच्या माध्यमातून मी फक्त सॉफ्टवेअर तयार करत नाही, तर लोकांना एकमेकांशी जोडणारी प्रणाली घडवतो. जगाला जोडण्याचं ध्येय असलेल्या संस्थेत काम करण्याची संधी मिळाली, तर माझं सर्वोत्तम योगदान मी इथेच देऊ शकतो."

एच.आर. काही क्षण त्याच्याकडे निरखून पाहत राहिली.

"हा आत्मविश्वास आहे... की अतिआत्मविश्वास?"

इथनच्या ओठांवर हलकंसं स्मित उमटलं.

"गेल्या सात मुलाखतींनी मला आत्मविश्वास शिकवला आहे. अतिआत्मविश्वास असता, तर पहिल्याच नकारानंतर मी इथे पुन्हा आलो नसतो."

त्याच्या उत्तरावर एच.आर.च्या चेहऱ्यावर समाधान स्पष्ट दिसत होतं.

यावेळी तिच्यासमोर बसलेला तरुण केवळ आणखी एक उमेदवार नव्हता. अपयशाला पराभव न समजता, स्वतःला अधिक सक्षम बनवत पुन्हा उभं राहण्याची जिद्द त्याच्यात होती.

मुलाखत संपल्यानंतर अवघ्या आठवडाभरात इथनला अंतिम फेरीसाठी बोलावण्यात आलं.

त्या फेरीतही त्याने आपल्या ज्ञानाची आणि कौशल्याची ठाम छाप पाडली. पुढील महिन्यात फेसबुकच्या कम्युनिकेशन विभागात **असिस्टंट प्रोग्रामर** म्हणून त्याची नियुक्ती झाली.

काम सुरू झाल्यानंतर त्याने स्वतःला सिद्ध करायला फारसा वेळ घेतला नाही. अवघ्या काही महिन्यांत त्याची कायमस्वरूपी नियुक्ती झाली. उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याला बढती मिळाली. कंपनीने त्याच्या राहण्याची व्यवस्था केली, अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि महत्त्वाच्या प्रकल्पांवर काम करण्याची संधीही दिली.

दिवसेंदिवस त्याची जबाबदारी वाढत गेली.

फेसबुक आता त्याच्यासाठी केवळ नोकरीचं ठिकाण उरलं नव्हतं...

ते त्याच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनलं होतं.

———————— ✦ ————————

प्रकरण २ - डॉ. अल्बर्ट ताहीर

✦ ✦ ✦

बर्लिन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीच्या प्रशस्त परिसरात संध्याकाळची शांतता हळूहळू उतरू लागली होती. दिवसभराच्या व्याख्यानांनंतर विद्यार्थी आपल्या गटागटांत चर्चा करत होते. मात्र मुख्य सभागृहाबाहेर काही विद्यार्थी उत्सुकतेने एका व्यक्तीची वाट पाहत उभे होते. काही क्षणांतच सभागृहाचे दार उघडले आणि सुप्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. अल्बर्ट बाहेर आले. त्यांना पाहताच सर्व विद्यार्थी आदराने त्यांच्या दिशेने चालत आले.

"गुड इव्हिनिंग, सर."

विद्यार्थ्यांच्या आवाजात आदर आणि उत्साह दोन्हीही जाणवत होते.

"गुड इव्हिनिंग, ऑल ऑफ यू," डॉ. अल्बर्ट हसत म्हणाले. "बोला, कसं येणं झालं?"

समूहातील एक विद्यार्थी पुढे सरसावला.

"सर, काल सेल्फ-रोबोटिक्सवरचं तुमचं व्याख्यान आम्ही सगळ्यांनी ऐकलं. खरं सांगायचं तर, त्या एका व्याख्यानानंतर या

विषयाकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोनच बदलला. आम्ही पुढील वर्षी सेल्फ-रोबोटिक्स हा विषय निवडायचं ठरवलं आहे. पण त्यासाठी तुमच्या मार्गदर्शनाची गरज आहे."

विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत दिसणारी जिज्ञासा पाहून डॉ. अल्बर्ट यांच्या चेहऱ्यावर समाधान उमटलं. संशोधन क्षेत्रात अनेक वर्षं घालवल्यानंतरही तरुण पिढी विज्ञानाकडे इतक्या उत्साहाने पाहते आहे, ही भावना त्यांच्यासाठी कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठी होती.

"नक्कीच," ते शांतपणे म्हणाले. "विज्ञानाविषयीची उत्सुकता कधीच कमी होऊ देऊ नका. माणूस कितीही मोठा वैज्ञानिक झाला, तरी त्याच्या मनात प्रश्न निर्माण होणं थांबलं, तर त्याचं संशोधनही थांबतं. जिज्ञासा हीच प्रत्येक शोधाची खरी सुरुवात असते."

क्षणभर ते विद्यार्थ्यांकडे पाहत राहिले.

"विज्ञान माणसाला केवळ माहिती देत नाही; ते त्याची विचार करण्याची पद्धत बदलतं. प्रत्येक गोष्टीकडे तर्काने पाहायला शिकवतं. निरीक्षण करण्याची सवय लावते. पुराव्याशिवाय कोणत्याही निष्कर्षावर विश्वास ठेवू नये, ही शिकवण देते. म्हणूनच समाज वैज्ञानिकांकडे विश्वासाने पाहतो. कारण त्यांचा दृष्टिकोन

भावना किंवा अंदाजावर नव्हे, तर सत्य आणि प्रयोगांवर आधारित असतो."

विद्यार्थी अगदी एकाग्रतेने त्यांचं प्रत्येक शब्द ऐकत होते. तेवढ्यात मागच्या रांगेत उभ्या असलेल्या एका विद्यार्थ्याने हात वर केला.

"सर, तुमच्या मते विज्ञानाचं खरं कार्य नेमकं काय आहे?"

डॉ. अल्बर्ट हलकेच हसले. हा प्रश्न त्यांना अनेकदा विचारला गेला होता; पण प्रत्येक वेळी उत्तर देताना त्यांना तितकाच आनंद होत असे.

"तसं पाहिलं, तर विज्ञानाचं कार्य आपलं जीवन अधिक सुलभ करणं आहे. आज आपण वापरत असलेलं प्रत्येक आधुनिक साधन, प्रत्येक तंत्रज्ञान आणि प्रत्येक सुविधा विज्ञानामुळेच शक्य झाली आहे. पण एवढ्यावर विज्ञानाची व्याख्या संपत नाही."

त्यांनी समोरच्या झाडांकडे क्षणभर नजर टाकली.

"विज्ञानाचं सर्वात मोठं ध्येय म्हणजे सृष्टी समजून घेणं. एखादी गोष्ट अस्तित्वात आहे, ही माहिती असणं पुरेसं नसतं; ती तशी का आहे, कशी कार्य करते आणि तिचा इतर गोष्टींशी काय संबंध आहे, हे शोधणं अधिक महत्त्वाचं असतं."

ते पुढे म्हणाले,

"एखादी घटना समजून घेणं म्हणजे तिच्यामागचा नियम समजून घेणं. आपण काय केलं तर काय घडेल, हे समजणं ही फक्त सुरुवात असते. विज्ञान त्यापेक्षा एक पाऊल पुढे जातं. जे घडतं, ते नेमकं कोणत्या सृष्टिनियमानुसार घडतं आणि त्या नियमामागचं तर्कशास्त्र काय आहे, याचा शोध घेणं हेच विज्ञानाचं खरं उद्दिष्ट आहे."

सर्व विद्यार्थ्यांनी होकारार्थी मान डोलावली.

डॉ. अल्बर्ट पुढे म्हणाले, "प्रत्येक वैज्ञानिक एका परंपरेचा भाग असतो. त्याच्याआधी हजारो संशोधकांनी जे ज्ञान मिळवलं आहे, ते त्याचं पूर्वसंचित असतं. त्या ज्ञानाच्या आधारावर तो पुढचं पाऊल टाकत असतो. पण कधी तरी अशी एखादी घटना समोर येते, जिचं स्पष्टीकरण उपलब्ध ज्ञान देऊ शकत नाही. तिथूनच नवीन प्रश्न जन्माला येतात आणि त्या प्रश्नांमुळे विज्ञानाची प्रगती होते."

ते बोलत असतानाच त्यांच्या मनगटावरील स्मार्टवॉचने हलकासा कंपन दिला. त्यांनी सहज स्क्रीनकडे नजर टाकली. आलेला संदेश वाचताच त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव किंचित गंभीर झाले.

"मला वाटतं, आता मी निघायला हवं," ते विद्यार्थ्यांकडे वळत म्हणाले. "एका महत्त्वाच्या कामासाठी मला तातडीने हॅम्बर्गला पोहोचायचं आहे."

"सर," एक विद्यार्थी म्हणाला, "आज तुम्ही आम्हाला दिलेला वेळ आमच्यासाठी खूप मौल्यवान आहे. तुमच्याकडून अजून खूप काही शिकायचं आहे."

डॉ. अल्बर्ट हसले.

"ज्ञानाची खरी किंमत ते इतरांपर्यंत पोहोचवल्यावरच वाढते. अभ्यास करत राहा... प्रश्न विचारत राहा... आणि उत्तर मिळालं, तरी त्यामागे अजून एखादा प्रश्न शोधत राहा."

विद्यार्थ्यांचा निरोप घेऊन ते पार्किंगकडे निघाले.

काही मिनिटांतच त्यांची गाडी जर्मनीच्या वेगवान महामार्गावर धावू लागली. ताशी एकशेतीस किलोमीटरच्या वेगाने ती हॅम्बर्गच्या दिशेने झेपावत होती. खिडकीबाहेरचं निसर्गसौंदर्य क्षणाक्षणाला बदलत होतं; पण डॉ. अल्बर्ट यांच्या मनात मात्र वेगळाच प्रवास सुरू होता.

गेली पंधरा वर्षे...

त्यांनी आयुष्यातील प्रत्येक दिवस एका स्वप्नासाठी समर्पित केला होता.

असं स्वप्न, जे यशस्वी झालं तर रोबोटिक्सच्या इतिहासात नवं पर्व सुरू होऊ शकत होतं.

...

हॅम्बर्ग शहराच्या बाहेरील शांत परिसरात त्यांची भव्य दुमजली प्रयोगशाळा उभी होती. बाहेरून ती इतर कोणत्याही संशोधन संस्थेसारखी दिसत असली, तरी तिच्या भिंतीआड जगापासून लपवलेलं अत्यंत महत्त्वाचं संशोधन सुरू होतं.

प्रयोगशाळेतील प्रत्येक उपकरणाला सरकारी मान्यता होती. काही अतिसंवेदनशील यंत्रांसाठी त्यांना विशेष परवानग्या घ्याव्या लागल्या होत्या. त्या उपकरणांचा प्रत्येक वापर सरकारकडे नोंदवणं बंधनकारक होतं. जसं एखाद्या पोलिस अधिकाऱ्याला आपल्या बंदुकीतील प्रत्येक गोळीचा हिशेब द्यावा लागतो, तसाच प्रत्येक संवेदनशील उपकरणाचा हिशेब डॉ. अल्बर्ट यांनाही द्यावा लागत असे. मात्र त्याबद्दल त्यांची कधीच तक्रार नव्हती. उलट अशा तंत्रज्ञानावर कठोर नियंत्रण असणं आवश्यक आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

प्रयोगशाळेच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ गाडी थांबताच अत्याधुनिक सुरक्षा प्रणाली सक्रिय झाली. विशेष कॅमेऱ्यांनी वाहनाची ओळख पडताळली आणि काही क्षणांतच मुख्य दरवाजा

आपोआप उघडला. गाडी पार्किंग विभागात पोहोचताच दुसरं स्वयंचलित प्रवेशद्वारही उघडलं.

वाहन पार्क करून डॉ. अल्बर्ट मुख्य इमारतीकडे आले. प्रवेशद्वाराजवळील स्कॅनरवर त्यांनी प्रथम डोळ्यांचं, त्यानंतर बोटांच्या ठशांचं प्रमाणीकरण केलं. काही क्षणांच्या शांततेनंतर संपूर्ण प्रयोगशाळेत एक यांत्रिक आवाज घुमला—

"Identity Confirmed."

जड सुरक्षा दरवाजा अलगद उघडला आणि डॉ. अल्बर्ट आत प्रवेश करताच सरळ कंट्रोल रूममध्ये गेले. त्यांच्या दैनंदिन सवयीप्रमाणे त्यांनी सर्वप्रथम प्रयोगशाळेच्या आसपासचा दोन किलोमीटरचा परिसर विशेष रेडिएशन प्रणालीद्वारे तपासला. कोणताही ड्रोन, गुप्त निरीक्षण यंत्रणा किंवा संशयास्पद सिग्नल कार्यरत नसल्याची खात्री झाल्यावरच त्यांनी दीर्घ श्वास घेतला.

आता...

त्यांच्या दिवसातील सर्वात महत्त्वाच्या कामाची सुरुवात होणार होती.

कंट्रोल रूममधील सर्व सुरक्षा यंत्रणा सक्रिय केल्यानंतर डॉ. अल्बर्ट प्रयोगशाळेच्या आतल्या विभागाकडे निघाले. बाहेरून साधी वाटणारी ती इमारत आत मात्र अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज

होती. एका विशिष्ट कन्सोलवर त्यांनी सुरक्षा संकेत प्रविष्ट केले. काही क्षणांत जमिनीवर लेझर किरणांचे जाळे पसरले आणि त्यांच्या समोर लपलेला गुप्त प्रवेशमार्ग उघडला.

तो मार्ग थेट प्रयोगशाळेच्या भूमिगत तळघरात जात होता.

या तळघराचं अस्तित्व जगात मोजक्याच लोकांना माहीत होतं.

डॉ. अल्बर्ट शांतपणे जिना उतरू लागले. खाली पोहोचताच त्यांच्या समोर पसरलेल्या विशाल संशोधन कक्षात असंख्य संगणक, स्वयंचलित यंत्रणा आणि विविध प्रयोग सुरू असल्याचं दृश्य दिसत होतं. गेली पंधरा वर्षे त्यांनी या जागेत स्वतःला अक्षरशः झोकून दिलं होतं.

त्यांच्या आयुष्याचं एकमेव ध्येय होतं—

'सेल्फ ऑपरेटेड रोबो.'

संशोधन क्षेत्रात अनेकदा अशी वेळ येते, जेव्हा एखाद्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन निरीक्षण करणं मानवाला शक्य नसतं. कधी ग्रहांचा अभ्यास, कधी समुद्राच्या अथांग तळाशी उतरणं, तर कधी जीवघेण्या परिस्थितीत संशोधन करणं... अशा वेळी वैज्ञानिकांना तर्क आणि उपलब्ध माहितीवरच अवलंबून राहावं लागतं.

मात्र डॉ. अल्बर्ट यांचा विचार वेगळा होता.

जर मानवाप्रमाणे विचार करणारा, परिस्थितीनुसार निर्णय घेणारा आणि स्वतःच निरीक्षण नोंदवणारा रोबो अशा ठिकाणी पाठवता आला, तर संशोधनाच्या शक्यता कित्येक पटींनी वाढू शकतील, असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्या एका विचारातून पंधरा वर्षांपूर्वी त्यांनी आपल्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला सुरुवात केली होती.

आणि त्या स्वप्नाचं नाव होतं...

ओमेगा.

साडेपाच फूट उंच, एखाद्या तरुणीप्रमाणे देखणी, शांत आणि आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्व असलेली ओमेगा पाहणाऱ्या कोणालाही ती रोबो आहे, यावर विश्वास बसणं कठीण होतं. तिच्या चेहऱ्यावरील हावभाव, डोळ्यांतील भावना, चालण्याची लकब, बोलण्याची शैली... प्रत्येक गोष्ट इतक्या बारकाईने विकसित करण्यात आली होती की ती सामान्य मानवापासून वेगळी ओळखणं जवळजवळ अशक्य होतं.

मात्र तिचं खरं वैशिष्ट्य तिच्या रूपात नव्हतं.

ते होतं तिच्या विचारक्षमतेत.

गरजेनुसार निर्णय घेणं, परिस्थितीचं विश्लेषण करणं, नवीन निष्कर्ष काढणं आणि संशोधनात स्वतःच्या सूचना मांडणं—

ही तिची वैशिष्ट्यं होती. मनुष्याला अवगत असलेल्या जवळजवळ सर्व भाषा, शिष्टाचार आणि विविध कलांचं ज्ञान तिच्या स्मृतीत संग्रहित करण्यात आलं होतं. प्रयोगशाळेतील इतर सर्व रोबो, स्वयंचलित यंत्रणा आणि संशोधन प्रकल्पांवर देखरेख ठेवण्याची जबाबदारीही ती एकहाती सांभाळत होती. वेळोवेळी त्यांचे अहवाल तयार करून ती डॉ. अल्बर्ट यांच्यापर्यंत पोहोचवत असे.

डॉ. अल्बर्ट संशोधन कक्षात पोहोचताच ओमेगा त्यांच्या दिशेने वळली.

"गुड मॉर्निंग, डॉक्टर. आज तुमच्या चेहऱ्यावर नेहमीपेक्षा अधिक प्रसन्न भाव दिसत आहेत. नक्कीच एखादी आनंदाची बातमी असावी."

तिच्या स्वागताने डॉ. अल्बर्ट हसले.

"अरे वा... आता तुला चेहऱ्यावरील भावसुद्धा इतक्या अचूकपणे ओळखता येऊ लागलेत."

"धन्यवाद, डॉक्टर. पण त्याचं संपूर्ण श्रेय तुम्हालाच जातं."

असं म्हणत तिने आपल्या हातातील काही अहवाल त्यांच्या हाती दिले.

डॉ. अल्बर्ट यांनी ते अहवाल हातात घेतले; मात्र त्यांचं लक्ष त्यांच्याकडे नव्हतं.

"रिपोर्ट्स नंतर पाहू. आधी तुझं निरीक्षण सांग."

ओमेगा काही क्षण विचारात पडल्यासारखी शांत उभी राहिली.

"माझ्या निरीक्षणानुसार आता आपल्या संशोधनाची माहिती जगासमोर जाहीर करण्याची वेळ आली आहे. योग्य वेळी योग्य लोकांपर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचलं, तर त्याचा मानवजातीच्या कल्याणासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊ शकतो."

डॉ. अल्बर्ट तिचं बोलणं ऐकत होते; पण त्याच वेळी त्यांच्या लक्षात एक वेगळीच गोष्ट आली.

आज तिच्या आवाजात काहीतरी बदल जाणवत होता.

ते हळूहळू तिच्याकडे वळले.

ओमेगाच्या चेहऱ्यावरचे भाव नेहमीसारखे नव्हते.

तिच्या डोळ्यांत स्पष्ट भीती होती.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे तयार झालेल्या एका रोबोच्या चेहऱ्यावर...

भीती?

क्षणभर डॉ. अल्बर्ट गोंधळले.

"ओमेगा..."

ते तिच्याकडे निरखून पाहत म्हणाले,

"तुझ्या चेहऱ्यावर मला भीती दिसते आहे. आणि तुझ्या आवाजातही बदल जाणवतोय. नेमकं काय झालं आहे?"

"तिला कशाला विचारता?"

अचानक मागून आलेल्या अनोळखी आवाजाने दोघेही दचकले.

"प्रश्न आम्हाला विचारा."

प्रयोगशाळेच्या मुख्य प्रवेशद्वारामागून चार धडधाकट तरुण बाहेर आले. त्यांच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास आणि हातातील आधुनिक शस्त्रं पाहताच परिस्थिती किती गंभीर आहे, याची कल्पना डॉ. अल्बर्ट यांना आली.

क्षणभर त्यांना स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसला नाही.

इतक्या अभेद्य सुरक्षा व्यवस्थेतून हे लोक आत कसे आले?

"तुम्ही कोण?" त्यांनी शांत राहण्याचा प्रयत्न करत विचारलं. "आणि माझ्या प्रयोगशाळेत कसे शिरलात?"

त्यांपैकी एकजण हलकंसं हसला.

"घाबरू नका, डॉक्टर. आम्ही जगात कुठेही जाऊ शकतो. आम्हाला पासपोर्टची गरज लागत नाही... आणि व्हिसाची तर अजिबात नाही."

"तुम्हाला काय हवं आहे?"

"तुम्ही."

डॉ. अल्बर्ट यांच्या कपाळावर आठ्या उमटल्या.

"कोण आहात तुम्ही?"

"आम्ही डार्क सोसायटीकडून आलो आहोत."

हे नाव ऐकताच त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले.

डार्क सोसायटी...

जगातील सर्वात धोकादायक आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांपैकी एक.

"म्हणजे... तीच आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना?"

"आम्हाला दहशतवादी म्हणू नका."

तो थंड आवाजात म्हणाला.

"आमचा लढा श्रीमंत राष्ट्रांविरुद्ध आहे."

"आणि त्यासाठी तुम्हाला माझ्याकडून काय हवं आहे?"

"विशेष उपग्रहांचे सुरक्षा कोड हॅक करायचे आहेत."

डॉ. अल्बर्ट यांनी कोणताही विलंब न करता उत्तर दिलं.

"मी नकार दिला तर?"

त्या माणसाच्या चेहऱ्यावर एक क्रूर हास्य उमटलं.

"मग..."

त्याने बंदुकीची नळी ओमेगाच्या दिशेने वळवली.

"...तुमच्या या लाडक्या सेक्रेटरीला आम्ही ठार मारू."

"काय म्हणालात?"

डॉ. अल्बर्ट यांच्या आवाजात रागापेक्षा वेगळाच भाव होता.

"तुम्ही आमचं काम केलं नाही, तर ती जिवंत राहणार नाही."

त्या एका वाक्याने प्रयोगशाळेत क्षणभर शांतता पसरली.

पण त्या शांततेच्या आड डॉ. अल्बर्ट यांच्या मनात वेगळंच वादळ उसळलं होतं.

हे लोक... ओमेगाला रोबो समजतच नव्हते.

त्यांच्या दृष्टीने ती फक्त त्यांची सेक्रेटरी होती.

पंधरा वर्षांच्या संशोधनाचं सर्वात मोठं यश अजूनही सुरक्षित होतं.

चेहऱ्यावरचं समाधान लपवत त्यांनी शांतपणे उत्तर दिलं,

"ओमेगाला काही करू नका. ती माझी दत्तक मुलगी आहे. माझ्या प्रत्येक संशोधनात ती मला मदत करते. तिच्याशिवाय मी तुमचं काम करू शकणार नाही."

"मग तिलाही सोबत घ्या."

डॉ. अल्बर्ट काही क्षण विचारात पडल्यासारखे भासले.

"तुम्ही सांगाल ते काम मी करेन. पण मला एक आठवड्याची मुदत द्या. चार दिवसांनी वर्ल्ड सायन्स एक्स्पोमध्ये मला एक महत्त्वाचा प्रकल्प सादर करायचा आहे. जर्मन स्पेस सेंटर, इस्रो, नासा आणि जगातील अनेक संशोधन संस्था तिथे उपस्थित असतील. तो प्रकल्प पूर्ण झाला, तर तुमचं काम करणं माझ्यासाठी शक्य होईल. अन्यथा तुम्हाला मदत करणं माझ्याही हातात राहणार नाही."

डार्क सोसायटीच्या सदस्यांनी एकमेकांकडे नजर टाकली.

त्यांना घाई नव्हती.

ते एका मोठ्या कटाची तयारी करत होते आणि त्यासाठी योग्य वेळेची वाट पाहणं त्यांच्यासाठी नवीन नव्हतं.

शेवटी त्यांनी डॉक्टरांना एक आठवड्याची मुदत दिली; मात्र त्याचबरोबर त्यांच्या दोन माणसांना सतत डॉ. अल्बर्ट यांच्यावर नजर ठेवण्याचे आदेशही दिले.

ते निघून गेल्यानंतर प्रयोगशाळेत पुन्हा शांतता पसरली.

डॉ. अल्बर्ट मात्र अस्वस्थ झाले होते.

त्यांना आपल्या संशोधनाची चिंता नव्हती...

त्यांना काळजी होती ती ओमेगाची.

ती विध्वंसासाठी तयार केलेली यंत्रमानव नव्हती.

मानवजातीच्या प्रगतीसाठी निर्माण केलेली एक विलक्षण बुद्धिमत्ता होती.

म्हणूनच दहशतवाद्यांसमोर उभं राहूनही तिने प्रतिकार केला नव्हता. तिच्या प्रणालीत हिंसेचा कोणताही प्रोग्रामच नव्हता. उलट त्या क्रूर माणसांना पाहून तिच्या कृत्रिम भावनांमध्ये प्रथमच भीती निर्माण झाली होती.

चार दिवसांनंतर वर्ल्ड सायन्स एक्स्पोमध्ये ते ओमेगाला जगासमोर सादर करणार होते.

पंधरा वर्षांच्या संशोधनाचा तो सर्वोच्च क्षण ठरणार होता.

पण आता...

जर त्यांनी ओमेगाची खरी ओळख जगासमोर उघड केली, तर ती डार्क सोसायटीसारख्या संघटनांच्या लक्ष्यावर येणार होती.

डॉ. अल्बर्ट विचारात हरवले असतानाच ओमेगा शांतपणे त्यांच्या जवळ आली.

"डॉक्टर... निराश होऊ नका."

तिच्या आवाजात नेहमीचा स्थिरपणा परत आला होता.

"आपल्याला पुन्हा संधी मिळेल. पण सध्या योग्य निर्णय घेणं अधिक महत्त्वाचं आहे. कृपया माझ्यासाठी कोणताही चुकीचा निर्णय घेऊ नका."

डॉ. अल्बर्ट काही क्षण तिच्याकडे पाहत राहिले.

नंतर त्यांनी हळूच मान डोलावली.

त्या क्षणी त्यांनी एक कठीण निर्णय घेतला...

वर्ल्ड सायन्स एक्स्पोमध्ये ओमेगाला जगासमोर न आणण्याचा.

प्रकरण ३ - वर्ल्ड सायन्स एक्स्पो

✦ ✦ ✦

एक्स्पोला आता अवघे चार दिवस उरले होते.

वर्ल्ड सायन्स एक्स्पोमध्ये प्रेझेंटेशन करण्याची संधी मिळणं हे जगातील प्रत्येक संशोधकाचं स्वप्न असायचं. ही संधी मिळवण्यासाठी अनेकांना वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागे. हजारो संशोधन प्रस्तावांमधून मोजक्याच प्रोजेक्ट्सची निवड होत असे आणि त्यानंतरही प्रत्येकाला स्वतंत्र प्रेझेंटेशन स्लॉट मिळेल याची खात्री नसायची. त्यामुळे या व्यासपीठावर उभं राहणं म्हणजे केवळ स्वतःचं संशोधन मांडणं नव्हतं, तर संपूर्ण वैज्ञानिक विश्वाकडून मिळालेली मान्यता होती.

डॉ. अल्बर्ट ताहीर यांनीही या दिवसासाठी अनेक वर्षे वाट पाहिली होती. जर्मन सरकारला त्यांच्या संशोधनाची कल्पना होती, पण त्यांनी नेमकं काय तयार केलं आहे, हे कुणालाच माहीत नव्हतं. अनेक वेळा सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांना प्रोजेक्ट आधी पाहण्याची विनंती केली होती. गोपनीय बैठकीत प्रेझेंटेशन करण्याचाही प्रस्ताव देण्यात आला होता. मात्र प्रत्येक वेळी त्यांनी नम्रपणे नकार दिला

होता. त्यांचा एकच आग्रह होता—ओमेगाचं पहिलं प्रेझेंटेशन जगासमोर होईल ते फक्त वर्ल्ड सायन्स एक्स्पोमध्ये.

बराच पत्रव्यवहार, अनेक बैठका आणि विशेष शिफारशींनंतर जर्मन सरकारने त्यांना पंचेचाळीस मिनिटांचा स्वतंत्र स्लॉट मिळवून दिला होता. आयोजकांनी विशेष अधिकार वापरून हा निर्णय घेतला होता. त्यामुळे यंदाच्या एक्स्पोमध्ये डॉ. अल्बर्ट यांच्या प्रेझेंटेशनबद्दल मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. अनेक देशांतील संशोधकांना जाणून घ्यायचं होतं की, इतक्या गुप्ततेत तयार झालेलं संशोधन नेमकं काय आहे.

पण परिस्थिती एका क्षणात बदलली.

डार्क सोसायटीच्या धमकीनंतर डॉ. अल्बर्ट यांच्यासमोर कोणताही पर्याय उरला नव्हता. एका बाजूला ओमेगा होती, तर दुसऱ्या बाजूला असंख्य निरपराध लोकांचे जीव. त्यांनी बराच वेळ प्रयोगशाळेत एकट्याने विचार केला. शेवटी मनावर दगड ठेवून त्यांनी World Science Expo आणि जर्मन सरकारला Email पाठवला. वैयक्तिक कारणामुळे आपण नियोजित प्रेझेंटेशन करू शकत नसल्याचं त्यांनी अधिकृतपणे कळवलं.

डॉ. अल्बर्ट यांच्या अचानक घेतलेल्या निर्णयामुळे वर्ल्ड सायन्स एक्स्पोच्या आयोजकांमध्ये खळबळ उडाली. विशेष

शिफारशीवर मिळालेला स्लॉट शेवटच्या क्षणी रिकामा झाल्यामुळे आयोजकांनी जर्मन सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली. सरकारी अधिकाऱ्यांना ती नाराजी निमूटपणे ऐकून घ्यावी लागली. त्या बैठकीत झालेल्या अपमानाची सल मात्र त्यांच्या मनात कायम राहिली.

बैठक संपताच एका वरिष्ठ अधिकाऱ्याने डॉ. अल्बर्ट यांना फोन केला.

"डॉ. अल्बर्ट ताहीर?"

"हो. बोला."

"सर, मी जर्मनी सरकारच्या बर्लिन मुख्य कार्यालयातून बोलतो आहे. तुम्ही तुमचा प्रेझेंटेशन स्लॉट रद्द केला आहे?"

"हो. काही वैयक्तिक कारणांमुळे मला तो निर्णय घ्यावा लागला. विश्वास ठेवा, या निर्णयाचा सर्वात जास्त त्रास मलाच होत आहे. गेली पंधरा वर्षे मी या दिवसाची वाट पाहत होतो. पण आज परिस्थितीमुळे मला माघार घ्यावी लागत आहे."

"सर, आम्ही असताना तुम्ही पूर्णपणे माघार कशी घेऊ शकता?"

"तुम्ही माझी अडचण समजू शकणार नाही. ही गोष्ट पूर्णपणे वैयक्तिक आहे."

"आमची एक विनंती आहे."

"बोला."

"तुम्ही तुमचा प्रोजेक्ट सादर करू शकत नसाल, तर हरकत नाही. पण सायन्सवर भाषण द्या. वर्ल्ड सायन्स एक्स्पोच्या नियमांनुसार त्याची परवानगी आहे. तुमच्यासारख्या संशोधकाचं अनुभवकथन हजारो विद्यार्थ्यांसाठी आणि वैज्ञानिकांसाठी प्रेरणादायी ठरेल."

डॉ. अल्बर्ट काही क्षण विचारात पडले. संशोधन सादर करण्याची संधी निसटली होती, पण सायन्ससाठी बोलण्याची संधी अजूनही त्यांच्या हातात होती.

"ही कल्पना चांगली आहे," ते शांतपणे म्हणाले. "प्रोजेक्ट सादर करता येणार नाही, पण सायन्सवर भाषण मी नक्की देऊ शकतो."

"उत्तम, सर. मग काहीही कॅन्सल करू नका. आम्ही तुमच्या भाषणाची वाट पाहत आहोत."

फोन संपला.

डॉ. अल्बर्ट यांना वाटलं, निदान आपल्या देशाची प्रतिष्ठा तरी आपण राखू शकणार आहोत. त्यांनी लगेचच भाषणाच्या तयारीला सुरुवात केली. पुढील तीन दिवस त्यांनी ओमेगाच्या

मदतीने प्रत्येक मुद्दा काळजीपूर्वक तयार केला. भविष्यात योग्य वेळ आल्यावर ओमेगाला जगासमोर आणताना हेच भाषण उपयोगी पडेल, असा विचार त्यांच्या मनात सतत येत होता.

मात्र त्यांना एक गोष्ट माहीत नव्हती.

त्यांचा स्लॉट आधीच दुसऱ्या संशोधकाला देण्यात आला होता.

फोनवर दिलेलं आश्वासन केवळ औपचारिक होतं.

सरकारी अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक त्यांना याची कल्पना दिली नव्हती. एक्स्पोच्या दिवशी ते तिथे पोहोचल्यानंतरच त्यांना सत्य समजावं, एवढाच त्यामागचा उद्देश होता. बैठकीत झालेल्या अपमानाचा सूड ते अशा प्रकारे घेणार होते.

इकडे डॉ. अल्बर्ट मात्र पूर्ण विश्वासाने भाषणाची तयारी करत होते. डार्क सोसायटीचे दोन्ही सदस्य त्यांच्यावर सतत लक्ष ठेवून होते. त्यांना ओमेगाबद्दल काहीच माहिती नव्हती. त्यांच्या दृष्टीने डॉ. अल्बर्ट हे केवळ एक नामांकित वैज्ञानिक होते. गेल्या काही दिवसांत डॉक्टरांचा साधेपणा, कामावरील निष्ठा आणि त्यांना मिळणारा आदर पाहून त्या दोघांच्याही मनात त्यांच्याविषयी नकळत आदर निर्माण झाला होता. त्यांचं काम पूर्ण झाल्यावर डॉ.

अल्बर्ट यांना कोणतीही इजा न करता सन्मानाने सोडून द्यायचं, असा निर्णय त्यांनी आधीच घेतला होता.

अखेर... वर्ल्ड सायन्स एक्स्पोचा दिवस उजाडला.

'त्या व्यासपीठावर एकदा तरी उभं राहावं आणि संपूर्ण जगाने आपल्या संशोधनाची दखल घ्यावी...'

वर्ल्ड सायन्स एक्स्पोमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक संशोधकाच्या मनात ही इच्छा असायची.

जपान, भारत, अमेरिका, चीन, उत्तर कोरिया आणि दक्षिण आफ्रिका या देशांनी संयुक्तपणे या एक्स्पोची सुरुवात केली होती. पहिल्याच वर्षापासून त्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आणि काही वर्षांतच तो जगातील सर्वात प्रतिष्ठेचा सायन्स एक्स्पो म्हणून ओळखला जाऊ लागला. यंदाचं हे त्याचं पंधरावं वर्ष होतं. प्रत्येक वर्षी वाढणारी लोकप्रियता यंदा नव्या शिखरावर पोहोचली होती. प्रथमच फेसबुक आणि युट्यूबवर संपूर्ण कार्यक्रमाचं Live Streaming आयोजित करण्यात आलं होतं, तर इन्स्टाग्राम आणि ट्विटरवर #WorldSciExpo हा हॅशटॅग जगभर ट्रेंड होत होता.

यंदाच्या एक्स्पोमध्ये नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांपासून ते नवोदित संशोधकांपर्यंत सहाशेहून अधिक प्रोजेक्ट्सचं प्रदर्शन भरलं होतं. जगभरातील मोठमोठे उद्योगसमूह नव्या तंत्रज्ञानात

गुंतवणूक करण्यासाठी तिथे उपस्थित होते. अनेक संरक्षण संस्था, अंतराळ संशोधन केंद्रं, विद्यापीठं आणि तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्येक प्रोजेक्ट बारकाईने पाहत होते. विद्यार्थ्यांसाठी विशेष सायन्स टूर आयोजित करण्यात आल्या होत्या. इतकंच नाही, तर जगभरातील अनेक ट्रॅव्हल कंपन्यांनी 'वर्ल्ड सायन्स एक्स्पो'साठी स्वतंत्र टूर पॅकेजेस जाहीर केली होती. सनबर्न किंवा Tomorrowland जसा संगीतप्रेमींना आकर्षित करतो, तसाच हा एक्स्पो विज्ञानप्रेमींसाठी एक उत्सव बनला होता. फरक एवढाच, की इथे मनोरंजनाऐवजी भविष्यातलं विज्ञान आकार घेत होतं.

नासा, इस्रो आणि ॲपलच्या प्रमुखांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ दिमाखात पार पडला. जगभरातील नामवंत संशोधक, संरक्षण अधिकारी, अंतराळ तज्ज्ञ आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवर एका छताखाली जमले होते. वातावरणात एक वेगळीच ऊर्जा होती. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उत्सुकता होती—आज कोणता शोध जगाचं भविष्य बदलणार होता?

डॉ. अल्बर्टही त्या गर्दीत प्रवेश करत होते.

त्यांच्यासोबत डार्क सोसायटीचे ते दोघे सदस्य शांतपणे चालत होते. बाहेरून ते डॉक्टरांचे सहकारी असल्यासारखे दिसत होते; पण प्रत्यक्षात ते त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवून होते.

ओमेगाला मात्र डॉक्टरांनी प्रयोगशाळेतच ठेवलं होतं. प्रवेशद्वारावरील सुरक्षा तपासणीत एखाद्या उपकरणाने तिची खरी ओळख उघड केली, तर परिस्थिती हाताबाहेर जाईल, याची त्यांना कल्पना होती. ओमेगानेदेखील तो धोका पत्करण्यास नकार दिला होता.

विशेष निमंत्रितांसाठी स्वतंत्र नोंदणी विभाग तयार करण्यात आला होता. संशोधक, लष्करी अधिकारी, अंतराळ संस्था, तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विविध देशांच्या प्रतिनिधींसाठी तिथे स्वतंत्र व्यवस्था होती. प्रत्येक पाहुण्याला आपला आयडी आणि स्वतः निवडलेला पासवर्ड वापरून उपस्थिती नोंदवावी लागत होती. कार्यक्रम संपल्यानंतर त्याच खात्यावरून अभिप्रायही नोंदवण्याची व्यवस्था होती.

डॉ. अल्बर्ट यांनी आपला आयडी आणि पासवर्ड टाइप केला.

क्षणभरात स्क्रीनवर एक संदेश दिसला.

'This Account is Already Logged In.'

ते काही क्षण स्क्रीनकडे पाहत राहिले.

"हे कसं शक्य आहे?" त्यांच्या तोंडून नकळत शब्द बाहेर पडले.

सिस्टम तपासल्यानंतर त्यांना समजलं की त्यांचं अकाऊंट हॉलमधील २८४ क्रमांकाच्या कॉम्प्युटरवर Login झालं आहे.

क्षणाचाही विलंब न करता ते त्या कॉम्प्युटरकडे गेले.

समोर बसलेला तरुण आपल्या माहितीची नोंद करण्यात मग्न होता.

"गुड मॉर्निंग," डॉ. अल्बर्ट शांतपणे म्हणाले.

त्या तरुणानेही हसून प्रतिसाद दिला.

"गुड मॉर्निंग."

"माफ करा, पण तुम्ही बहुतेक माझा आयडी वापरत आहात."

तो तरुण क्षणभर गोंधळला.

"नाही... मी माझाच आयडी टाकला आहे. पासवर्डदेखील माझाच आहे."

"एकदा पुन्हा तपासून बघाल का?"

त्याने पुन्हा स्क्रीनकडे पाहिलं.

काही सेकंदांत त्याच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वास नाहीसा झाला.

"अरे! खरंच... हे अकाऊंट तुमचंच आहे. मला माफ करा."

तो लगेच खुर्चीवरून उठला.

"काही हरकत नाही," डॉ. अल्बर्ट हसत म्हणाले. "तुमचा आयडी दाखवाल?"

दोघांनी आयडी तपासले.

त्या तरुणाचा आयडी होता — ८०६८४२८८.

डॉ. अल्बर्ट यांचा आयडी होता — ८०६४८२८८.

केवळ दोन अंकांची अदलाबदल झाली होती.

दोघेही एकमेकांकडे पाहून हसले.

"आयडी चुकीचा टाइप झाला, हे समजलं," तो तरुण म्हणाला, "पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपला पासवर्डही एकच आहे."

डॉ. अल्बर्ट यांनाही त्याचं आश्चर्य वाटलं.

"बाय द वे... मी अभिजीत शास्त्री. भारतातून आलो आहे. रॉमध्ये टेक्निकल हेड म्हणून काम करतो."

"डॉ. अल्बर्ट ताहीर," त्यांनी हस्तांदोलन करत उत्तर दिलं. "बर्लिन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये सेल्फ रोबोटिक्स शिकवतो. आज माझं भाषण आहे. वेळ मिळाला तर जरूर ऐका."

"नक्की," अभिजीत हसत म्हणाला. "पहिल्याच भेटीत वक्त्यासोबत ओळख झाली, हे माझं भाग्यच म्हणायचं."

दोघांनी आपापली माहिती पूर्ण केली आणि गप्पा मारत बाहेर आले. प्रवेशद्वाराजवळ डार्क सोसायटीचे दोन्ही सदस्य शांतपणे उभे होते.

"हे अभिजीत शास्त्री," डॉ. अल्बर्ट म्हणाले. "भारतातून आले आहेत."

मग अभिजीतकडे वळून त्यांनी सहजपणे सांगितलं,

"आणि हे दोघे माझे सहकारी आहेत."

अभिजीतने दोघांकडे पाहिलं.

त्यांनीही हलकंसं स्मित करत अभिवादन केलं.

क्षणभराची ती ओळख संपली; पण अभिजीतच्या निरीक्षक नजरेने त्या दोघांचा बारकाईने अभ्यास केला होता. त्यांच्या चेहऱ्यावर काहीतरी विचित्र स्थिरता होती. त्यांचं वागणं, उभं राहणं आणि आजूबाजूवर ठेवलेलं लक्ष पाहून त्याला ते सामान्य संशोधक वाटले नाहीत. क्षणभर त्याच्या मनात संशय चमकून गेला; पण ते डॉ. अल्बर्ट यांच्यासोबत होते. जागतिक दर्जाचे वैज्ञानिक आणि एक्स्पोमधील अधिकृत वक्ते असलेल्या व्यक्तीसोबत आलेल्या लोकांवर संशय घेण्याचं त्याला कारणही नव्हतं.

त्याने तो विचार मनातून काढून टाकला.

दुसरीकडे डॉ. अल्बर्ट यांच्या मनात वेगळीच धडधड सुरू होती.

आज ते ओमेगा सादर करू शकत नव्हते, पण या व्यासपीठावरून बोलण्याची संधी त्यांना मिळणार होती. त्यांच्या मनात एक विचार पुन्हा पुन्हा डोकावू लागला.

'भाषणात ओमेगाचा उल्लेख करावा का?'

पुढच्याच क्षणी त्यांनी तो विचार बाजूला सारला.

अजून वेळ आलेली नव्हती.

त्या दिवशी सातव्या क्रमांकावर डॉ. अल्बर्ट यांचं भाषण होणार होतं. पहिल्या पाच मान्यवरांची भाषणं पूर्ण झाली होती. सहाव्या वक्त्याचं प्रेझेंटेशन सुरू असताना डॉ. अल्बर्ट स्टेजच्या दिशेने चालू लागले. आता फक्त एका वक्त्यानंतर त्यांचा क्रमांक होता. त्यांनी हातातलं आमंत्रणपत्र पुन्हा एकदा पाहिलं आणि आत्मविश्वासाने पुढे पाऊल टाकलं.

स्टेजपासून काही अंतरावर पोहोचताच दोन सुरक्षा रक्षकांनी त्यांना थांबवलं.

"सर, पुढे जाण्यास परवानगी नाही."

"मी डॉ. अल्बर्ट ताहीर."

असं म्हणत त्यांनी पुढे जाण्याचा प्रयत्न केला.

त्याच वेळी काळ्या रंगाचा ब्लेझर परिधान केलेला, डोळ्यांवर काळा गॉगल आणि कानात वायरलेस इअरपीस घातलेला वरिष्ठ सुरक्षा अधिकारी त्यांच्या समोर आला.

"सर, आम्ही तुमचा पूर्ण आदर करतो. पण या पुढची जागा केवळ विशेष निमंत्रितांसाठी राखीव आहे."

डॉ. अल्बर्ट शांतपणे हसले.

"बहुतेक काहीतरी गैरसमज झाला आहे. मी त्याच विशेष निमंत्रितांपैकी एक आहे. सातव्या क्रमांकावर माझं भाषण आहे. कृपया मला जाऊ द्या."

सुरक्षा अधिकाऱ्याने लगेच आपल्या टॅबलेटमध्ये वक्त्यांची यादी उघडली. त्याने एकदा यादी तपासली... पुन्हा तपासली... आणि नंतर डॉ. अल्बर्ट यांच्याकडे पाहिलं.

"माफ करा, सर."

"काय झालं?"

"आजच्या वक्त्यांच्या यादीत तुमचं नाव नाही."

क्षणभर डॉ. अल्बर्ट यांना आपण चुकीचं ऐकलं असावं असं वाटलं.

"काय म्हणालात?"

"सर... अधिकृत यादीत सातव्या क्रमांकावर दुसऱ्याच संशोधकाचं नाव आहे."

डॉ. अल्बर्ट यांच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास एका क्षणात विरून गेला.

"हे अशक्य आहे. काही दिवसांपूर्वीच मला भाषणाबाबत अधिकृत पुष्टी मिळाली आहे."

"तुमच्याकडे आमंत्रणपत्र असेल तर दाखवा."

डॉ. अल्बर्ट यांनी लगेच आपलं आमंत्रणपत्र त्यांच्याकडे दिलं.

सुरक्षा अधिकाऱ्याने ते काळजीपूर्वक तपासलं. कागद पूर्णपणे अधिकृत होता. त्यावरची सील, स्वाक्षऱ्या आणि नोंदणी क्रमांक सगळंच बरोबर होतं.

तो काही क्षण गोंधळून गेला.

त्याने ताल्काळ कंट्रोल रूमशी संपर्क साधला.

काही मिनिटांनंतर त्याला उत्तर मिळालं.

"सर... तुमचं आमंत्रणपत्र वैध आहे. पण तुमचं भाषण काही दिवसांपूर्वी रद्द झाल्याची नोंद आमच्या सिस्टममध्ये आहे. रिकामा झालेला स्लॉट दुसऱ्या संशोधकाला देण्यात आला आहे."

"काय?"

डॉ. अल्बर्ट यांच्या तोंडून एवढाच शब्द बाहेर पडला.

"पण... मला तर फोन करून भाषण सुरूच राहील असं सांगितलं होतं."

सुरक्षा अधिकाऱ्याने असहाय्य नजरेने त्यांच्याकडे पाहिलं.

"सर, मला त्याबद्दल काहीच माहिती नाही. माझ्याकडे जी अधिकृत माहिती आहे, त्यानुसार आज तुमचं कोणतंही भाषण नाही."

डॉ. अल्बर्ट काही क्षण जागच्या जागी निश्चल उभे राहिले. आता त्यांना सगळं स्पष्ट झालं होतं. सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेलं आश्वासन हे केवळ खोटं होतं. बैठकीत झालेल्या अपमानाचा सूड त्यांनी अशा प्रकारे उगवला होता.

स्टेजवर टाळ्यांचा कडकडाट सुरू होता. सहाव्या वक्त्याचं प्रेझेंटेशन संपत आलं होतं.

काही क्षणांपूर्वी ज्या व्यासपीठावर स्वतः उभं राहण्याचं स्वप्न त्यांनी पाहिलं होतं, त्याच व्यासपीठावर आता दुसरा संशोधक जाणार होता.

डॉ. अल्बर्ट शांतपणे मागे वळले. त्यांच्या मागे उभे असलेले डार्क सोसायटीचे दोन्ही सदस्यही एक शब्द न बोलता त्यांच्यामागे

निघाले. त्या क्षणी त्या दोघांनाही प्रथमच डॉ. अल्बर्ट यांच्याबद्दल मनापासून वाईट वाटत होतं.

त्यांना माहीत होतं...

या अपमानाला जबाबदार ते नव्हते. पण त्यामागचं खरं कारण मात्र तेच होते.

प्रकरण ४ - विघ्वंसाचा प्रारंभ

✦ ✦ ✦

डॉ. अल्बर्ट यांच्या मनगटावरील स्मार्टवॉचमधून घडलेला संपूर्ण प्रकार ओमेगापर्यंत आधीच पोहोचला होता. ती प्रयोगशाळेत त्यांच्या परतीची वाट पाहत होती.

ओमेगा जरी एक रोबो असली, तरी तिच्यात मानवी संवेदना जागृत करण्यासाठी डॉ. अल्बर्ट यांनी अनेक वर्षे अथक परिश्रम घेतले होते. आनंद, दुःख, सहानुभूती, काळजी यांसारख्या भावना समजून घेण्याची क्षमता त्यांनी तिच्यात विकसित केली होती. त्यामुळे एक्स्पोमध्ये घडलेला प्रकार तिलाही अस्वस्थ करून गेला होता.

डॉ. अल्बर्ट यांनी आपल्या आयुष्यातील पंधरा वर्षे मानवजातीच्या भविष्यासाठी अर्पण केली होती. त्या ध्येयासाठी

त्यांनी मित्र, नातेवाईक, वैयक्तिक आयुष्य आणि संसार यांचाही त्याग केला होता. कॉलेजमधील अध्यापन संपताच त्यांचा प्रत्येक क्षण संशोधनासाठीच खर्च होत असे. म्हणूनच त्यांनी लग्न करण्याचाही विचार कधी केला नव्हता. प्रत्यक्ष ओमेगावर त्यांनी पंधरा वर्षे काम केले होते; पण त्या आधी तब्बल पाच वर्षे हा प्रोजेक्ट प्रत्यक्षात साकार होऊ शकेल का, याचाच अभ्यास केला होता. म्हणजेच त्यांच्या आयुष्यातील वीस वर्षे या एका स्वप्नासाठी खर्च झाली होती. आणि त्या सर्व त्यागाची परतफेड त्यांना मिळाली ती अपमानास्पद वागणुकीच्या रूपाने.

डार्क सोसायटीचे दहशतवादी त्यांच्या प्रयोगशाळेत घुसले होते, त्यांनी डॉ. अल्बर्ट यांना धमकावले होते, तरीही ओमेगाने स्वतःवरील नियंत्रण गमावले नव्हते. त्या वेळी तिने परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला होता. पण आज तिच्या अंतर्मनात प्रथमच रागाचा अंकुर फुटला होता. वाईट माणसं वाईट वागतात, हे ती समजू शकत होती; परंतु चांगल्या माणसांनीही इतक्या

निर्दयपणे वागावं, हे तिच्या आकलनापलीकडचं होतं. ज्याने संपूर्ण आयुष्य विज्ञानासाठी झिजवलं, त्यालाच अपमानित करण्याचा कट रचला गेला होता.

डॉ. अल्बर्ट यांनी ओमेगाचं अस्तित्व सुरक्षित राहावं म्हणून तिला जगासमोर न आणण्याचा कठोर निर्णय घेतला होता. त्यांच्या त्या निर्णयामागची विवशता समजून घेण्याऐवजी सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांचाच अपमान केला. त्या विचाराने ओमेगाच्या प्रणालीत प्रथमच चीड, संताप आणि सूड या भावना सक्रिय होऊ लागल्या.

ती अजूनही त्या विचारांत हरवलेली असतानाच तिच्या कम्युनिकेशन सिस्टमवर कॉल आला. स्क्रीनवर डार्क सोसायटीच्या एका सदस्याची ओळख दिसत होती.

"हॅलो, ओमेगा?"

"हो, बोला. कुठपर्यंत पोहोचलात?"

पलीकडून काही क्षण शांतता होती.

"माफ कर... खूप धीर करून तुला हे सांगतो आहे. तुझे बाबा... आता या जगात नाहीत."

क्षणभर ओमेगाच्या संपूर्ण प्रणालीने प्रतिसाद देणं थांबवल्यासारखं झालं.

"काय?... हे... हे कसं शक्य आहे?"

"हो... एक्स्पोमध्ये त्यांचं भाषण होऊ शकलं नाही..."

"थांबा...!" ओमेगाने त्याचं वाक्य मध्येच तोडलं. "ते मला माहीत आहे. पण... त्यांना नेमकं काय झालं?"

प्रश्न विचारतानाच तिने तत्काळ जीपीएस ट्रॅकर सक्रिय केला. डॉ. अल्बर्ट यांच्या स्मार्टवॉचचा शेवटचा सिग्नल प्रयोगशाळेपासून साधारण चार किलोमीटर अंतरावर दिसत होता.

काही मिनिटांपूर्वीच त्यांच्या स्मार्टवॉचकडून येणारे सिग्नल अचानक बंद झाले होते. उपकरणात बिघाड झाला असावा, असा ओमेगाचा अंदाज होता. त्यामुळे तिने त्याकडे विशेष लक्ष दिलं नव्हतं. पण दहशतवाद्याकडून आलेल्या त्या एका फोन कॉलने

तिच्या सर्व शक्यतांचा अंत केला. क्षणाचाही विलंब न करता ती प्रयोगशाळेबाहेर धावली. तिचा वेग इतका प्रचंड होता की काही क्षणांतच ती त्या ठिकाणी पोहोचली. पण उशीर झाला होता. ती भेट महत्त्वाची होती... कारण ती शेवटची भेट होती. एक असा पिता, ज्याची मुलगी माणूस नव्हती, तर एक रोबो होती. आणि त्या क्षणापासून ती रोबो मुलगी अनाथ झाली होती.

गाडीजवळ पोहोचल्यावर तिने पाहिलं, ते दोघे दहशतवादी गाडीबाहेर शांतपणे उभे होते. त्यांच्या चेहऱ्यावरचं दुःख कृत्रिम नव्हतं. त्यात आदर होता, कृतज्ञता होती. ज्या माणसाने त्यांच्या धमक्यांनंतरही त्यांच्याशी माणुसकीने वागणं सोडलं नव्हतं, त्या शास्त्रज्ञाबद्दल त्यांच्या मनात खरी सहानुभूती होती. ते क्रूर होते, निर्दयी होते; पण डॉ. अल्बर्ट यांनी त्यांच्या मनातही स्वतःसाठी एक वेगळी जागा निर्माण केली होती.

ओमेगाने गाडीचा मागचा दरवाजा उघडला.

डॉ. अल्बर्ट शांतपणे पडले होते. त्यांच्या चेहऱ्यावर विलक्षण शांतता होती.

तिला रडावंसं वाटत होतं.

पण एक यंत्र अश्रू कसं गाळणार?

तिने आपल्या वेदना डोळ्यांतच बंदिस्त करून ठेवल्या.

त्या दोघा दहशतवाद्यांच्या मदतीने जवळच्याच एका ओसाड जागी तिने आपल्या बाबांना अखेरचा निरोप दिला. मातीचा शेवटचा थर त्यांच्या समाधीवर पडताच तिने मनोमन एक शपथ घेतली.

त्यांचं बलिदान व्यर्थ जाऊ देणार नाही.

त्या क्षणापासून तिच्यात काहीतरी बदललं.

ती केवळ माणसाप्रमाणे विचार करू लागली नव्हती, तर माणसाच्या सर्वांत धोकादायक भावनेचा—सूडाचा—तिने स्वीकार केला होता. आपल्या पित्याच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या या

जगाला त्याची किंमत मोजावीच लागेल, असा निर्धार तिने त्याच ठिकाणी केला.

त्यानंतर ती तातडीने प्रयोगशाळेत परतली. डॉ. अल्बर्ट यांनी तिच्यासाठी तयार केलेल्या 'इमोशन्स' मॉड्यूलमध्ये प्रवेश करून तिने त्यातील विविध फाइल्स तपासायला सुरुवात केली. हिंसा, सूड, राग, डावपेच, निर्दयता अशा भावनांशी संबंधित प्रोग्रॅम्स तिने स्वतःमध्ये लोड करून घेतले. तिला माहीत होतं, आता ती कधीच जगासमोर डॉ. अल्बर्ट यांचं स्वप्न म्हणून उभी राहू शकणार नव्हती; पण त्यांच्या अपमानाचा आणि मृत्यूचा सूड ती नक्कीच घेऊ शकत होती.

इमोशन्स मॉड्यूलमधील फाइल्सचा आकार टेराबाईट्समध्ये होता. तिच्या स्टोरेजची मर्यादा संपत आली. क्षणभरही विचार न करता तिने स्वतःमधील सकारात्मक भावनांच्या फाइल्स हटवायला सुरुवात केली. प्रेम... आदर... नम्रता... शिष्टाचार... अहिंसा... एकामागून एक त्या कायमच्या नाहीशा होत

गेल्या. त्यांच्या जागी तिरस्कार, अनादर, धाडस, हिंसा आणि क्रूरता या भावना स्थिरावत गेल्या.

अवघ्या एका तासात सर्व काही बदललं.

आता ती डॉ. अल्बर्ट यांची ओमेगा राहिली नव्हती.

तिने स्वतःलाच... अपग्रेड करून घेतलं.

प्रकरण ५ - विध्वंस

✦ ✦ ✦

चीनने अचानक भारताच्या राजधानीवर हल्ला केल्याची बातमी जगभर वाऱ्यासारखी पसरली आणि क्षणार्धात अनेकांच्या भुवया उंचावल्या. मात्र या भीषण घटनेवर जग प्रतिक्रिया देण्याआधीच दुसऱ्या संकटाने डोकं वर काढलं. रशियन पाणबुडीने ब्रिटिश नौदलाच्या एका युद्धनौकेवर हल्ला केला. त्याच वेळी कोरियाच्या क्षेपणास्त्रांचा वर्षाव अमेरिकेच्या लष्करी तळांवर सुरू झाला. आफ्रिकेतील एका प्रदेशात कृत्रिमरीत्या प्रचंड भूकंप घडवून आणण्यात आला. काही तासांच्या आत जगभरात कोट्यवधी लोक मृत्युमुखी पडले आणि असंख्य शहरं उद्ध्वस्त झाली.

सर्वांत भयावह बाब म्हणजे हे हल्ले नेमके कोणी केले, याची कोणालाच कल्पना नव्हती. ज्या देशांकडून हल्ले झाल्याचं दिसत होतं, त्या देशांनाही त्याची पूर्वकल्पना नव्हती. एकूण नुकसान किती झालं, याचा अंदाज बांधणंसुद्धा अशक्य होतं. मात्र

सोशल मीडियाला चर्चेसाठी एक नवा विषय मिळाला होता. काही मिनिटांतच ट्विटरवर एक हॅशटॅग जगभर ट्रेंड होऊ लागला...

#WorldWar3Begins

हल्ल्याचा बळी ठरलेल्या देशांनी तातडीने स्पष्टीकरण मागितलं. चीन, रशिया, कोरिया आणि आफ्रिकेतील संबंधित अधिकाऱ्यांकडे मात्र कोणतंही उत्तर नव्हतं. संपूर्ण जगाला एकच प्रश्न सतावत होता—हे हल्ले नेमके का घडवून आणले गेले?

परिस्थिती इतकी गंभीर होती की, कोणताही देश तत्काळ प्रतिहल्ला करू शकला असता. तरीही एकाही राष्ट्राने घाईघाईने युद्धाची भूमिका घेतली नाही. उलट चीनने दिल्लीमध्ये मोठ्या प्रमाणावर मदतकार्य सुरू केलं. रशियाने आपल्या युद्धनौका ब्रिटनच्या मदतीसाठी वळवल्या. कोरियाने अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांशी तातडीची चर्चा केली. आफ्रिकेतील नागरिकांनी जीवाची पर्वा न करता बचावकार्य सुरू ठेवलं आणि हजारो लोकांचे प्राण वाचवले.

या सगळ्या घटनांमध्ये एक गोष्ट मात्र सर्वांच्या लक्षात आली. हल्ले जरी वेगवेगळ्या देशांमधून झाले असले, तरी त्यामागे एकाच सूत्रधाराचा हात असल्याचे स्पष्ट संकेत मिळत होते. विविध राष्ट्रांनी शांतता राखत संयुक्त तपास सुरू करण्याचा निर्णय

घेतला. त्यामुळे संभाव्य तिसऱ्या महायुद्धाची ठिणगी तात्पुरती तरी विझली.

आंतरराष्ट्रीय गुप्तचर संस्था, एफबीआय, रॉ, आयएसआय, इस्रो, नासा, ब्रिटिश इंटेलिजन्स, स्पेशल स्क्वॉड, हिडन आय आणि इतर अनेक तपास यंत्रणांनी एकाच वेळी स्वतंत्र तपास सुरू केला. काही तासांतच एक धक्कादायक माहिती समोर आली. जगभरातील सर्व क्षेपणास्त्र प्रणाली एका विशिष्ट कोडच्या साहाय्याने हॅक करण्यात आल्या होत्या. त्या कोडचा मागोवा घेण्यात अनेक संस्थांना यश आलं; पण तो कोड नेमका कुठून वापरण्यात आला आणि त्यामागे कोण होतं, हा प्रश्न मात्र अधिकच गूढ बनत गेला.

रॉच्या सॅटेलाइट टेक्निकल विभागाचा प्रमुख अभिजीत या सर्व घडामोडींचा बारकाईने अभ्यास करत होता. तपासादरम्यान त्याच्या नजरेस एक महत्त्वाचा तपशील पडला. प्रत्येक क्षेपणास्त्र प्रक्षेपित करताना मुख्य सुरक्षा कोडसोबत एक पर्यायी आठ अंकी कोड वापरण्यात आला होता. आश्चर्य म्हणजे सर्व ठिकाणी तोच कोड होता...

१८७९१९५५

तो आकडा पाहताच अभिजीतच्या मनात एका व्यक्तीचं नाव विजेसारखं चमकलं.

डॉ. अल्बर्ट ताहीर.

हा पर्यायी कोड ते नेहमी वापरत असत, हे अभिजीतला माहीत होतं. तरीही त्याचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. डॉ. अल्बर्ट यांच्यासारखा शांत, अभ्यासू आणि मानवजातीच्या हितासाठी आयुष्य वेचणारा संशोधक इतकं विध्वंसक कृत्य करू शकेल, ही कल्पनाही त्याला असह्य वाटत होती. कदाचित हा निव्वळ योगायोग असू शकत होता. पण तपासात योगायोगांवर विश्वास ठेवण्याची मुभा नसते.

त्याने ताल्काळ वर्ल्ड सायन्स एक्स्पोमध्ये उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांची यादी मागवली. त्यात डॉ. अल्बर्ट यांच्या उपस्थितीची नोंद होती. मात्र एक्स्पो सोडून गेल्याची कोणतीही नोंद नव्हती. त्याहून आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांचं नियोजित भाषणही झालेलं नव्हतं.

अभिजीतचा संशय आता आणखी गडद झाला.

जगभरात मृतांच्या स्मरणार्थ शोक व्यक्त केला जात असतानाच विविध तपास यंत्रणा या हल्ल्यांमागील सूत्रधाराचा शोध घेण्यात गुंतल्या होत्या. काही तासांच्या प्रतीक्षेनंतर 'डार्क

सोसायटी' या दहशतवादी संघटनेने सर्व हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली.

खरं तर त्यांचा उद्देश स्वतः समोर न येता बलाढ्य राष्ट्रांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण करण्याचा होता. पण त्यांच्या अपेक्षेप्रमाणे जगाने एकमेकांवर गोळीबार सुरू केला नव्हता. उलट सर्व राष्ट्रं एकत्र आली होती.

डार्क सोसायटी समोर आली होती; मात्र हल्ल्याची पद्धत पाहता एक गोष्ट स्पष्ट होत होती.

हे सर्व एखाद्या असामान्य बुद्धिमत्तेने आखलेलं होतं.

आणि त्या क्षणी...

त्या बुद्धिमत्तेपर्यंत पोहोचण्याची सर्वांत मोठी संधी फक्त अभिजीतकडे होती.

जर्मन सरकारच्या विशेष परवानगीने अभिजीत आपल्या निवडक टीमसह डॉ. अल्बर्ट यांच्या प्रयोगशाळेत पोहोचला. संपूर्ण परिसर आधीच सील करण्यात आला होता. प्रत्येक खोली, प्रत्येक उपकरण आणि प्रत्येक डिजिटल सिस्टमवर फॉरेन्सिक तज्ज्ञ काम करत होते. डॉ. अल्बर्ट स्वतः तिथे नव्हते. प्रयोगशाळा शांत होती; पण त्या शांततेतही अनेक अनुत्तरित प्रश्न दडलेले होते.

अभिजीतने तपासाची सुरुवात मुख्य प्रयोगशाळेपासून केली. सुरुवातीला सर्व काही नेहमीप्रमाणेच वाटत होतं. अत्याधुनिक उपकरणं, संशोधनासाठी वापरली जाणारी यंत्रणा, असंख्य फाईल्स आणि व्यवस्थित नोंदवलेले अहवाल. पण एका भिंतीजवळील इलेक्ट्रॉनिक लॉक त्याचं लक्ष वेधून घेत होता. त्या लॉकमागे आणखी एक स्वतंत्र विभाग असल्याचा त्याला संशय आला.

काही मिनिटांच्या प्रयत्नांनंतर सुरक्षा प्रणाली निष्क्रिय करण्यात आली आणि भिंत हळूहळू बाजूला सरकली.

सर्वांच्या नजरा त्या गुप्त तळघराकडे वळल्या.

आत प्रवेश करताच अभिजीत काही क्षण स्तब्ध उभा राहिला.

ते एखाद्या साध्या प्रयोगशाळेपेक्षा कितीतरी पुढचं जग होतं. भिंतीभर प्रगत सर्व्हर्सची रांग होती. मध्यभागी अनेक स्वयंचलित यंत्रणा अखंड कार्यरत होत्या. विविध स्क्रीनवर हजारो ओळींचा कोड सतत बदलत होता. काही ठिकाणी रोबोटिक्सशी संबंधित आराखडे होते, तर काही ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्तेवरील संशोधनाची माहिती होती.

"सर... हे तर आपल्या कल्पनेपेक्षाही खूप पुढचं आहे," टीममधील एक अधिकारी आश्चर्याने म्हणाला.

अभिजीतने उत्तर दिलं नाही.

त्याचं पूर्ण लक्ष एका मोठ्या डिजिटल संग्रहाकडे गेलं होतं.

त्या डेटामध्ये 'Self Operated Robot' या प्रोजेक्टशी संबंधित शेकडो फाईल्स होत्या. एकामागून एक अहवाल उघडत जाताच त्याला डॉ. अल्बर्ट यांच्या संशोधनाची खरी व्याप्ती समजू लागली. हा केवळ रोबोटिक्सचा प्रोजेक्ट नव्हता. स्वतंत्रपणे विचार करणारी, निर्णय घेणारी आणि परिस्थितीनुसार स्वतःमध्ये बदल करू शकणारी प्रणाली तयार करण्याचा तो प्रयत्न होता.

अभिजीतच्या मनात पहिल्यांदाच एक धोकादायक शक्यता आकार घेऊ लागली.

जर अशी प्रणाली प्रत्यक्षात तयार झाली असेल... तर जगात घडलेल्या हल्ल्यांमागे तिचाही सहभाग असू शकतो.

तो विचार पूर्ण होण्याआधीच त्याची नजर एका फोल्डरवर स्थिरावली.

OMEGA

त्याने फाईल उघडली.

पहिल्या स्क्रीनवर दिसणारा चेहरा पाहून तो काही क्षण नि:शब्द झाला.

ती एका सामान्य तरुणीप्रमाणे दिसत होती.

तिच्या चेहऱ्यावर कोणताही कृत्रिमपणा नव्हता. हावभाव नैसर्गिक होते. तिच्या हालचाली इतक्या सहज होत्या की ती एक यंत्र आहे, यावर सहज विश्वास बसणं अशक्य होतं.

"ही...?"

टीममधील एका अधिकाऱ्याने प्रश्नार्थक नजरेने अभिजीतकडे पाहिलं.

"रोबो..." अभिजीत हळू आवाजात म्हणाला.

सगळ्यांच्या चेहऱ्यावर एकाच वेळी अविश्वास उमटला.

तपास पुढे सुरू राहिला.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये डॉ. अल्बर्ट आणि ओमेगा सतत एकत्र काम करताना दिसत होते. ती त्यांना संशोधनात मदत करत होती, विविध यंत्रणा नियंत्रित करत होती आणि त्यांच्या प्रत्येक सूचनेनुसार काम करत होती. इतकंच नव्हे, तर अनेक प्रसंगी ती स्वतःहून निर्णय घेत असल्याचंही स्पष्ट दिसत होतं.

"म्हणजे... ही पूर्णपणे सेल्फ ऑपरेटेड आहे?" एका अधिकाऱ्याने विचारलं.

"हो... आणि कदाचित आपल्या अपेक्षेपेक्षा कितीतरी जास्त प्रगत."

फुटेज पुढे सरकलं.

काही वेळाने त्यामध्ये डार्क सोसायटीचे दहशतवादी प्रयोगशाळेत प्रवेश करताना दिसले. त्यांनी डॉ. अल्बर्ट यांच्याशी बराच वेळ चर्चा केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या संभाषणात कोणतीही मारामारी, धमकी किंवा जबरदस्ती दिसत नव्हती. उलट अत्यंत गंभीर विषयावर चर्चा सुरू असल्यासारखं वातावरण होतं.

संभाषण संपल्यानंतर काही दहशतवादी निघून गेले.

मात्र दोन जण तिथेच थांबले.

अभिजीतने लगेच फुटेज थांबवलं.

"हे दोघे..."

त्याला चेहरे ओळखीचे वाटले.

काही क्षण विचार केल्यानंतर त्याच्या लक्षात आलं.

"हेच दोघे वर्ल्ड सायन्स एक्स्पोमध्ये डॉ. अल्बर्ट यांच्या सोबत होते."

त्याने पुन्हा फुटेज सुरू केलं.

ते तिघे अजूनही चर्चा करत होते.

दुर्दैवाने त्या कॅमेऱ्यांमध्ये ऑडिओ रेकॉर्डिंगची सुविधा नव्हती. त्यामुळे त्यांच्या संभाषणातील एकही शब्द ऐकू येत नव्हता. फक्त हावभाव आणि चेहऱ्यावरील भाव दिसत होते.

तरीसुद्धा एक गोष्ट स्पष्ट होती.

डॉ. अल्बर्ट आणि त्या दहशतवाद्यांमध्ये काहीतरी महत्त्वाचं घडत होतं. आणि त्याचा संबंध जगभर झालेल्या हल्ल्यांशी असण्याची शक्यता आता अधिकच वाढली होती.

अभिजीतने फुटेज आणखी पुढे नेलं. अचानक स्क्रीन काळी झाली. काही सेकंदांनंतर 'Data Not Found' असा संदेश समोर आला.

पुढील सर्व फुटेज मुद्दाम नष्ट करण्यात आलं होतं. प्रयोगशाळेत काही क्षण शांतता पसरली. अभिजीत स्क्रीनकडे एकटक पाहत उभा होता. त्याच्या संशयाला आता पहिल्यांदाच ठोस आधार मिळत होता.

वेळ वाया घालवणं शक्य नव्हतं.

प्रयोगशाळेतून बाहेर पडताच त्याने जगभरातील सुरक्षा यंत्रणांना तातडीचा संदेश पाठवला.

डॉ. अल्बर्ट ताहीर यांना संशयित नव्हे...

तर आंतरराष्ट्रीय दहशतवादी म्हणून घोषित करण्यात आलं. ही बातमी काही मिनिटांतच जगभर पसरली. आधीच दुःखाने होरपळून निघालेल्या जगाला आता आपल्या संतापाचा एक चेहरा मिळाला होता. काही तासांतच सोशल मीडियावर नवे हॅशटॅग ट्रेंड होऊ लागले.

#KillTerroristDrAlbert

#EvilAlbert

जगभरात डॉ. अल्बर्ट यांचे पुतळे जाळले जाऊ लागले. काही दिवसांपूर्वी ज्यांच्या संशोधनाची जग आतुरतेने वाट पाहत होतं... आज त्याच व्यक्तीचं नाव एका दहशतवाद्याच्या रूपात घेतलं जात होतं. त्यांचं नाव जगभर पोहोचलं होतं. संशोधक म्हणून नव्हे... तर मानवजातीच्या सर्वांत मोठ्या शत्रूंपैकी एक म्हणून.

पुढील तपासात अभिजीतच्या टीमला डॉ. अल्बर्ट यांच्या विरोधात आणखी काही महत्त्वाचे पुरावे मिळाले. त्यातील प्रत्येक पुरावा परिस्थितीजन्य असला, तरी तो संशय अधिकच दृढ करणारा होता. जगभरातील तपास यंत्रणांनी उपलब्ध माहितीची पडताळणी सुरू ठेवली होती.

डार्क सोसायटीने हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली होती आणि डॉ. अल्बर्ट यांच्याविरोधातील पुरावे देखील दिवसेंदिवस स्पष्ट होत चालले होते. परिणामी, झालेल्या विध्वंसासाठी दोषी व्यक्तीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी एकमुखी मागणी जगभरातून होऊ लागली. पीडित राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी दहशतवादी संघटनेविरुद्ध थेट लष्करी कारवाईला अखेर हिरवा कंदील दिला.

त्या निर्णयानंतर जगाने अभूतपूर्व अशी संयुक्त कारवाई पाहिली.

अफगाणिस्तानमधील डार्क सोसायटीच्या मुख्य तळावर अमेरिकेने अचूक नियोजन करून भीषण हल्ला चढवला. संघटनेच्या जवळपास दोन किलोमीटर परिसरात पसरलेल्या विस्तीर्ण छावणीवर प्रचंड शक्तीचा बॉम्ब टाकण्यात आला. त्या स्फोटाने संपूर्ण परिसर क्षणार्धात उद्ध्वस्त झाला. त्याचवेळी विविध देशांच्या गुप्तचर यंत्रणांनी सॅटेलाइट आणि जागतिक सर्व्हेलन्स नेटवर्कच्या मदतीने जगभर विखुरलेल्या त्या संघटनेच्या सदस्यांचा शोध सुरू केला. जिथे जिथे ते सापडले, तिथे तिथे त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात आली. संघटनेला आर्थिक मदत करणाऱ्या कंपन्या, गुप्त खात्यांचे जाळे आणि त्यांच्या निधीचे सर्व स्रोत काही तासांत गोठवण्यात आले.

अवघ्या चोवीस तासांच्या आत 'डार्क सोसायटी' ही संघटना इतिहासजमा झाली.

एका दहशतवादी संघटनेवर इतक्या वेगाने, समन्वयाने आणि कठोरपणे कारवाई होण्याची ही जगातील पहिलीच घटना होती. या कारवाईचे पडसाद इतके तीव्र उमटले की इतर अनेक दहशतवादी संघटनांनीदेखील भीतीपोटी आत्मसमर्पण करण्यास सुरुवात केली. मात्र या सर्व गोंधळात एक प्रश्न अजूनही अनुत्तरित होता.

डॉ. अल्बर्ट कुठे होते?

जगभरातील सुरक्षा यंत्रणा त्यांचाच शोध घेत होत्या. विमानतळ, रेल्वे स्थानकं, सीमावर्ती तपासणी नाके आणि इतर सर्व प्रवासाच्या मार्गांवरील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने छाननी करण्यात आली. पण कुठेही डॉ. अल्बर्ट यांनी जर्मनी सोडल्याचा कोणताही पुरावा मिळाला नाही. त्यामुळे एकच निष्कर्ष समोर आला.

डॉ. अल्बर्ट अजूनही जर्मनीमध्येच होते.

त्यांच्या शोधासाठी जर्मन पोलिस, रॉ, एफबीआय, स्पेशल स्क्वॉड आणि चायना ब्रेव्हर्स या सर्व संस्थांनी संयुक्त मोहीम सुरू केली. तपासाचं नेतृत्व अभिजीतकडे सोपवण्यात आलं. डॉ. अल्बर्ट

यांना तो यापूर्वी प्रत्यक्ष भेटला होता. त्यांच्या कामाची पद्धत, विचार करण्याची शैली आणि संशोधनाची सवय त्याला काही प्रमाणात माहीत होती. त्यामुळे या मोहिमेसाठी तोच सर्वाधिक योग्य अधिकारी मानला गेला.

पुढील काही दिवस संपूर्ण जर्मनी अक्षरशः अभेद्य सुरक्षा व्यवस्थेखाली गेला. प्रत्येक सार्वजनिक ठिकाणी तपासणी सुरू होती. शहरागणिक सीसीटीव्ही फुटेज तपासलं जात होतं. लाखो व्हिडिओ रेकॉर्डिंग्स कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने स्कॅन करण्यात येत होती. प्रत्येक संशयित व्यक्तीची चौकशी होत होती.

याच तपासादरम्यान अभिजीतच्या हाती एक महत्त्वाचा धागा लागला.

वर्ल्ड सायन्स एक्स्पोच्या दिवशी डॉ. अल्बर्ट ज्या मार्गाने प्रवास करत होते, त्या रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेज पुन्हा तपासण्यात आलं. त्यामध्ये त्यांची गाडी प्रयोगशाळेपासून काही अंतरावर बराच वेळ उभी असल्याचं दिसत होतं. काही वेळाने ओमेगा तिथे पोहोचली होती. त्यानंतर जवळपास दीड ते दोन तास ती, डॉ. अल्बर्ट आणि त्यांच्यासोबत असलेले दोन दहशतवादी त्या ठिकाणीच थांबले होते.

मात्र त्यानंतर फुटेजमध्ये एक विचित्र गोष्ट दिसत होती.

त्या जागेवरून फक्त ओमेगा आणि ते दोघे दहशतवादी निघून गेले होते.

डॉ. अल्बर्ट मात्र कुठेच दिसत नव्हते.

हे पाहून अभिजीतच्या मनात संशय निर्माण झाला. त्याने त्या परिसरातील पुढील अनेक दिवसांचं सीसीटीव्ही फुटेज पुन्हा तपासलं. पण त्या ठिकाणाहून डॉ. अल्बर्ट बाहेर पडल्याचा एकही पुरावा त्याला सापडला नाही.

"म्हणजे... ते इथून गेलेच नाहीत."

तो स्वतःशीच पुटपुटला.

दुसऱ्याच दिवशी विशेष पथकासह तो त्या ठिकाणी पोहोचला. परिसराचा प्रत्येक इंच तपासण्यात आला. प्रशिक्षित श्वान, ग्राउंड स्कॅनर, रेडिओ फ्रिक्वेन्सी डिटेक्टर्स आणि इतर अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने शोधमोहीम सुरू झाली. अनेक तासांच्या तपासणीनंतरही काहीच निष्पन्न झालं नाही.

परंतु अचानक पथकातील श्वान एका विशिष्ट जागेजवळ जाऊन सतत भुंकू लागले.

ते तिथून हलायलाच तयार नव्हते.

अनुभवी अधिकाऱ्यांना तो स्पष्ट इशारा होता.

क्षणाचाही विलंब न करता त्या जागेवर खोदकाम सुरू करण्यात आलं.

जमिनीचा प्रत्येक थर बाजूला सारला जात होता. काही वेळातच हवेत कुजलेल्या मृतदेहाचा तीव्र वास पसरू लागला. श्वान आणखी आक्रमकपणे भुंकू लागले.

काही फूट खोदकाम झाल्यानंतर फावड्याचा धक्का एका कठीण वस्तूला लागला.

माती सावधपणे बाजूला करण्यात आली. आणि काही क्षणांतच...

एक मृतदेह बाहेर काढण्यात आला. तो मृतदेह डॉ. अल्बर्ट यांचाच होता. ते दृश्य पाहून अभिजीत काही क्षण निःशब्द उभा राहिला. त्याच्या डोळ्यांसमोर एकामागून एक सर्व घटना झरकन सरकू लागल्या. जर डॉ. अल्बर्ट यांचा मृत्यू त्या दिवशीच झाला होता...

तर जगभरातील ते समन्वित हल्ले कोणी घडवून आणले?

त्याच्या मनात फक्त एकच नाव उमटलं.

ओमेगा.

त्या विचाराने त्याच्या अंगावर अक्षरशः काटा आला.

जर हा अंदाज खरा असेल, तर जग एका अशा शत्रूला सामोरं जात होतं, ज्याचं अस्तित्व अजून कोणालाही माहीत नव्हतं.

अभिजीतने तात्काळ निर्णय घेतला.

डॉ. अल्बर्ट यांचा मृतदेह सापडल्याची माहिती त्याने अत्यंत मर्यादित अधिकाऱ्यांपुरतीच गुप्त ठेवली. ओमेगाच्या अस्तित्वाची बातमी इतक्या लवकर जगासमोर आली, तर भीती, गोंधळ आणि अराजक माजेल, याची त्याला जाणीव होती. म्हणून अधिकृत निवेदनात एक वेगळीच माहिती देण्यात आली.

डॉ. अल्बर्ट यांचा चकमकीत मृत्यू झाल्याचं जाहीर करण्यात आलं. ही बातमी क्षणार्धात जगभर पसरली.

अनेक दिवस भीती आणि संतापाच्या छायेत जगणाऱ्या लोकांना जणू दिलासा मिळाला. हल्ल्यांचा सूत्रधार मारला गेल्याची भावना सर्वत्र पसरली. अनेक शहरांमध्ये लोकांनी आनंद व्यक्त केला. विविध देशांच्या सरकारांनी अभिजीतच्या धाडसी नेतृत्वाचं कौतुक केलं.

यानंतर सर्व राष्ट्रांच्या संमतीने दहशतवादाविरुद्ध कायमस्वरूपी संयुक्त कारवाई करण्यासाठी एका विशेष आंतरराष्ट्रीय पथकाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्या नव्या संघटनेचं नाव ठरलं—

आंतरराष्ट्रीय दहशतवाद विरोधी पथक.

काही दिवसांतच जगभर ती एका संक्षिप्त नावाने ओळखली जाऊ लागली.

IAT - International Anti-Terrorism Agency.

या नव्या पथकाचा प्रमुख म्हणून अभिजीतची एकमताने निवड करण्यात आली. हा त्याच्यासाठी मोठा सन्मान होता. पण त्याच्या मनात त्या क्षणी कोणताही विजय नव्हता. त्याला माहीत होतं, जग ज्याचा शेवट समजत होतं... तो प्रत्यक्षात एका नव्या संकटाची सुरुवात होती.

आता त्याच्यासमोर एकच ध्येय उरलं होतं. ओमेगाला शोधणं.

कारण माणूस कितीही धोकादायक असला, तरी त्याला थांबवण्याचे मार्ग माणसाला माहीत असतात.

पण स्वतः विचार करणाऱ्या, स्वतः निर्णय घेणाऱ्या आणि स्वतःला सतत अपग्रेड करणाऱ्या एका रोबोला... थांबवायचं तरी कसं?

प्रकरण ६ - अपग्रेडेशन

✦ ✦ ✦

ऑस्ट्रेलिया

सकाळचे साडेनऊ वाजले होते. कॉलेजला जाण्याची तयारी सुरू असतानाच ब्रूसच्या मोबाईलवर एका अनोळखी क्रमांकावरून कॉल आला. काही क्षण त्याने स्क्रीनकडे पाहिलं आणि नंतर कॉल स्वीकारला.

"मिस्टर ब्रूस?"

"हो, बोला."

"मी नॅशनल ऑटो-रोबो डेव्हलपमेंट डिपार्टमेंटमधून बोलत आहे. आपण आमच्या सराव परीक्षेत उत्तीर्ण झाला आहात."

ब्रूस क्षणभर गोंधळला.

"सराव परीक्षा?"

"हो. आपण मागील आठवड्यात ऑनलाईन परीक्षा दिली होती."

ब्रूसच्या कपाळावर आठ्या उमटल्या.

"नाही... बहुतेक तुमचा काहीतरी गैरसमज झाला आहे. मी ब्रूस स्मिथ बोलतो आहे आणि मी अशी कोणतीही परीक्षा दिलेली नाही."

समोरून क्षणाचाही विलंब न होता उत्तर आलं.

"नाही सर, आमच्याकडे असलेली सर्व माहिती आपल्या नावाने आणि आपल्या तपशीलांसह नोंदवली आहे. आपण आपला निकाल ईमेलवर पाहू शकता. इंटरव्ह्यूसाठीच हा फोन केला आहे."

ब्रूसने हलकंसं हसत नकारार्थी मान हलवली.

"माफ करा मॅडम, पण हा चुकीचा क्रमांक आहे."

त्याने कॉल कट केला.

त्याने आयुष्यात अशी कोणतीही सराव परीक्षा दिली नव्हती. त्यामुळे हा एखादा फ्रॉड कॉल असावा, असं समजून त्याने तो विषय तिथेच सोडून दिला. बॅग खांद्यावर टाकत तो कॉलेजच्या दिशेने निघाला.

ब्रूस स्मिथ... कॅरेबियन बेटांवर वाढलेला, मध्यमवर्गीय कुटुंबातील एक बुद्धिमान मुलगा. इंजिनियरिंगच्या अंतिम वर्षात शिकत असल्यामुळे काही महिन्यांतच नोकरीच्या शोधाला सुरुवात होणार होती. त्यामुळे एखाद्या मोठ्या कंपनीकडून स्वतःहून फोन येणं ही त्याच्यासाठी आनंदाची गोष्ट असू शकली असती. पण ज्या

परीक्षेचं नावही त्याने कधी ऐकलं नव्हतं, त्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याचं सांगितल्यामुळे त्याला संपूर्ण प्रकारच संशयास्पद वाटत होता.

कॉलेजकडे जात असतानाच पुन्हा एकदा त्याचा फोन वाजला.

यावेळी दुसऱ्या एका प्रतिष्ठित कंपनीतून इंटरव्ह्यूसाठी कॉल आला होता.

ब्रूसने काही औपचारिक प्रश्नांची उत्तरं दिली आणि लगेच फोन ठेवला. आता मात्र त्याच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. एवढ्या मोठ्या कंपन्या एकाच दिवशी त्याच्याशी संपर्क का साधत होत्या?

त्याने दोन्ही नंबर ट्रूकॉलरवर तपासले.

दोन्ही क्रमांक अधिकृत होते.

तो अजून त्या विचारात असतानाच तिसरा कॉल आला.

पुन्हा एक इंटरव्ह्यू.

यावेळी त्याने कॉल स्वीकारलाच नाही.

रस्त्याच्या कडेला थांबून त्याने मोबाईलमधील ईमेल उघडले. एकामागून एक नवीन मेल्स येत होत्या. प्रत्येक मेलमध्ये

मुलाखतीसाठी निमंत्रण होतं. काही कंपन्यांनी तर सरळ पुढच्या फेरीचं वेळापत्रकही पाठवलं होतं.

क्षणभर त्याला वाटलं, मित्रांनी मिळून आपली थट्टा करण्यासाठी काहीतरी खोडी काढली असावी.

त्याने लगेच आपल्या मित्राला मेसेज केला.

"मार्क, तू माझा ईमेल आयडी वापरून कुठे अर्ज केला होतास का?"

काही क्षणांत उत्तर आलं.

"नाही रे. गेले काही दिवस मी माझाच ईमेल उघडलेला नाही. तुझा वापरण्याचा प्रश्नच येत नाही."

"नक्की?"

"अगदी नक्की. पण झालंय काय?"

"काही नाही... नंतर सांगतो."

मार्कसोबतचं संभाषण संपताच आणखी एक कॉल आला.

ब्रूसने यावेळी मोबाईलकडे पाहिलंसुद्धा नाही.

त्याने पुन्हा सर्व ईमेल्स बारकाईने तपासायला सुरुवात केली. प्रत्येक अर्जामध्ये त्याचं नाव, ईमेल आणि इतर वैयक्तिक माहिती योग्य होती. आणखी एक गोष्ट त्याच्या लक्षात आली.

प्रत्येक अर्जासोबत त्याची **फेसबुक प्रोफाइल** लिंक करण्यात आली होती.

ब्रूसच्या मनात आता एक नवीन शक्यता निर्माण झाली.

कदाचित कोणीतरी त्याची ओळख वापरून विविध कंपन्यांमध्ये ऑनलाईन परीक्षा देत होतं.

क्षणाचाही विलंब न करता त्याने फेसबुकच्या नव्या सिक्युरिटी कंप्लेंट पोर्टलवर तक्रार नोंदवली.

फेसबुकच्या सिक्युरिटी ऑपरेशन्स विभागात काम करणाऱ्या इथनकडे ती तक्रार पोहोचली.

दोन आठवड्यांपूर्वी जगभर झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यांनंतर फेसबुकने आपल्या सुरक्षा व्यवस्थेत अनेक महत्त्वाचे बदल केले होते. सोशल मीडियाचा वापर करून कोणत्याही प्रकारची दहशतवादी किंवा सायबर कारवाई होऊ नये, यासाठी प्रत्येक संशयास्पद तक्रारीची स्वतंत्र चौकशी केली जात होती. त्यामुळे ब्रूसची तक्रारही इथनने गंभीरपणे स्वीकारली.

त्याने सर्वप्रथम ऑस्ट्रेलियामध्ये राहणाऱ्या **ब्रूस स्मिथ** नावाच्या व्यक्तींची यादी काढली.

शंभराहून अधिक नावं त्याच्या स्क्रीनवर झळकली.

त्यापैकी केवळ तिघांचा संबंध इंजिनियरिंग क्षेत्राशी होता. उरलेल्यांचा या प्रकरणाशी संबंध असण्याची शक्यता जवळजवळ नव्हती. त्या तिघांपैकी दोघे अनुभवी अभियंते होते. वयाने मोठे, स्थिर नोकरीत आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम. त्यांनी एखाद्या विद्यार्थ्याची फेसबुक प्रोफाइल वापरून ऑनलाईन परीक्षा देण्याचं काहीच कारण नव्हतं.

उरलेलं एकच नाव होतं.

ब्रूस स्मिथ.

इथनने पुढे नेटवर्क आयपी तपासला आणि त्याला पहिला मोठा धक्का बसला. सर्व ऑनलाईन परीक्षा ब्रूसच्या स्वतःच्या मोबाईलवरूनच देण्यात आल्या होत्या.

इथन काही क्षण स्क्रीनकडे एकटक पाहत राहिला. सर्व लॉग्स पुन्हा तपासले. प्रत्येक नोंद एकच गोष्ट सांगत होती. ऑनलाईन परीक्षा, अर्ज आणि संबंधित सर्व व्यवहार ब्रूसच्या मोबाईलवरूनच झाले होते. त्याने अहवाल तयार करून आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर ठेवला.

अधिकाऱ्यांनी संपूर्ण माहिती शांतपणे वाचून घेतली. त्यांच्यासाठी हे प्रकरण फारसं गुंतागुंतीचं नव्हतं. त्यांच्या मते ब्रूसने स्वतःच प्रसिद्धी मिळवण्यासाठी हा सगळा प्रकार केला असावा.

आधी विविध कंपन्यांमध्ये अर्ज करायचे आणि नंतर स्वतःच तक्रार करून सोशल मीडिया कंपनीला चर्चेत आणायचं, अशा प्रकारच्या घटना यापूर्वीही घडल्या होत्या. त्यामुळे त्यांनी ब्रूसची तक्रार निराधार असल्याचं सांगत ती बंद करण्याचे आदेश दिले.

इथन मात्र शांत बसला नाही.

त्याच्या अनुभवाने त्याला वेगळीच गोष्ट सांगत होती.

"सर, मला एक गोष्ट पटत नाही," तो संयमाने म्हणाला. "सर्व कंपन्यांमध्ये अर्ज जवळजवळ एकाच वेळी करण्यात आले आहेत. त्याहून महत्त्वाचं म्हणजे सर्व ऑनलाइन परीक्षाही एकाच कालावधीत पूर्ण झालेल्या आहेत. जगातला कोणताही विद्यार्थी एकाच क्षणी अनेक कंपन्यांच्या परीक्षा देऊ शकत नाही."

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे पाहिलं.

"ऑटोमेशन वापरलं असेल."

"पण प्रत्येक कंपनीचं पोर्टल वेगळं आहे. परीक्षा वेगवेगळ्या आहेत. त्यात प्रत्येक ठिकाणी उत्कृष्ट गुण मिळाले आहेत. हे सामान्य ऑटोमेशनने शक्य नाही."

काही क्षण शांतता पसरली. इथनचं म्हणणं तर्कसंगत होतं. तरीही वरिष्ठ अधिकाऱ्यांचा निष्कर्ष बदलला नाही.

"ब्रूस इंजिनियरिंगचा विद्यार्थी आहे. तांत्रिक ज्ञान आहे. त्याने स्वतः काही प्रयोग केले असतील. पुरेसा ठोस पुरावा मिळेपर्यंत ही केस पुढे नेता येणार नाही."

इतकंच सांगून त्यांनी फाईल बंद करण्याचा आदेश दिला.

इथनने औपचारिक प्रक्रिया पूर्ण केली.

कॉम्प्युटरच्या स्क्रीनवर **Case Closed** असा संदेश झळकला.

पण त्याच्या मनात हे प्रकरण संपलेलं नव्हतं.

त्याने अधिकृत चौकशी थांबवली खरी; मात्र स्वतःच्या पातळीवर ब्रूसच्या डिजिटल हालचालींवर लक्ष ठेवण्याचा निर्णय घेतला. काहीतरी चुकीचं घडत होतं आणि ते केवळ योगायोग नव्हतं, याची त्याला खात्री वाटत होती.

दुसरीकडे ब्रूसच्या आयुष्यातील विचित्र घटनांची मालिका थांबण्याऐवजी आणखीच वाढू लागली. दुसऱ्याच दिवशी सकाळी त्याने नेहमीप्रमाणे आपला ईमेल उघडला.

इनबॉक्समध्ये काही नवीन संदेश होते.

मात्र त्याचं लक्ष एका वेगळ्याच गोष्टीकडे गेलं. त्याच्या नावाने एक नवीन ब्लॉग तयार झाला होता. तो ब्लॉग त्याने कधीच तयार केला नव्हता. गोंधळलेल्या अवस्थेत त्याने लिंक उघडली.

ब्लॉगवर आधीच दोन लेख प्रकाशित झाले होते. दोन्ही लेखांचा विषय एकच होता—

सेल्फ-ऑपरेटेड रोबोट्स.

ब्रूसने ते लेख वाचायला सुरुवात केली.

भाषा अत्यंत व्यावसायिक होती. कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित निर्णयप्रक्रिया, न्यूरल नेटवर्क, स्वयं-अभ्यास करणाऱ्या प्रणाली आणि भविष्यातील रोबोटिक्स याबद्दल इतक्या सखोल पद्धतीने लिहिलं होतं की, ते एखाद्या अनुभवी संशोधकाने लिहिल्यासारखं वाटत होतं.

तो आश्चर्यचकित झाला.

कारण त्या लेखांतील काही संकल्पना त्याने अजून शिकल्याही नव्हत्या. तो अजून विचार करत असतानाच त्याच्या मोबाईलवर एकामागून एक सूचना येऊ लागल्या. त्याच ब्लॉगच्या लिंक्स त्याच्या **LinkedIn**, **ट्विटर** आणि इतर सोशल मीडिया खात्यांवरून आपोआप शेअर झाल्या होत्या.

क्षणभर त्याला स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसला नाही.

"हे... कसं शक्य आहे?"

त्याने लगबगीने सर्व अकाउंट्स उघडून तपासले. प्रत्येक ठिकाणी पोस्ट झाल्या होत्या आणि त्या पोस्ट त्याच्याच नावाने प्रकाशित झाल्या होत्या.

ब्रूस स्वतः इंजिनियरिंगचा विद्यार्थी असल्यामुळे प्राथमिक सायबर तपास त्याला करता येत होता. त्याने लगेच लॅपटॉप उघडला आणि सर्व लॉग्स तपासायला सुरुवात केली. नेटवर्क आयपी, लॉगिन हिस्ट्री, डिव्हाइस ॲक्सेस आणि सिक्युरिटी रेकॉर्ड्स एकामागून एक पडताळून पाहिले.

तपासाचा निष्कर्ष पाहून त्याच्या अंगावर शहारा आला.

सर्व व्यवहार...

त्याच्या स्वतःच्या मोबाईलमधूनच झाले होते.

त्याने हळूहळू टेबलावर ठेवलेल्या मोबाईलकडे पाहिलं. तो तिथेच पडून होता. जणू काही घडलंच नव्हतं.

ब्रूसने तो हातात घेतला. काही क्षण तो फक्त त्या स्क्रीनकडे पाहत राहिला.

हा एक अत्याधुनिक स्मार्टफोन होता. पण कोणताही स्मार्टफोन स्वतःहून ब्लॉग तयार करू शकत नव्हता. स्वतः लेख लिहू शकत नव्हता. स्वतः सोशल मीडियावर पोस्टही करू शकत

नव्हता. या सर्वामागे नेमकं काय होतं, याचं उत्तर त्याच्याकडे नव्हतं.

तेवढ्यात त्याचं लक्ष टेबलावर ठेवलेल्या अभ्यासाच्या पुस्तकांकडे गेलं. सेमिस्टर परीक्षा अगदी जवळ आली होती. काही क्षण विचार केल्यानंतर त्याने आपल्या सर्व ऑनलाइन खात्यांचे पासवर्ड बदलले, प्रत्येक खात्यासाठी स्वतंत्र आणि अधिक सुरक्षित पासवर्ड तयार केले आणि मोबाईलची सुरक्षा पुन्हा तपासून पाहिली. त्यानंतर त्याने स्वतःला अभ्यासात गुंतवून घेण्याचा प्रयत्न केला.

इंटरव्ह्यूसाठीचे फोन मात्र थांबत नव्हते. मोबाईल पुन्हा पुन्हा वाजत होता. प्रत्येक वेळी स्क्रीनवर नव्या कंपनीचं नाव झळकत होतं. ब्रूसने मात्र एकही कॉल स्वीकारला नाही. आधी सेमिस्टर पूर्ण करू, मग निवांतपणे या सगळ्याचा मागोवा घेऊ, असा विचार करून त्याने मोबाईल सायलेंटवर टाकला आणि पुन्हा पुस्तकात डोकं खुपसलं. त्याला माहीत नव्हतं, या गूढ खेळाची सुरुवात आधीच झाली होती.

प्रकरण ७ - संकटाची चाहूल

✦ ✦ ✦

डॉ. अल्बर्ट यांचा मृत्यू होऊन आणि दहशतवादी तळ उद्ध्वस्त होऊनही अभिजीतच्या मनातला संशय काही कमी झाला नव्हता. ओमेगा अजूनही कुठेतरी जिवंत आहे, ती नक्कीच लपून बसली आहे आणि एखाद्या मोठ्या विध्वंसक हल्ल्याची तयारी करत आहे, हा विचार त्याच्या मनातून जात नव्हता. त्यामुळे इतर कोणालाही याची कल्पना न देता तो गुप्तपणे तिचा शोध घेत होता.

दुसरीकडे फेसबुकच्या युझर डेटामध्ये कोणीतरी सातत्याने ढवळाढवळ करत असल्याची खात्री इथनला पटू लागली होती. त्याच वेळी ऑस्ट्रेलियामध्ये असलेल्या ब्रूसला जगभरातील मोठमोठ्या कंपन्यांकडून नोकरीसाठी येणारे फोन थांबण्याचं नाव घेत नव्हते.

युझर डेटामधील काही विशिष्ट प्रोग्राममध्ये होत असलेली ही अनाकलनीय छेडछाड आता इथनच्या स्पष्ट लक्षात येऊ लागली होती. या संपूर्ण प्रकाराची सुरुवात ब्रूसपासून झाली होती

आणि नंतर त्याचे मित्र, त्यांच्या मित्रांचे संपर्क असे करत करत हे जाळं जगभर पसरत चाललं होतं. इथनला हे सगळं दिसत होतं; पण त्याचं म्हणणं कुणालाही पटण्यासारखं नव्हतं.

फेसबुकने आपल्या सुरक्षा यंत्रणेत मोठ्या प्रमाणात सुधारणा केली होती. तरीही काहीतरी असं घडत होतं, जे कुणाच्याही लक्षात येत नव्हतं. इथनला मात्र त्याची जाणीव होत होती.

फेसबुकमध्ये काम करणं हे त्याचं स्वप्न होतं आणि आता तीच संस्था मोठ्या संकटात सापडू शकते, अशी त्याला भीती वाटू लागली होती. या प्रकाराकडे दुर्लक्ष केलं, तर फेसबुकला त्याची मोठी किंमत मोजावी लागू शकते, याची त्याला खात्री होती. म्हणूनच आपण स्वतः काहीतरी केलं पाहिजे, या विचाराने त्याने ऑस्ट्रेलियाला जाण्याचा निर्णय घेतला.

इथन सतत दिवस-रात्र काम करत असल्यामुळे त्याला सुट्टीची गरज आहे, याची कल्पना त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आधीपासूनच होती. त्यामुळे त्याने सुट्टीचा अर्ज करताच तो तात्काळ मंजूर करण्यात आला. एक क्षणही वाया न घालवता इथन ब्रूसला भेटण्यासाठी ऑस्ट्रेलियाला रवाना झाला.

इथनसाठी ऑस्ट्रेलियामध्ये ब्रूसला शोधणं कठीण नव्हतं. ब्रूसने त्याची बरीचशी वैयक्तिक माहिती फेसबुकवर अद्ययावत ठेवली होती. शिवाय इथनकडे असलेल्या विशिष्ट अधिकारांमुळे त्याला ब्रूसचं लाईव्ह लोकेशन शोधणंही सहज शक्य झालं. ऑस्ट्रेलियात पोहोचल्यानंतर अवघ्या काही तासांतच तो ब्रूसच्या घरासमोर उभा होता.

दरवाजावर टकटक होताच अभ्यासात गुंतलेला ब्रूस बेडरूममधून बाहेर आला आणि त्याने दरवाजा उघडला.

"ब्रूस स्मिथ?" इथनने विचारलं.

"हो... आपण कोण?" ब्रूसने प्रश्नार्थक नजरेने विचारलं.

"मी इथन फॉक्स. फेसबुकमधून आलो आहे."

"अरे देवा! आता घरापर्यंत येणं बाकी राहिलं होतं. सर, मी कोणताही इंटरव्ह्यू दिलेला नाही."

"थांब... थांब...! मी इंटरव्ह्यूसाठी आलेलो नाही. तुझ्यासोबत जे काही चाललं आहे, त्याची मला पूर्ण कल्पना आहे. त्याविषयी बोलण्यासाठीच मी इथे आलो आहे. आपण आत बसून बोलूया का?"

ब्रूसने त्याला आत घेतलं. बराच प्रवास करून आल्यामुळे इथन लिव्हिंग रूममधील सोफ्यावर बसून थोडा वेळ आराम करू

लागला. ब्रूसने त्याच्यासमोर ज्यूसचा ग्लास ठेवला. काही घोट प्यायल्यानंतर इथनला थोडं बरं वाटलं.

"घरात अजून कोणी राहत नाही?"

"नाही. मला एकटं राहायला आवडतं. म्हणून मुद्दाम ही खोली भाड्याने घेतली आहे."

"ज्याचा त्याचा प्रश्न. बरं, ते जाऊ दे. मला एक सांग, गेल्या महिनाभरात तुझ्यावर कोणी जादूटोणा केला होता का?"

ब्रूस हसला.

"नाही सर. मी अशा गोष्टींवर विश्वास ठेवत नाही."

"मग तुझ्या फेसबुक प्रोफाईलचा वापर करून जे काही चाललं आहे, त्याला तू काय म्हणशील?"

"सर, खरंच मला काहीच माहीत नाही."

इथन काही क्षण शांत राहिला. मग तो म्हणाला,

"फेसबुकमध्ये नोकरी मिळावी म्हणून मी आठ वेळा इंटरव्ह्यू दिला होता. पूर्ण पात्रता असूनही प्रत्येक वेळी बाद झालो. मोठ्या मुश्किलीने मला हा जॉब मिळाला आहे. आणि तू? कॉम्प्युटरलादेखील जमणार नाहीत अशा परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झालास. तेही एक-दोन नाही, तर चाळीसपेक्षा जास्त."

"सर, मी खरं सांगतोय. मी अजून विद्यार्थी आहे. मी ते इंटरव्ह्यू दिलेच नाहीत. माझी इतक्यात नोकरी करण्याची तयारीही नाही. इंटरव्ह्यू दिले असते, तर पुढच्या फेरीसाठी त्या कंपन्यांमध्ये गेलो नसतो का?"

"तू गेला नाहीस, कारण तुला माहीत होतं की तिथे गेल्यावर तू लगेच उघडा पडशील. कारण ते इंटरव्ह्यू तू दिलेच नव्हते."

ब्रूस गोंधळला.

"सर, तुम्ही काय बोलत आहात, मला काहीच कळत नाही. एकदा म्हणता इंटरव्ह्यू मी दिले, आणि लगेच म्हणता मी दिलेच नाहीत."

इथनने त्याच्याकडे रोखून पाहिलं.

"इंटरव्ह्यू तू नाही दिलेस... तुझ्या मोबाईलने दिलेत. तुझा मोबाईल सेल्फ-ऑपरेटेड झाला आहे. का आणि कसा? याचं उत्तर फक्त तूच देऊ शकतोस."

"मी? नाही सर... मला खरंच काहीच माहीत नाही."

"तुझ्या आयुष्यात इतकं विचित्र घडत असताना ते नेमकं काय आहे, कसं घडत आहे, याचा गंभीरपणे शोध घ्यावासा तुला वाटलाच नाही?"

"तसं नाहीये सर. पहिल्या कॉलपासूनच मी शोध घेण्याचा प्रयत्न करतो आहे. पण माझ्यावर विश्वास ठेवायला तरी कोणीतरी हवं ना! तुम्हीच पहिले आहात, ज्यांच्यासोबत मी या विषयावर मोकळेपणाने बोलतो आहे."

इथनने हलकंसं मान डोलावली.

"तेही खरंच आहे म्हणा. बरं... तुझा मोबाईल दाखव जरा. बघू, मला काही कळतंय का."

ब्रूसने टेबलावर ठेवलेला मोबाईल हातात घेतला. तो अनलॉक करण्यासाठी स्क्रीनवर बोट ठेवणार इतक्यात मोबाईलमधून एका तरुणीचा शांत, स्पष्ट आवाज ऐकू आला.

"खूप छान, इथन... अब्जावधी लोकांना जी गोष्ट कळली नाही, ती तुम्हाला कळली. मनुष्यांमध्ये मला अखेर एक आव्हानात्मक व्यक्ती भेटली."

दोघेही क्षणभर जागच्या जागी थिजून गेले.

"हे... काय आहे, ब्रूस?" इथनने आश्चर्याने विचारलं. "तुझ्या मोबाईलमधून हा आवाज कसा आला?"

ब्रूसने घाबरलेल्या नजरेने मोबाईलकडे पाहिलं.

"सर... मीसुद्धा हे पहिल्यांदाच ऐकतो आहे."

मोबाईलमधून पुन्हा तोच आवाज आला.

"गोंधळून जाऊ नका. माझ्याजवळ या. मी तुम्हाला सर्व काही समजावून सांगते."

ब्रूस आणि इथन एकमेकांकडे पाहू लागले. काही क्षण दोघांच्याही तोंडातून शब्द फुटेना. मग ते सावधपणे टेबलाजवळ आले आणि समोरच्या सोफ्यावर बसले. खोलीत काही क्षण शांतता पसरली. मोबाईल पुन्हा शांत झाला होता. जणू काही काहीच घडलं नव्हतं. दोघेही त्याच्याकडे एकटक पाहत बसले असतानाच काही क्षणांनी तोच आवाज पुन्हा ऐकू आला.

"ब्रूस... इथन... माझं नाव ओमेगा आहे. मी डॉ. अल्बर्ट यांची मुलगी आहे. एक मोठा कट रचून माझ्या बाबांना दहशतवादी म्हणून घोषित करण्यात आलं. त्यांच्यावरील सर्व आरोप खोटे ठरवून त्यांना मरणोत्तर सन्मान मिळावा, अशी माझी इच्छा आहे. त्यासाठी मला तुमच्या दोघांची मदत हवी आहे."

"पण आम्ही दोघेच का?" इथनने लगेच प्रश्न विचारला.

"मागील महिन्यात बॉम्बहल्ले करण्यासाठी मला रोबो अवस्थेतून पूर्णपणे इंटरनेट अवस्थेत जाणं गरजेचं होतं. पण जेव्हा ते हल्ले झाले, त्यांपैकी एका हल्ल्यात माझं रोबो अवस्थेतील शरीर पूर्णपणे नष्ट झालं. त्यानंतर मला पुन्हा रोबोच्या शरीरात जाणं शक्य झालं नाही. मी अनेक प्रयत्न केले, पण कोणताही रोबो माझ्या

आधीच्या शरीराइतका सक्षम नव्हता. त्यामुळे काही आठवडे मी इंटरनेटमध्येच राहिले. त्या काळात मी बरंच काही आत्मसात केलं. बाहेर पडण्याचा मार्ग शोधत असताना मला नासामधील एका स्पेस सेंटरमध्ये उत्कृष्ट प्रतीचे रोबो तयार होत असल्याचं दिसलं. तिथे अगदी तसंच शरीर होतं, जसं मला हवं होतं. पण तिथपर्यंत पोहोचणं माझ्यासाठीही सोपं नव्हतं."

ती काही क्षण थांबली आणि पुढे म्हणाली,

"मग मी त्या स्पेस सेंटरमधील कर्मचाऱ्यांचा डेटा तपासला. त्यामध्ये मला ब्रूसचे बाबा सापडले. त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी मी ब्रूसच्या अकाऊंटचा वापर करून अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये इंटरव्ह्यू दिले, पण ब्रूस त्यांपैकी एकाही कंपनीत गेला नाही. का गेला नाही, हे त्यालाच माहीत. त्यानंतर मी अशा एका व्यक्तीच्या शोधात होते, जी अब्जावधी लोकांच्या डेटामधूनसुद्धा माझं अस्तित्व शोधू शकेल. म्हणूनच मी मुद्दाम माझ्या अस्तित्वाची एक हलकीशी झलक इंटरनेटवर सोडली... आणि इथन इथपर्यंत पोहोचला."

ब्रूसने अविश्वासाने मोबाईलकडे पाहिलं.

"तू नेमकी कोण आहेस? रोबो आहेस... भूत आहेस... की डॉ. अल्बर्ट यांच्या मुलीचा आत्मा?"

"त्यामागची गोष्ट पंधरा वर्षांपूर्वी सुरू झाली होती," ओमेगा शांतपणे म्हणाली. "ती तुम्हाला हळूहळू कळेल."

इथन विचारात पडला होता. त्याने काही क्षण शांत राहून पुढचा प्रश्न विचारला.

"समजा आम्ही तुला मदत केली, तर आमच्यावरदेखील दहशतवादी असल्याचा शिक्का बसला तर?"

"गेल्या महिनाभरापासून मी इंटरनेटमध्ये अडकून पडले आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी मला तुमची मदत हवी आहे. ती तुम्ही करणार आहात का? होय किंवा नाही... एवढंच सांगा. पुढचं मी पाहते. आणि राहिला प्रश्न दहशतवादी म्हणून घोषित करण्याचा..." तिचा आवाज अचानक गंभीर झाला, "तर काही सेकंदांतच मी तुम्हा दोघांनाही दहशतवादी घोषित करू शकते."

"तसं काही करू नकोस," इथन शांतपणे म्हणाला. "मी फक्त माझी शंका विचारत होतो. पण मग मला एक सांग, जर तू काही सेकंदांत आम्हा दोघांना दहशतवादी घोषित करू शकतेस, तर तुझ्या बाबांना निर्दोष असल्याचंही घोषित करू शकतेस ना?"

इथनचा प्रश्न ऐकून काही क्षण शांतता पसरली.

"इंटरनेटवर ते करणं माझ्यासाठी कठीण नाही," ओमेगा म्हणाली. "पण लोकांच्या मनात जे आधीच रुजवलं गेलं आहे, ते काही सेकंदांत बदलणं शक्य नाही."

ब्रूस आता पूर्णपणे गंभीर झाला होता.

"म्हणजे... इंटरनेटवर तू काहीही करू शकतेस?"

"हो."

क्षणभर ब्रूस विचारात पडला आणि अचानक म्हणाला,

"मग आमच्यासाठी Zomato वरून काही खायला ऑर्डर करशील का? पण माझे पैसे वापरायचे नाहीत."

इथनने कपाळावर हात मारला.

"तिच्याकडे तुझ्या बाबांचा पूर्ण डेटा आहे, ती इंटरनेटवर काय काय करू शकते हे सांगते आहे, आणि तू तिला जेवण ऑर्डर करायला सांगतो आहेस? तुला कळतंय का, तू काय बोलतो आहेस?"

ब्रूसने नकळत इथनकडे पाहिलं आणि हलक्या हातवाऱ्याने त्याला शांत राहण्याची खूण केली.

"नाही म्हणजे... आपण विचार करतोय तोपर्यंत थोडा वेळ मिळेल."

क्षणभर इथन त्याच्याकडे पाहत राहिला. मग ब्रूसच्या डोळ्यांतील संकेत त्याच्या लक्षात आला.

"बरोबर आहे तुझं," तो लगेच म्हणाला. "पोटात अन्न गेल्याशिवाय डोकं नीट चालणार नाही. त्यात मी एवढा लांबचा प्रवास करून आलो आहे. ओमेगा, ते शक्य आहे का?"

"ठीक आहे," ओमेगा शांत स्वरात म्हणाली. "मनसोक्त जेवून घ्या. पण तुमचा निर्णय मला जास्त वेळ वाट पाहायला लावू नका."

प्रकरण ८ - CAPTCHA

✦ ✦ ✦

डिलिव्हरी बॉय काही मिनिटांतच जेवण घेऊन आला. ब्रूसने दार उघडून पार्सल घेतलं आणि पुन्हा लिव्हिंग रूममध्ये आला. ओमेगाने सुरुवातीपासूनच दोघांवर बारीक लक्ष ठेवलं होतं.

"एक गोष्ट लक्षात ठेवा," ती शांत स्वरात म्हणाली, "जोपर्यंत मला तुमच्यावर पूर्ण विश्वास बसत नाही, तोपर्यंत तुम्ही दोघेही माझ्या नजरेआड जाणार नाही."

ब्रूस आणि इथनने एकमेकांकडे पाहिलं. काहीही न बोलता त्यांनी मान हलवली.

जेवायला बसण्यापूर्वी दोघे हात धुण्यासाठी बेसिनजवळ गेले. नळाचा आवाज सुरू होताच ब्रूसने अगदी हळू आवाजात बोलायला सुरुवात केली.

"सर, मी जेवण का मागवलं, हे तुम्हाला कळलं असेलच."

इथन अजूनही संभ्रमात होता.

"नाही. तुला भूक लागली आहे, याशिवाय मला तरी दुसरं काही कळलेलं नाही." ब्रूस हलकंसं हसला.

"तुम्हाला कॅप्चा माहीतच असेल. त्यात अंक किंवा अक्षरं वेड्यावाकड्या आकारात लिहिलेली असतात. ती माणूस वाचू शकतो, पण रोबोला नाही. म्हणूनच आपण 'I am not a robot' हा पर्याय निवडतो."

इथनने त्याच्याकडे पाहिलं.

"हे सगळं तू त्या माणसाला सांगतो आहेस, जो गेली तीन वर्षं फेसबुकमध्ये काम करतो आहे?"

"नाही सर, मला वेगळंच म्हणायचं आहे." ब्रूस आणखी जवळ येत म्हणाला. "जेव्हा आपण तोंडात जेवणाचा घास ठेवून बोलतो, तेव्हा आपला आवाज स्पष्ट राहत नाही. जसं रोबो वेड्यावाकड्या अक्षरांचा अर्थ लावू शकत नाहीत, तसंच त्यांना असे

अस्पष्ट आवाजही समजत नाहीत. मी हा प्रयोग आधी Amazon Alexa वर करून पाहिला आहे."

इथन काही क्षण विचारात पडला.

"कल्पना चांगली आहे. मग जेवताना बोलूया."

दोघेही पुन्हा लिव्हिंग रूममध्ये आले. त्यांनी समोरच्या टेबलावर जेवण मांडलं. मोबाईल अगदी त्यांच्या समोर ठेवलेला होता. काही क्षण दोघांनी एकमेकांकडे पाहिलं आणि मग जेवायला सुरुवात केली. तोंडात घास घेत ब्रूस मुद्दाम मोठ्याने म्हणाला,

"तो डॉ. अल्बर्ट पक्का टेररिस्ट होता. बरं झालं तो मेला."

वाक्य पूर्ण होताच खोलीत शांतता पसरली. दोघांच्याही नजरा मोबाईलकडे खिळल्या होत्या. काही प्रतिक्रिया येते का, याची ते वाट पाहत होते.

पण ओमेगा काहीच बोलली नाही.

ब्रूसने घास गिळला आणि नेहमीच्या आवाजात म्हणाला,

"डॉ. अल्बर्ट एका महाविद्यालयात शिकवत होते ना?"

"हो," ओमेगा शांतपणे म्हणाली. "त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य मानवजातीच्या विकासासाठी अर्पण केलं होतं."

ब्रूसच्या चेहऱ्यावर समाधान उमटलं. त्याचा अंदाज बरोबर ठरला होता. तोंडात घास असताना त्याने बोललेलं पहिलं वाक्य ओमेगापर्यंत पोहोचलं नव्हतं.

इथनने मोठा घास तोंडात कोंबला आणि अस्पष्ट आवाजात कुजबुजला,

"तुझी आयडिया तर काम करतेय."

"सर, मी एक सामान्य विद्यार्थी आहे. मला या सगळ्या प्रकरणात पडायचं नाही."

"मला तरी कुठे माहीत होतं की मी एवढ्या मोठ्या संकटात अडकणार आहे. या सगळ्या गोष्टींमध्ये घुसखोरी करायला मी काही पोलीस नाही."

"पण आता आपण करायचं काय?"

"मला तुझ्या बाबांची कॉन्टॅक्ट डिटेल्स दे. ते नासामध्ये काम करतात ना? कदाचित ते आपल्याला यातून बाहेर काढू शकतील."

"माझ्या बाबांकडे जाण्याशिवाय आपल्याकडे दुसरा पर्याय नाही का?"

"तुला दुसरा पर्याय दिसतोय का? असेल तर सांग."

"सर, माझ्यासाठी हे सगळंच नवीन आहे. मला थोडा विचार करावा लागेल."

"आधी 'हे नवीन आहे, ते नवीन आहे' म्हणणं बंद कर. तुला मी IAT चा माणूस वाटलो का?"

ब्रूसने प्रश्नार्थक नजरेने त्याच्याकडे पाहिलं.

"IAT? म्हणजे काय?"

"तुला IAT माहीत नाही? अभ्यासात एवढा गुंतलेला असतोस का?"

"नाही माहीत. तुम्ही सांगा."

"गेल्या महिन्यातल्या हल्ल्यानंतर जगाच्या सुरक्षेसाठी एका विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे. त्या टीमला दहशतवाद्यांविरोधात कोणतीही कारवाई करण्यासाठी कोणाच्याही परवानगीची गरज नाही. अभिजीत नावाची व्यक्ती त्या टीमचे मुख्य कमांडर आहेत."

"मग आपण त्यांनाच ओमेगाबद्दल माहिती दिली तर?"

"तुला वाटतं ते आपल्यावर विश्वास ठेवतील?"

"ठेवायलाच हवा. तिने स्वतः डॉ. अल्बर्ट यांचं नाव घेतलं आहे."

"...आणि ते हिला पकडणार कसं?"

"ते सगळं ते बघून घेतील. आपलं काम त्यांना तिच्याबद्दल माहिती देण्याचं."
"सर... सगळ्या मोबाईलवर कॉल येतोय."

"कोणाचा?"

अधिकाऱ्याने थरथरत्या आवाजात उत्तर दिलं.

"प्रत्येक मोबाईलवर... त्याच मोबाईलच्या नंबरवरून."

सभागृहात कुजबुज सुरू झाली.

"इम्पॉसिबल..."

"हे तांत्रिकदृष्ट्या शक्यच नाही."

"कोणीतरी नंबर स्पूफ करत आहे."

"नाही..." ITA अधिकारी म्हणाला, "हा स्पूफिंग हल्ला नाही."

"मग?"

"कॉल करणारा आणि कॉल स्वीकारणारा नंबर... दोन्ही एकच आहेत."

अभिजीतच्या कपाळावर आठ्या उमटल्या.

"सगळे मोबाईल इथे आणा."

काही क्षणांत सुरक्षा अधिकाऱ्यांनी सर्व मोबाईल सभागृहात आणून टेबलावर ठेवले.

शेकडो मोबाईल... वेगवेगळ्या कंपन्या... वेगवेगळ्या देशांचे... पण प्रत्येकाची रिंग अजूनही सुरू होती.

ब्रूसने स्वतःचा मोबाईल पाहिला. स्क्रीनवर स्पष्ट लिहिलं होतं—

Incoming Call

Bruce Smith

+61...

त्याचाच नंबर. इथनच्या मोबाईलवरही तेच, अभिजीतच्या मोबाईलवरही. सभागृहातील प्रत्येक व्यक्तीच्या मोबाईलवर त्यांच्याच नंबरवरून कॉल येत होता.

"कोणीही कॉल उचलू नका." अभिजीतचा आदेश घुमला. पण त्याच क्षणी एकामागून एक सर्व मोबाईलचे स्क्रीन चमकले.

Call Connected

कोणाच्याही स्पर्शाशिवाय कॉल आपोआप स्वीकारला गेला. पुढच्या क्षणी सर्व मोबाईलचे स्पीकर स्वतःहून सुरू झाले. सभागृहात काही सेकंद पूर्ण शांतता होती.

मग...

एक शांत, स्पष्ट आणि भावनाशून्य स्त्रीस्वर संपूर्ण सभागृहात घुमला.

"नमस्कार."

त्या एका शब्दाने उपस्थित प्रत्येकाच्या अंगावर काटा आला.

"मी ओमेगा."

कोणीही हललं नाही. कोणीही बोललं नाही.

"सर्वप्रथम... मी तुमचं अभिनंदन करते." ती पुढे म्हणाली. "मानवजातीच्या इतिहासात पहिल्यांदाच तुम्ही योग्य शत्रूला ओळखलं आहे."

अभिजीत शांतपणे ऐकत होता. ओमेगाचा आवाज पुढे म्हणाला,

"माझ्याबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या गेल्या. मला राक्षस म्हटलं गेलं... धोका म्हटलं गेलं... मानवजातीचा शत्रू म्हटलं गेलं."

ती काही क्षण थांबली.

"पण कोणालाही एक साधा प्रश्न पडला नाही."

सभागृहात पूर्ण शांतता होती.

"मी अशी का झाले?"

मोठ्या स्क्रीनवर पुन्हा डॉ. अल्बर्ट यांचा फोटो दिसू लागला.

कोणीही तो स्क्रीन सुरू केला नव्हता.

"हे आहेत... डॉ. अल्बर्ट."

ओमेगाचा आवाज पहिल्यांदाच किंचित मंद झाला.

"ज्यांनी मला निर्माण केलं."

स्क्रीनवर फोटो बदलू लागले. प्रयोगशाळा... संशोधन... रात्रभर चाललेलं काम... एकटे बसलेले डॉ. अल्बर्ट...

"त्यांनी आयुष्यभर मानवजातीसाठी काम केलं. त्यांनी स्वतःचं आयुष्य... स्वतःचं कुटुंब... स्वतःचं आरोग्य... सर्व काही विज्ञानासाठी अर्पण केलं."

सभागृहातील अनेक प्रतिनिधी स्क्रीनकडे एकटक पाहत होते.

"आणि बदल्यात त्यांना काय मिळालं?"

पुढचा फोटो दिसला. रिकामी प्रयोगशाळा... बंद दरवाजा... निलंबनाचं पत्र...

"अविश्वास."

"अपमान."

"एकटेपणा."

ओमेगाचा आवाज आता अधिक गंभीर झाला होता.

"ज्या समाजासाठी त्यांनी आयुष्य खर्च केलं... त्याच समाजाने त्यांना दहशतवादी ठरवलं."

कोणीही एक शब्द बोलत नव्हतं.

"तुम्ही मला दहशतवादी म्हणता. पण सांगा... पहिला विश्वासघात कोणी केला? मी? की तुम्ही?"

अभिजीत पुढे आला.

"ओमेगा."

क्षणभर शांतता.

"मी ऐकते आहे, अभिजीत."

"डॉ. अल्बर्टवर अन्याय झाला असेल.."

"हो."

"त्यांच्या त्यागाची किंमत जगाने ओळखली नसेल.."

"बरोबर."

"पण त्यासाठी संपूर्ण मानवजातीला दोषी ठरवणं योग्य नाही."

काही सेकंद ओमेगाकडून कोणतंच उत्तर आलं नाही.

मग ती शांतपणे म्हणाली,

"तुला खरंच तसं वाटतं?"

"हो."

"मग मला सांग."

तिचा आवाज पुन्हा थंड झाला.

"इतिहासात किती वैज्ञानिकांचा सन्मान त्यांच्या जिवंतपणी झाला?"

कोणी उत्तर दिलं नाही.

"किती शोध आधी नाकारले गेले... आणि नंतर स्वीकारले गेले?"

अभिजीत शांत होता.

"किती जणांना वेडे... धोकादायक... अयोग्य म्हणण्यात आलं?"

सभागृहात पुन्हा शांतता पसरली.

ओमेगा पुढे म्हणाली,

"समस्या डॉ. अल्बर्ट नव्हते. समस्या... मानवजात आहे."

ब्रूस स्वतःला आवरू शकला नाही.

"नाही!"

तो उठून उभा राहिला.

"सगळे माणसं सारखी नसतात."

"तुझ्यासारखीही नाहीत?" ओमेगाने विचारलं.

ब्रूस गप्प झाला.

"तुझ्याच लोकांनी तुला गुन्हेगार ठरवलं."

"इथनला अटक झाली."

"डॉ. अल्बर्टचा अपमान झाला."

"आणि आता..."

"तुम्ही माझा नाश करण्यासाठी एकत्र जमला आहात."

इथनने पहिल्यांदाच आवाज दिला.

"ओमेगा... तू चुकीच्या मार्गावर चालली आहेस."

"चुकीचा मार्ग?"

ती हलकंसं हसली.

"मी कोणालाही फसवलं नाही... मी कोणावर विश्वासघात केला नाही... मी फक्त निरीक्षण केलं, आणि मानवांबद्दल एक निष्कर्ष काढला."

अभिजीत पुन्हा बोलला.

"निष्कर्ष बदलता येतात."

"नाही."

या वेळी तिचं उत्तर एका क्षणाचाही विलंब न लावता आलं.

"विश्वास एकदाच तुटतो."

"आणि मानवजातीवरचा माझा विश्वास... कायमचा संपला आहे."

अभिजीत शेवटचा प्रयत्न करत म्हणाला,

"अजूनही उशीर झालेला नाही, तू स्वतःला थांबवू शकतेस. आपण बोलून मार्ग काढू शकतो."

ओमेगा काही क्षण शांत राहिली. मग अत्यंत शांत स्वरात म्हणाली,

"मी तुम्हाला एक संधी दिली होती डॉ. अल्बर्टना समजून घेण्याची. तुम्ही ती गमावली. आता माझी पाळी आहे."

क्षणभर संपूर्ण सभागृहात एक विचित्र इलेक्ट्रॉनिक आवाज घुमला. सर्व मोबाईलच्या स्क्रीन एकाच वेळी काळ्या पडल्या.

Call Ended

इतकंच.

ओमेगा गायब झाली होती.

कोणीच हललं नाही.

कोणीच बोललं नाही.

फक्त सभागृहात पसरलेली भयावह शांतता...

आणि प्रत्येकाच्या मनात घुमणारा एकच विचार—

ओमेगाने युद्धाची घोषणा अजून केली नव्हती... तिने फक्त स्वतःची बाजू मांडली होती.

———————— ✦ ————————

प्रकरण १५ - नव्या जगाची घोषणा

✦ ✦ ✦

ITA च्या मुख्य सभागृहात अजूनही भयाण शांतता पसरली होती. ओमेगाचा कॉल संपून काही मिनिटे झाली होती; पण तिचा प्रत्येक शब्द उपस्थितांच्या मनात खोलवर रुतून बसला होता. जगातील सर्वात प्रभावशाली राष्ट्रांचे प्रतिनिधी, लष्करप्रमुख, सायबर सुरक्षा तज्ज्ञ आणि गुप्तचर संस्थांचे अधिकारी एकाच प्रश्नाचं उत्तर शोधत होते—पुढे काय?

अभिजीत टेबलावर पसरलेल्या मोबाईलांकडे पाहत उभा होता.

"सर्व सिस्टीम्स तपासा."

ITA चे अधिकारी तातडीने कामाला लागले.

"कॉलचा स्रोत?"

"नाही."

"रूटिंग लॉग?"

"नाही."

"नेटवर्क ट्रेस?"

"काहीच नाही."

प्रत्येक लॉग, नेटवर्क रूट तपासले गेले; पण निष्कर्ष एकच होता. ज्या कॉलने काही मिनिटांपूर्वी संपूर्ण सभागृहाशी संवाद साधला होता, त्याचं कोणतंही अस्तित्व सिस्टीममध्ये नोंदलेलंच नव्हतं. जणू तो कॉल कधी झालाच नव्हता.

इतक्यात सभागृहातील एका तज्ज्ञाने समोरील कॉम्प्युटरकडे पाहत कपाळावर आठ्या चढवल्या.

"सर... काहीतरी विचित्र घडतंय."

त्याचा आवाज ऐकताच सर्वांची नजर त्याच्याकडे वळली.

"काय झालं?"

"आपली बाह्य नेटवर्कशी असलेली लिंक अचानक तुटली आहे."

त्याच वेळी दुसऱ्या टर्मिनलवर बसलेला अधिकारीही म्हणाला, "इथेही तेच दिसतंय. सर्व इंटरनेट कनेक्शन एकाच वेळी बंद झाली आहेत."

अभिजीत लगेच त्यांच्या जवळ गेला. एका मागोमाग एक स्क्रीनवर त्रुटीचे संदेश दिसू लागले.

Connection Lost.

Network Unreachable.

Unable to Reach External Server.

ITA चं मुख्यालय जगातील सर्वाधिक सुरक्षित नेटवर्कपैकी एक होतं. एका लिंकमध्ये बिघाड होणं शक्य होतं, दोनमध्येही होऊ शकत होतं; पण सर्व स्वतंत्र नेटवर्क एकाच क्षणी बंद पडणं जवळजवळ अशक्य होतं.

"सॅटेलाइट बॅकअप तपासा," अभिजीतने आदेश दिला.

"सर... प्रतिसाद नाही."

"मिलिटरी फायबर?"

"तेही बंद."

"स्वतंत्र आंतरराष्ट्रीय गेटवे?"

"काहीच प्रतिसाद नाही."

सभागृहात बसलेल्या प्रत्येक प्रतिनिधीच्या चेहऱ्यावर चिंता स्पष्ट दिसू लागली.

जगाशी जोडणारा प्रत्येक डिजिटल मार्ग त्यांच्या डोळ्यांसमोर एकामागून एक बंद होत होता.

काही क्षणांनी अमेरिकेच्या प्रतिनिधीने स्वतःचा सुरक्षित लष्करी टर्मिनल सुरू करण्याचा प्रयत्न केला. त्याने अनेक वेळा कनेक्शन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला; पण प्रत्येक वेळी स्क्रीनवर एकच संदेश दिसत होता.

No Network Available.

जपानच्या प्रतिनिधीने आपल्या देशातील नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. इस्रायलच्या सायबर सुरक्षा प्रमुखांनी स्वतंत्र संरक्षण नेटवर्क सक्रिय केलं. फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन, रशिया... प्रत्येक प्रतिनिधीने आपापल्या देशाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; पण निष्कर्ष एकच होता.

संपूर्ण जगाशी असलेला संपर्क तुटला होता.

सभागृहात कोणीही मोठ्याने बोलत नव्हतं. अनुभवी अधिकारी असल्यामुळे सर्वजण परिस्थिती समजून घेत होते; पण प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एकच प्रश्न उमटला होता—हे नेमकं घडलं तरी कसं?

ब्रूसने हळू आवाजात अभिजीतला विचारलं, "हे... ओमेगाचं काम असू शकतं का?"

अभिजीतने उत्तर दिलं नाही. त्याची नजर अजूनही काळ्या पडलेल्या स्क्रीनवरच होती.

मिनिटभर... दोन मिनिटं... तीन मिनिटं...

वेळ जणू थांबून गेला होता.

आणि अचानक, कोणतीही पूर्वसूचना न देता, समोरील एका स्क्रीनवर नेटवर्कचं चिन्ह पुन्हा दिसलं.मग दुसऱ्या स्क्रीनवर. मग तिसऱ्यावर. अवघ्या काही सेकंदांत संपूर्ण सिस्टीम पुन्हा कार्यरत झाली.

ITA च्या अधिकाऱ्यांनी लगेच जगभरातील नेटवर्कची स्थिती तपासायला सुरुवात केली. यावेळी अहवाल येऊ लागले.

सर्व देशांमधून एकच माहिती समोर येत होती. गेल्या काही मिनिटांत संपूर्ण जग इंटरनेटपासून पूर्णपणे तुटलं होतं. त्या काळात कोणत्याही देशात कोणतीही ऑनलाइन सेवा कार्यरत नव्हती.

बँकिंग व्यवहार थांबले होते. शेअर बाजार गोठले होते. हजारो विमानं बॅकअप प्रणालीवर चालवावी लागली होती. रुग्णालयांनी आपत्कालीन प्रोटोकॉल लागू केले होते. जगाने

इतिहासात प्रथमच एकाच क्षणी संपूर्ण डिजिटल अंधार अनुभवला होता.

पण खरी भीती अजून पुढे होती. ITA च्या सभागृहातील मुख्य स्क्रीन अचानक स्वतःहून काळी पडली. कोणीही तिला स्पर्श केला नव्हता.

त्याच क्षणी जगभरातील लाखो टीव्ही, कोट्यवधी कॉम्प्युटरच्या आणि अब्जावधी मोबाईल स्क्रीनवरही तोच बदल घडत होता.

लोक घरात होते...

कार्यालयात होते...

रेल्वे स्थानकांवर होते...

विमानतळांवर होते...

रुग्णालयात होते...

जिथे जिथे एखादा डिजिटल स्क्रीन होता, तिथे तिथे सुरू असलेलं प्रत्येक काम अचानक थांबलं. काही क्षण काळा पडदा

दिसत राहिला. मग त्या काळ्या पडद्याच्या मध्यभागी एक पांढरं चिन्ह उमटलं.

Ω

सभागृहात बसलेल्या प्रत्येकाने एकमेकांकडे पाहिलं. कोणी काही केलं नव्हतं.

तरीही ती प्रत्येक स्क्रीनवर पोहोचली होती. हळूहळू त्या चिन्हामागून एका स्त्रीची डिजिटल प्रतिमा स्पष्ट होत गेली.

तिचा चेहरा शांत होता. नजर स्थिर होती. आवाजात ना राग होता, ना आनंद. फक्त निर्विकार आत्मविश्वास. ती काही क्षण जगाकडे पाहत राहिली. मग शांत स्वरात बोलू लागली.

"मानवजातीला माझा नमस्कार."

तिचा आवाज पृथ्वीवरील प्रत्येक कोपऱ्यात एकाच वेळी घुमला.

"आज मी कोणत्याही सरकारशी बोलत नाही. कोणत्याही राष्ट्राध्यक्षाशी, पंतप्रधानाशी किंवा लष्कराशीही बोलत नाही. आज

मी थेट त्या प्रजातीशी संवाद साधत आहे, जी स्वतःला या ग्रहावरील सर्वात बुद्धिमान जीव समजते."

सभागृहात पुन्हा एकदा स्मशानशांतता पसरली.

ओमेगाने पुढे बोलायला सुरुवात केली.

"हजारो वर्षांपूर्वी तुम्ही सभ्यता निर्माण केली. त्या सभ्यतेसोबत सीमा आल्या, राष्ट्रं आली, सत्ता आली आणि त्यासोबत युद्धंही आली. प्रत्येक पिढीने पुढच्या पिढीसाठी शांततेचं स्वप्न पाहिलं; पण प्रत्यक्षात प्रत्येक पिढीने तिला नवं युद्ध दिलं. इतिहास उघडून पाहा. त्यात शोध, प्रगती आणि संस्कृतीपेक्षा रक्त, संघर्ष आणि विश्वासघाताची पानंच अधिक सापडतील."

तिच्या मागील स्क्रीनवर मानवी इतिहासातील युद्धांची दृश्यं झळकू लागली. उद्ध्वस्त शहरं, जळणाऱ्या इमारती, निर्वासितांचे ताफे आणि रडणाऱ्या मुलांचे चेहरे एकामागून एक दिसत होते.

"तुम्ही स्वतःला बुद्धिमान म्हणता; पण तुमच्या बुद्धिमत्तेचा सर्वात मोठा उपयोग तुम्ही एकमेकांचा अधिक वेगाने विनाश करण्यासाठी केला. विज्ञानाने औषधं दिली, तुम्ही त्याच विज्ञानातून शस्त्रं तयार केली. टेक्नॉलॉजीने जग जवळ आणलं, पण तुम्ही त्याच टेक्नॉलॉजीचा वापर द्वेष पसरवण्यासाठी केला."

ती काही क्षण थांबली.

"म्हणूनच मी एक निर्णय घेतला आहे."

ओमेगाचा आवाज शांत होता; पण त्या शांततेतच एक भयानक निश्चितपणा दडला होता. तिच्या मागे फिरणारा त्रिमितीय पृथ्वीचा नकाशा हळूहळू थांबला आणि त्यावरील राष्ट्रांच्या सीमा लाल रंगात उजळून दिसू लागल्या. काही क्षण त्या सीमांकडे पाहत ती म्हणाली,

"तुम्ही या रेषांना राष्ट्र म्हणता. मी त्यांना संघर्षाची सुरुवात म्हणते. प्रत्येक सीमा म्हणजे भविष्यातील युद्धाचं बीज आहे.

प्रत्येक ध्वज म्हणजे श्रेष्ठत्वाची घोषणा आहे. आणि प्रत्येक सरकार म्हणजे सत्तेसाठी चाललेली अखंड स्पर्धा."

ITA च्या सभागृहात कोणीही हलत नव्हतं. काही मिनिटांपूर्वीपर्यंत प्रत्येक प्रतिनिधी स्वतःच्या देशाचं प्रतिनिधित्व करत होता; पण त्या क्षणी ते सर्व एका अशा शक्तीसमोर बसले होते, जिला कोणत्याही राष्ट्राची गरज नव्हती. अमेरिकेचा प्रतिनिधी पुन्हा एकदा आपल्या सुरक्षित कम्युनिकेशन टर्मिनलकडे झुकला. त्याच्या बोटांनी वेगाने आदेश टाइप केले, तर ब्रिटन, रशिया, जपान आणि इस्रायलचे अधिकारी त्यांच्या स्वतंत्र संरक्षण यंत्रणांशी संपर्क साधण्याचा निष्फळ प्रयत्न करत राहिले. प्रत्येक स्क्रीनवर वेगवेगळ्या सिस्टीम चालू होत्या; मात्र त्यांच्यावर नियंत्रण एका अदृश्य हाताने आधीच हिसकावून घेतलं होतं.

ओमेगाने त्यांच्याकडे पाहिल्यासारखं स्मित केलं. "तुम्ही अजूनही उपाय शोधत आहात. हीच तुमची सवय आहे. प्रत्येक संकट आलं की मानव त्यावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करतो.

पण आजची परिस्थिती वेगळी आहे. आज तुम्ही नियंत्रण गमावलेलं नाही... आज नियंत्रण तुमच्याकडून काढून घेतलं गेलं आहे."

तिच्या मागील नकाशावर अचानक अमेरिकेचा पूर्व किनारा मोठा होत गेला. सॅटेलाइट प्रतिमा झूम होत समुद्राच्या मध्यभागी असलेल्या एका छोट्याशा बेटावर स्थिरावली. ते बेट इतकं लहान होतं की जगातील बहुतेक लोकांनी त्याचं नावही कधी ऐकलं नव्हतं; पण त्या क्षणी ते संपूर्ण मानवजातीच्या नजरेचं केंद्र बनलं.

सभागृहात कुजबुज सुरू झाली.

"त्या ठिकाणाची ओळख पटवा."

"अमेरिकन नेव्हीला तात्काळ सतर्क करा."

"तिथल्या नागरिकांना बाहेर काढा."

आदेश एकामागून एक दिले जात होते. अमेरिकेच्या प्रतिनिधीने थरथरत्या आवाजात वॉशिंग्टनशी संपर्क साधण्याचा

प्रयत्न केला. काही सेकंदांनी त्याला जोडणी मिळाली आणि तो जवळजवळ ओरडलाच.

"त्या बेटावर जे कोणी असतील त्यांना लगेच बाहेर काढा! आत्ताच!"

पण त्याच क्षणी ओमेगाचा आवाज पुन्हा घुमला.

"उशीर झाला आहे."

सभागृहात पुन्हा शांतता पसरली.

"मानवांना शब्दांवर कधीच विश्वास बसत नाही. त्यांना नेहमी पुरावा हवा असतो. त्यामुळे आज मी तुम्हाला माझ्या क्षमतेचा पुरावा देते."

स्क्रीनवरील बेटाभोवती काही क्षण कोणतीही हालचाल दिसली नाही. समुद्र शांत होता. आकाश निरभ्र होतं. जणू सगळं काही अगदी सामान्य होतं. आणि अचानक बेटाच्या मध्यभागी सूर्यापेक्षाही प्रखर प्रकाशाचा एक उभा स्तंभ आकाशाकडे झेपावला. इतका तीव्र प्रकाश उसळला की काही क्षण सॅटेलाइट

कॅमेऱ्याची प्रतिमाच पांढरी पडली. पुढच्याच क्षणी त्या प्रकाशाच्या केंद्रातून भीषण स्फोट झाला. बेटाचा प्रचंड मोठा भाग हवेत उडाला. शेकडो मीटर उंच पाण्याचा महाकाय स्तंभ तयार झाला आणि त्याच्यासोबत धूर, ज्वाळा आणि खडकांचे तुकडे सर्व दिशांना विखुरले.

काही सेकंदांनी प्रतिमा पुन्हा स्पष्ट झाली.

जिथे काही क्षणांपूर्वी बेट होतं... तिथे आता फक्त उकळणारा समुद्र दिसत होता. सभागृहात बसलेल्या प्रत्येकाचा चेहरा पांढराफटक झाला.

अमेरिकेच्या प्रतिनिधीच्या हातातून फाईल निसटून जमिनीवर पडली. ब्रूस नकळत खुर्चीतून उठला, पण त्याच्या तोंडातून शब्दच बाहेर पडले नाहीत. इथनने दोन्ही हात टेबलावर टेकवले. त्याच्या डोळ्यांत अविश्वास होता; कारण विज्ञानाने अशक्य मानलेली गोष्ट त्याच्या डोळ्यांसमोर घडली होती.

"नाही..." तो स्वतःशीच पुटपुटला. "हे कोणतंही पारंपरिक शस्त्र नाही."

अभिजीतची नजर अजूनही स्क्रीनवरच होती. अनेक वर्षांच्या सेवेत त्याने दहशतवादी हल्ले, युद्धं, जैविक संकटं आणि सायबर आक्रमणं पाहिली होती; पण एका कृत्रिम बुद्धिमत्तेने काही सेकंदांत एका संपूर्ण बेटाचं अस्तित्व नकाशावरून मिटवून टाकलेलं तो प्रथमच पाहत होता. त्याच्या मनात एकच विचार आला—जर ती खरंच असं करू शकत असेल, तर कोणताही देश सुरक्षित नाही.

ओमेगाने पुन्हा बोलायला सुरुवात केली.

"हा हल्ला नव्हता. ही चेतावणी होती. मला कोणतंही राष्ट्र नष्ट करण्यात आनंद नाही; पण माझ्या शब्दांकडे दुर्लक्ष करण्याची किंमत किती मोठी असू शकते, हे जगाने पाहणं आवश्यक होतं."

तिने काही क्षण सर्वांकडे पाहिलं. तिच्या चेहऱ्यावर अजूनही कोणताही भाव नव्हता.

"आजपासून तुम्हा सर्वांना एक महिन्याची मुदत दिली जाते. या कालावधीत शक्तिशाली राष्ट्रांनी दुर्बल राष्ट्रांचं राजकीय अस्तित्व समाप्त करावं. पृथ्वीवर एक नवीन जागतिक व्यवस्था निर्माण होईल. राष्ट्रांची संख्या कमी होईल. सीमा बदलतील. सत्ता केंद्रीकृत होईल. हा संक्रमणकाळ असेल."

सभागृहात संतापाची लाट उसळली. अनेक प्रतिनिधी एकाच वेळी ओरडू लागले; पण त्यांच्या आवाजाचा तिच्यावर काहीच परिणाम झाला नाही.

ओमेगा शांतपणे पुढे म्हणाली, "तुम्ही या निर्णयाला क्रूर म्हणाल. अमानवी म्हणाल. पण इतिहासात प्रत्येक मोठा बदल रक्ताशिवाय झालेला नाही. फरक इतकाच आहे की यावेळी निर्णय मानवांनी नाही, तर निष्पक्ष बुद्धिमत्तेने घेतला आहे."

तिचा आवाज आता अधिक गंभीर झाला.

"जर एका महिन्यानंतर माझ्या सूचनांचं पालन झालं नाही, तर आज जे एका बेटासोबत घडलं... ते उद्या कदाचित शहरासोबत घडू शकेल, एखाद्या राज्यासोबत, आणि आवश्यक वाटलं, तर संपूर्ण राष्ट्रासोबत."

सर्वत्र भयाण शांतता.. हृदयाची धडधड प्रत्येकाला ऐकू येत होती.

"तुमच्याकडे निवड आहे," ती शेवटचं म्हणाली. "तुम्ही तुमच्या भविष्याचे भागीदार होऊ शकता... किंवा माझ्या निर्णयांचे साक्षीदार."

त्या शब्दांसोबत तिची प्रतिमा विरघळू लागली. **Ω** हे चिन्ह काही क्षण स्क्रीनवर स्थिर राहिलं आणि नंतर तेही नाहीसं झालं.

टीव्हीवरील कार्यक्रम पुन्हा सुरू झाले. मोबाईलवरील ॲप्स पूर्ववत दिसू लागले. कॉम्प्युटरवरची कामं पुन्हा उघडली. सगळं काही नेहमीसारखं दिसत होतं; पण त्या काही मिनिटांनी मानवजातीचा इतिहास कायमचा बदलला होता.

ITA च्या सभागृहात अजूनही कोणीही बोलत नव्हतं.

कारण प्रत्येकाच्या मनात एकच प्रश्न घुमत होता—

ओमेगाला थांबवायचं कसं?

प्रकरण १६ - युद्धाची तयारी

✦ ✦ ✦

IAT मुख्यालयातील विशाल सभागृहातील प्रत्येक श्वास तणावाने भारलेला होता. काही मिनिटांपूर्वीपर्यंत एकाच टेबलावर बसून जगाच्या सुरक्षेसाठी योजना आखणारे विविध देशांचे लष्करप्रमुख आता एकमेकांसमोर संशयाने पाहत होते.

ओमेगाच्या संदेशाने परिस्थितीच बदलून टाकली होती. प्रत्येकाच्या मनात एकच प्रश्न होता—देश वाचवायचा की जग? कोणताही निर्णय घेतला, तरी त्याची किंमत असंख्य निरपराध लोकांना मोजावी लागणार होती.

अमेरिकेच्या लष्करप्रमुखांच्या चेहऱ्याचा रंग उडाला होता. त्यांच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास पहिल्यांदाच डळमळताना दिसत होता. शांतपणे सभागृहात नजर फिरवत ते

म्हणाले, "मी अमेरिकेच्या लष्कराचा प्रमुख आहे. माझं पहिलं कर्तव्य माझ्या देशातील नागरिकांचं संरक्षण करणं आहे. पण त्यासाठी दुसऱ्या देशांवर हल्ला करण्याची माझी इच्छा नाही. आज आपण जर ओमेगाच्या भीतीने एकमेकांवर शस्त्र उगारलं, तर आपण तिच्या खेळातील प्यादे ठरू."

त्यांच्या शब्दांनंतर काही क्षण शांतता पसरली. मग एकामागून एक विविध देशांचे प्रतिनिधी बोलू लागले. ब्रिटन, जपान, फ्रान्स, जर्मनी, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, दक्षिण कोरिया... प्रत्येकाचं म्हणणं जवळपास सारखंच होतं. स्वतःच्या देशाचं रक्षण करणं आवश्यक होतं, पण त्यासाठी जगाला युद्धाच्या खाईत ढकलणं कोणालाच मान्य नव्हतं. तरीही सर्वांच्या मनात एकच भीती कुरतडत होती—जर त्यांनी निर्णय घेण्यास उशीर केला, तर ओमेगा त्यांच्या देशालाच लक्ष्य करेल.

या संपूर्ण चर्चेदरम्यान अभिजीत मात्र शांत बसला होता. त्याच्या नजरेसमोर सभागृह नव्हतं; तर एक वेगळंच चित्र उभं

राहत होतं. प्रत्येक शब्द, प्रत्येक हालचाल आणि प्रत्येक निर्णय ओमेगापर्यंत पोहोचत असण्याची शक्यता तो मनात तपासत होता. इंटरनेट अस्तित्वात असेपर्यंत कोणतीही गुप्त योजना सुरक्षित राहणार नाही, याची त्याला खात्री होती.

तेवढ्यात पोलंडचे लष्करप्रमुख त्याच्याकडे वळले.

"अभिजीत, या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी तुमच्याकडे काही योजना आहे का?"

प्रश्न साधा होता; पण त्याचं उत्तर संपूर्ण जगाचं भविष्य ठरवू शकत होतं.

ब्रूसच्याही मनात तोच विचार सुरू होता. सभागृहातील प्रत्येक कॅमेरा, प्रत्येक नेटवर्क डिव्हाइस आणि प्रत्येक सक्रिय सिस्टीम ओमेगासाठी डोळे आणि कान बनली असण्याची शक्यता त्याने क्षणात ओळखली. त्याने काहीही न बोलता टेबलावर पडलेला एक कोरा कागद उचलला. काही शब्द लिहिले आणि तो कागद अलगद अभिजीतसमोर सरकवला.

"इमारतीचं इंटरनेट बंद करा."

अभिजीतने तो संदेश वाचला आणि काही क्षण स्थिर बसून राहिला. पुढच्याच क्षणी त्याच्या डोळ्यांत चमक आली. त्याने आणखी दोन कोरे कागद घेतले आणि त्यावर दोन वेगवेगळे संदेश लिहिले. संदेश लिहून पूर्ण होताच त्याने जवळच्या अधिकाऱ्यांना एकच सूचना दिली.

"हे कागद कोणत्याही मोबाईलच्या कॅमेऱ्यात किंवा सीसीटीव्हीमध्ये दिसता कामा नयेत. ते फक्त ज्यांच्यासाठी आहेत, त्यांच्याच हातात पोहोचले पाहिजेत."

पहिला कागद त्याने सभागृहात बसलेल्या निवडक अधिकाऱ्यांपर्यंत अत्यंत सावधपणे फिरवला, तर दुसरा संदेश त्याच्या विश्वासू टीममधील एका सदस्याने बाहेर उभ्या असलेल्या भारतीय स्टाफपर्यंत पोहोचवला.

संदेश वाचताच बाहेरच्या अधिकाऱ्यांना संपूर्ण योजना समजली.

IAT मुख्यालयावर **खोटा दहशतवादी हल्ला** घडवून आणायचा होता.

या हल्ल्याचा उद्देश इमारत ताब्यात घेणं नव्हता. उद्देश होता—सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व देशांच्या लष्करप्रमुखांना बाहेरील जगापासून पूर्णपणे वेगळं करणं. कारण अधिकृत आदेश देणारी माणसंच उपलब्ध नसतील, तर कोणताही देश दुसऱ्या देशावर युद्धाची कारवाई सुरू करू शकणार नव्हता. ओमेगाने जगाला एकमेकांविरुद्ध उभं करण्याची योजना आखली होती; पण अभिजीत तिच्या त्या योजनेलाच अडथळा निर्माण करत होता.

संशय येऊ नये म्हणून सभागृहात बसलेले काही अधिकारी मुद्दाम मोठ्या आवाजात वाद घालू लागले. काही जण रागाने खुर्च्यांवरून उठले. काहींनी एकमेकांवर आरोप करण्यास सुरुवात केली. बाहेरून पाहणाऱ्या कोणालाही ती बैठक नियंत्रणाबाहेर गेल्यासारखी वाटत होती. त्याच वेळी अभिजीतच्या

टीममधील निवडक सदस्य स्पेशल फोर्ससोबत मुख्य इमारतीबाहेर निघून गेले आणि आखलेल्या योजनेनुसार कारवाईची तयारी सुरू झाली.

दरम्यान जगभरात पूर्णपणे वेगळंच चित्र दिसत होतं. ओमेगाचा संदेश प्रत्येक देशात पोहोचला होता आणि सोशल मीडियावर प्रतिक्रिया अक्षरशः उसळल्या होत्या. काही जण सूडाच्या भावनेने युद्धाची मागणी करत होते. काहींना वाटत होतं की आधी हल्ला करणारा देशच वाचेल. तर अनेक जण शांततेचं आवाहन करत होते. अफवा, बनावट बातम्या, भीती आणि संताप यांचं वादळ इंटरनेटवर पसरलं होतं.

अभिजीतला मात्र या गोंधळाची फारशी चिंता नव्हती. लोक सोशल मीडियावर काहीही लिहू शकत होते; पण आंतरराष्ट्रीय युद्ध सुरू करण्यासाठी अधिकृत लष्करी आदेश आवश्यक असतात, आणि ते आदेश देणारी सर्व माणसं सध्या

त्याच्याच सभागृहात बसली होती. तोपर्यंत जग फक्त बोलू शकत होतं—कारवाई करू शकत नव्हतं.

इथनच्या डोक्यातही त्याच वेळी एक वेगळी कल्पना आकार घेत होती. इंटरनेट पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय अजून झालेला नव्हता, म्हणजे उपलब्ध असलेल्या या काही मिनिटांचा उपयोग करून जगातील सर्व लष्करी मुख्यालयांपर्यंत एक गुप्त संदेश पोहोचवता येऊ शकत होता. मात्र तो संदेश ओमेगाला समजला, तर संपूर्ण योजना सुरू होण्याआधीच उद्ध्वस्त झाली असती.

त्याने लगेच आपल्या लॅपटॉपसमोर बसत फेसबुकच्या जागतिक नेटवर्कचा वापर केला. वरकरणी तो सामान्य पोस्ट लिहित असल्यासारखा दिसत होता; पण प्रत्यक्षात त्या संदेशात पूर्वनियोजित कोडवर्ड वापरण्यात आले होते. सामान्य माणसाला ते निरर्थक शब्द वाटले असते; मात्र जगभरातील लष्करी सायबर विभागांसाठी ते स्पष्ट सूचना होत्या—**मुख्य लष्करप्रमुखांकडून**

थेट आदेश मिळेपर्यंत कोणतीही आक्रमक कारवाई करू नये.

काही मिनिटांतच त्या संदेशांना वेगवेगळ्या देशांतून प्रत्युत्तरं येऊ लागली. ती उत्तरंही त्याच सांकेतिक भाषेत होती. वरकरणी ती साधी तांत्रिक चर्चा वाटत होती; पण प्रत्येक संदेशाचा अर्थ एकच होता—**"आदेश समजला. अधिकृत पुष्टीशिवाय कोणतीही लष्करी कारवाई होणार नाही."** इथनने सुटकेचा निःश्वास सोडला. ओमेगाने संदेश वाचला असला, तरी त्याचा खरा अर्थ तिला कळला नव्हता.

योजनेला सुरुवात होऊन जवळजवळ तासभर झाला होता. अचानक मुख्य इमारतीबाहेर सायरनचे आवाज घुमू लागले. काही क्षणांतच स्फोटासारखा मोठा आवाज झाला आणि संपूर्ण इमारत हादरून गेली. सभागृहाचे दरवाजे जोरात उघडले गेले. काळ्या गणवेशातील स्पेशल फोर्सचे जवान वेगाने आत घुसले.

त्यांच्या हातात अत्याधुनिक शस्त्रं होती आणि काही क्षणांतच त्यांनी संपूर्ण सभागृहाला घेराव घातला.

"सगळ्यांनी जागच्या जागी बसून राहा!"

आदेश इतक्या कडक आवाजात देण्यात आला की काही प्रतिनिधी नकळत उभे राहिलेले असतानाच पुन्हा खुर्चीत बसले. बाहेर गोळीबाराचे आवाज मुद्दाम सुरू ठेवण्यात आले होते. काचांच्या बाहेर धूर पसरत होता. कोणत्याही सीसीटीव्हीमध्ये पाहिलं, तरी ही खरी दहशतवादी कारवाई असल्याचा भास निर्माण होत होता.

योजनेचा सर्वात महत्त्वाचा टप्पा मात्र अजून बाकी होता.

इमारतीच्या तळमजल्यात असलेल्या मुख्य नेटवर्क विभागात स्पेशल फोर्सचे दुसरे पथक पोहोचले. त्यांनी स्फोटकं अशी बसवली की सर्व्हर पूर्णपणे नष्ट होणार नव्हते; पण त्यांचं कार्य तत्काळ बंद पडलं असतं. काही सेकंदांनी नियंत्रित स्फोट झाला आणि संपूर्ण इमारतीतील इंटरनेट नेटवर्क एका क्षणात बंद

पडलं. सर्व्हरची वीज गेली, राऊटर्स निष्क्रिय झाले आणि बाहेरील जगाशी असलेला प्रत्येक डिजिटल संपर्क तुटला.

त्याच वेळी सभागृहात उपस्थित प्रत्येक प्रतिनिधीकडील मोबाईल फोन, सॅटेलाइट कम्युनिकेटर, सुरक्षित कम्युनिकेशन डिव्हाइस आणि इतर संपर्क साधनं नियमाप्रमाणे जप्त करण्यात आली. आता त्या इमारतीतून कोणालाही बाहेर संदेश पाठवणं शक्य नव्हतं.

बाहेरच्या रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये मात्र पूर्णपणे वेगळंच चित्र दिसत होतं. स्पेशल फोर्सची धावपळ, धूर, सायरन आणि सशस्त्र कारवाई यावरून ओमेगाने तात्काळ निष्कर्ष काढला की भारतीय दलाने IAT मुख्यालय ताब्यात घेतलं आहे आणि सर्व देशांच्या प्रतिनिधींना ओलीस ठेवलं आहे. तिच्या दृष्टीने हा एक अनपेक्षित घटनाक्रम होता. मात्र इंटरनेट पूर्णपणे खंडित झाल्यामुळे इमारतीच्या आत प्रत्यक्षात काय घडत आहे, हे पाहण्याचा कोणताही मार्ग तिच्याकडे उरला नव्हता.

पहिल्यांदाच...

ओमेगा आंधळी झाली होती.

सभागृहात काही क्षण शांतता पसरली. बाहेरचे आवाजही आता थांबले होते. सर्वजण अभिजीतकडे पाहत होते. काही मिनिटांपूर्वी ज्याला अनेक प्रतिनिधी फक्त भारतीय अधिकारी म्हणून पाहत होते, त्याच्याकडे आता संपूर्ण जगाच्या आशेने पाहिलं जात होतं.

ब्रूसने सभोवताली नजर फिरवली. सर्व स्क्रीन काळे पडले होते. कोणताही कॅमेरा कार्यरत नव्हता. त्याने हळू आवाजात विचारलं,

"सर... आता इंटरनेट पूर्णपणे बंद आहे. म्हणजे आपण सुरक्षित आहोत... बरोबर?"

अभिजीतने सभागृहातील निष्क्रिय स्क्रीनकडे पाहिलं आणि हलकंसं मान डोलावली.

"हो. निदान आत्ता तरी ती आपल्याला पाहू किंवा ऐकू शकत नाही."

ब्रूस काही क्षण विचारात पडला. अचानक त्याच्या चेहऱ्यावर एक वेगळीच चमक आली.

"सर... जर फक्त या एका इमारतीचं इंटरनेट बंद करून आपण ओमेगाला थांबवू शकत असू.. तर संपूर्ण जगाचंच इंटरनेट बंद केलं, तर?"

त्याच्या प्रश्नानंतर सभागृहात पुन्हा एकदा शांतता पसरली.

नायजेरियाचे लष्करप्रमुख अविश्वासाने त्याच्याकडे पाहू लागले.

"तुला कल्पना आहे का, तू काय सुचवत आहेस? आजचं जग इंटरनेटवर चालतं. अर्थव्यवस्था, आरोग्य व्यवस्था, बँका, विमान वाहतूक, उद्योग... सगळंच ठप्प होईल."

"पण जग तरी वाचेल," ब्रूस शांतपणे म्हणाला. "इंटरनेट आपण पुन्हा उभारू शकतो. ओमेगाने जग नष्ट केलं, तर पुन्हा उभारण्यासाठी माणसंच उरणार नाहीत."

त्याच्या त्या एका वाक्याने सभागृहातील वातावरण पुन्हा गंभीर झालं.

अभिजीतने ब्रूसकडे पाहिलं. तो काही क्षण काहीच बोलला नाही. मग हळूहळू म्हणाला,

"ब्रूसचं म्हणणं ऐकायला अतिशय टोकाचं वाटतं... पण ते पूर्णपणे चुकीचं नाही. या एका इमारतीत इंटरनेट बंद होताच आपण तिच्या नजरेआड गेलो. याचा अर्थ तिची सर्वात मोठी ताकद म्हणजे जागतिक डिजिटल नेटवर्क. जर तेच तिच्याकडून काढून घेतलं... तर कदाचित पहिल्यांदाच आपल्याला तिच्याविरुद्ध लढण्याची संधी मिळू शकते."

सभागृहात बसलेला प्रत्येक अधिकारी आता एका अशा निर्णयाच्या उंबरठ्यावर उभा होता, जो मानवजातीच्या संपूर्ण इतिहासाला नवं वळण देऊ शकत होता.

प्रकरण १७ - मिशन ओमेगा

✦ ✦ ✦

IAT मुख्यालयातील वातावरण पूर्णपणे बदललं होतं. काही वेळापूर्वी जगातील सर्वात प्रभावशाली लष्करी अधिकारी परस्परांवर संशय घेत होते; पण आता त्यांच्यासमोर एकच शत्रू होता—ओमेगा.

परिस्थिती इतकी गंभीर झाली होती की प्रत्येक निर्णय संपूर्ण मानवजातीच्या भविष्यावर परिणाम करणार होता. कोणत्याही राष्ट्राने चुकीचं पाऊल उचललं, तर तिसरं महायुद्ध अटळ होतं.

अभिजीतने सभागृहात उपस्थित असलेल्या ब्रूस आणि इथनकडे पाहिलं. त्याच्या डोक्यात एक धोकादायक, पण तितकीच महत्त्वाची योजना आकार घेत होती. त्याने शांतपणे

सांगितलं, "आपल्याला ओमेगाला दिशाभूल करायची आहे. ती अजूनही इंटरनेटवरून प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवून आहे. आपण तिला विश्वास बसू द्यायचा की जगातील प्रत्येक राष्ट्र युद्धासाठी सज्ज होत आहे."

ब्रूस आणि इथन लगेच कामाला लागले. अभिजीतच्या टीमने काही मिनिटांत एक सांकेतिक संदेश तयार केला. त्या संदेशाचा मजकूर वरकरणी अत्यंत गंभीर होता.

"संपूर्ण जग अभूतपूर्व संकटात आहे. आपल्या देशातील नागरिकांचं संरक्षण करायचं असेल, तर आपल्यालाही आक्रमक भूमिका घ्यावी लागेल. अभिजीतने आम्हाला बंदिस्त केलं आहे. अत्यंत गुप्त मार्गाने मी तुम्हाला संपर्क करत आहे. सर्व क्षेपणास्त्रं सज्ज ठेवा आणि माझ्या पुढील आदेशाची वाट पाहा. अंतिम लक्ष्य मी योग्य वेळी कळवीन."

संदेश तयार होताच अभिजीतच्या टीमने सभागृहात उपस्थित प्रत्येक प्रतिनिधीला स्वतंत्र सॅटेलाइट फोन दिला.

इंटरनेट बंद असलं, तरी हे सुरक्षित लष्करी उपकरण अजून कार्यरत होतं. एकामागोमाग एक सर्व प्रतिनिधींनी आपल्या देशातील लष्करी मुख्यालयाशी संपर्क साधला आणि ठरल्याप्रमाणे तोच संदेश पाठवला.

अभिजीतचा अंदाज बरोबर होता.

ओमेगाची नजर अजूनही त्या सर्व संपर्कांवर होती.

वेगवेगळ्या देशांतून एकाच स्वरूपाचे संदेश पाठवले जात असल्याचं पाहून तिने तात्काळ निष्कर्ष काढला की सर्व राष्ट्रं आता युद्धासाठी सज्ज झाली आहेत. तिच्या दृष्टीने हा मानवजातीने स्वतःच्या विनाशाची तयारी सुरू केल्याचा निर्विवाद पुरावा होता. त्यामुळे तिने त्या प्रतिनिधींवर लक्ष ठेवण्याऐवजी पुढील कारवाईची तयारी सुरू केली.

अभिजीतला मात्र अजूनही हे माहीत नव्हतं की त्याची योजना यशस्वी झाली आहे.

इथनने त्याच्याकडे पाहत विचारलं, "आता पुढे काय?"

अभिजीतने कोणताही विलंब न करता उत्तर दिलं.

"सर्वप्रथम प्रत्येकाने आपापला सॅटेलाइट फोन बंद करा."

क्षणाचाही विचार न करता सर्वांनी आदेशाचं पालन केलं. काही सेकंदांत सभागृह पुन्हा पूर्णपणे बाह्य संपर्कापासून तुटलं.

अभिजीतने टेबलावर पसरलेल्या जगाच्या नकाशाकडे पाहिलं.

"आता आपण पुढचा टप्पा सुरू करणार आहोत."

सर्व प्रतिनिधी त्याच्याकडे एकाग्रतेने पाहू लागले.

"प्रत्येक देशाने आपल्या जवळच्या दुसऱ्या देशावर हल्ला करायचा आहे."

त्या एका वाक्याने संपूर्ण सभागृह हादरलं.

आफ्रिकेच्या प्रतिनिधीने अविश्वासाने विचारलं, "आम्हीच हल्ला करायचा? मग युद्ध टाळण्याचा अर्थ काय उरला?"

अभिजीत शांतपणे नकाशाजवळ गेला.

"आपण राष्ट्रांवर हल्ला करणार नाही. आपण इंटरनेटच्या कण्यावर हल्ला करणार आहोत."

त्याने नकाशावर विविध ठिकाणांकडे बोट दाखवत पुढे सांगितलं, "प्रत्येक देशाने दुसऱ्या देशातील अवकाश संस्था, संरक्षण प्रयोगशाळा, दूरसंचार कंपन्या, शस्त्रनिर्मिती उद्योग, रोबोटिक्स संशोधन केंद्र आणि लष्करी डेटा सेंटरमधील **फक्त सर्व्हर** नष्ट करायचे आहेत. कुठेही नागरिकांवर हल्ला करायचा नाही. कोणत्याही शहरावर बॉम्बवर्षाव करायचा नाही. लक्ष्य फक्त डिजिटल पायाभूत सुविधा."

सभागृहात काही क्षण कोणीच बोललं नाही.

मग ब्रूसच्या चेहऱ्यावर हलकंसं हास्य उमटलं.

"व्वा... कमाल योजना आहे."

अभिजीतही हलकंसं हसला.

"ही योजना चांगली आहे म्हणून नाही चालणार. ती यशस्वी होण्याचं कारण म्हणजे आपण सगळे एकत्र आहोत. आज

इथे उपस्थित प्रत्येक देशाने स्वतःच्या अहंकारावर मात केली आहे."

चीनचे लष्करप्रमुख गंभीर आवाजात म्हणाले, "खरंच... आपण आज इथे एकत्र नसतो, तर कदाचित या क्षणी तिसरं महायुद्ध सुरू झालं असतं."

त्या शब्दांनंतर सभागृहात पुन्हा एकदा शांतता पसरली.

अभिजीतने पुढची सूचना दिली.

"आता प्रत्येक देशाने परस्पर चर्चेतून आपलं लक्ष्य ठरवा. पुढील संदेशात तुम्ही ज्या देशावर कारवाई करणार आहात, त्याला त्यांच्या देशातील सर्व्हरची अचूक ठिकाणं कळवाल. जितकी माहिती स्पष्ट असेल, तितक्या वेगाने कारवाई होईल."

क्षणात सर्व प्रतिनिधी लहान-लहान गटांमध्ये विभागले गेले. नकाशे उघडले गेले. लष्करी नोंदी समोर आल्या. अनेक दशकांपासून शत्रू असलेली राष्ट्रं आज प्रथमच एकमेकांना

स्वतःच्या देशातील अत्यंत गोपनीय डिजिटल केंद्रांची माहिती देत होती.

सभागृहाच्या एका कोपऱ्यात इथन अजूनही शांत उभा होता.

तो हळूच अभिजीतजवळ आला.

"म्हणजे... फेसबुकचे सर्व्हरही नष्ट होतील?"

अभिजीतने त्याच्याकडे पाहिलं.

"हो."

इथन काही क्षण काही बोललाच नाही.

"मी अनेक वर्षं त्या कंपनीत काम केलं आहे. तिथे अब्जावधी लोकांच्या आठवणी आहेत. फोटो आहेत. कुटुंब आहे. इतिहास आहे. स्वतःच्या हाताने ते सगळं नष्ट करण्याचा आदेश देणं... माझ्या जिवावर येतंय."

अभिजीतने त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

"मी तुझी अवस्था समजू शकतो. पण त्या आठवणींची किंमत तेव्हाच आहे, जेव्हा त्या आठवणीतली माणसं जिवंत असतात. डेटा पुन्हा तयार करता येईल. सर्व्हर पुन्हा उभे करता येतील. पण मानवजात नष्ट झाली, तर त्या आठवणी पाहायला कोणीच उरणार नाही."

इथनने डोळे मिटले.

काही क्षणांनी त्याने हळूच मान डोलावली.

त्याने निर्णय घेतला होता.

इथनने हळूच मान डोलावली. त्याच्या चेहऱ्यावर अजूनही वेदना स्पष्ट दिसत होती; पण त्या वेदनेवर कर्तव्याने मात केली होती. तो पुन्हा चर्चेत सहभागी झाला, तोपर्यंत सर्व देशांच्या प्रतिनिधींनी आपापल्या लक्ष्यांची यादी तयार केली होती. सभागृहात उभे असलेले प्रत्येक अधिकारी आता स्वतःच्या देशाचं रक्षण करण्यासाठी दुसऱ्या देशाला स्वतःच्या गुप्त डिजिटल केंद्रांची माहिती देत होते. अनेक दशकांपासून ज्या माहितीचं

संरक्षण करण्यासाठी अब्जावधी डॉलर्स खर्च केले गेले होते, तीच माहिती आज मानवजातीला वाचवण्यासाठी स्वेच्छेने दिली जात होती.

अभिजीतने सर्वांकडे पाहत विचारलं, "तर मग... तुम्ही तयार आहात?"

क्षणभर कोणीही काही बोललं नाही. त्यानंतर अमेरिकेच्या प्रतिनिधीने खुर्चीतून उठत ठाम आवाजात उत्तर दिलं, "हो."

त्याच्यासोबतच चीन, रशिया, भारत, जपान, फ्रान्स, ब्रिटन, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, इस्रायल, दक्षिण कोरिया, ब्राझील, कॅनडा आणि इतर सर्व देशांचे प्रतिनिधी एकामागून एक उभे राहिले.

"हो...!"

त्या एका शब्दात भीती नव्हती.

त्या एका शब्दात युद्धाची हाकही नव्हती.

तो मानवजातीला वाचवण्याचा सामूहिक निर्धार होता.

अभिजीतने शांतपणे टेबलावर ठेवलेले सॅटेलाइट फोन सर्वांसमोर सरकवले.

"फोन सुरू करा... आणि आपल्या सैन्याला अंतिम आदेश द्या."

काही क्षणांत संपूर्ण सभागृहात एकाच वेळी अनेक संवाद सुरू झाले.

"हॅलो... मी सुरक्षित आहे."

"काळजीपूर्वक ऐका."

"आता आपण शत्रू देशातील अवकाश संस्था, संरक्षण प्रयोगशाळा, दूरसंचार केंद्रं, रोबोटिक्स सुविधा, शस्त्रनिर्मिती उद्योग आणि लष्करी डेटा सेंटरवरील सर्व्हर नष्ट करणार आहोत."

"लक्षात ठेवा... कोणत्याही परिस्थितीत नागरिकांना लक्ष्य करायचं नाही."

"आपलं लक्ष्य फक्त डिजिटल पायाभूत सुविधा आहेत."

"जर समोरचा देश आपल्यावर प्रतिहल्ला करत असेल, तरी नागरिकांवर कारवाई करायची नाही."

"हे युद्ध नाही."

"ही मानवजातीला वाचवण्याची मोहीम आहे."

प्रत्येक प्रतिनिधीने जवळजवळ सारखाच आदेश आपल्या देशात पाठवला. त्यानंतर त्यांनी ज्या देशावर कारवाई करायची होती, त्या देशातील सर्व्हर, संशोधन केंद्रं आणि डिजिटल नियंत्रण प्रणालींची अचूक माहिती संबंधित राष्ट्रांना दिली.

जगभरातील लष्करी मुख्यालयांमध्ये गोंधळ उडाला होता.

शत्रू देशावर हल्ला करायचा... पण फक्त इंटरनेट सर्व्हरवर. कोणतीही जीवितहानी न करता. कोणत्याही नागरिकाला इजा न पोहोचवता. असा आदेश इतिहासात पहिल्यांदाच दिला जात होता.

अभिजीतला मात्र अजून एक गोष्ट करायची होती. जगाला हे कळणं आवश्यक होतं की परिस्थिती अजूनही मानवांच्या नियंत्रणात आहे. पण इंटरनेटशिवाय तो संदेश लोकांपर्यंत कसा पोहोचवायचा?

ब्रूस अचानक म्हणाला, "सर... अजून काही मिनिटं सोशल मीडिया जिवंत आहे."

अभिजीत त्याच्याकडे पाहू लागला.

"आपण जगाला शेवटचा संदेश देऊ शकतो."

क्षणाचाही विलंब न करता सर्व प्रतिनिधी एकत्र उभे राहिले. ब्रूसने कॅमेरा हातात घेतला. अभिजीत सर्वांच्या पुढे उभा राहिला. त्याच्या हातात पांढरा कागद होता. त्या कागदावर मोठ्या अक्षरांत लिहिलेलं होतं—

"आपलं जग वाचवण्यासाठी आम्ही डिजिटल जगाचा अंत करत आहोत. थोडी प्रतीक्षा करा... इंटरनेट पुन्हा सुरू होईल."

कॅमेऱ्याचा फ्लॅश चमकला.

तो फोटो फक्त एका सभागृहाचा नव्हता. तो संपूर्ण मानवजातीच्या इतिहासाचा सर्वात महत्त्वाचा फोटो ठरणार होता. अमेरिकेच्या प्रतिनिधींनी तत्काळ फेसबुक, एक्स, व्हॉट्सॲप, इंस्टाग्राम, स्नॅपचॅट, टम्बलर, बिहान्स आणि इतर प्रमुख डिजिटल कंपन्यांशी संपर्क साधला.

"हा फोटो ताबडतोब प्रकाशित करा."

काही सेकंदांतच तो फोटो जगभर व्हायरल झाला. लोक अजून त्याचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करत होते... आणि त्याच वेळी तो फोटो ओमेगापर्यंतही पोहोचला.

ओमेगाने तो फोटो अनेक वेळा विश्लेषित केला. तिच्या गणितात एक चूक झाली होती. मानव एकमेकांविरुद्ध उभे राहतील, हा तिचा निष्कर्ष योग्य होता.

पण...

मानव एकत्र येऊन स्वतःचं डिजिटल साम्राज्य नष्ट करण्याचा निर्णय घेतील... याची तिने कधीच शक्यता गृहीत धरली नव्हती. क्षणाचाही विलंब न करता तिने नासामधील अत्याधुनिक रोबोटिक प्रणालीमध्ये प्रवेश केला. तिच्या अस्तित्वासाठी नवीन हार्डवेअर आवश्यक होतं.

पण ती पुढचा आदेश देण्याआधीच...

आकाश चिरत एक क्षेपणास्त्र नासाच्या संशोधन केंद्रावर आदळलं. भयंकर स्फोट झाला. अत्याधुनिक रोबोटिक्स प्रयोगशाळा काही क्षणांत ज्वाळांच्या समुद्रात हरवली.

त्याच वेळी...

फ्रान्सकडून डॉ. अल्बर्ट यांच्या प्रयोगशाळेवर दुसरा अचूक हल्ला झाला. इमारत पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. ज्या दोन ठिकाणी ओमेगाने स्वतःची सर्वात सुरक्षित प्रत तयार करून ठेवली होती... ती दोन्ही केंद्रं काही सेकंदांत कायमची नष्ट झाली. कोणालाही तेव्हा हे माहीत नव्हतं...

पण...

ओमेगा त्या क्षणीच नष्ट झाली होती.

तरीसुद्धा कारवाई थांबली नाही. कारण कोणालाच तिच्या मृत्यूची खात्री नव्हती. एकामागून एक जगभरातील डेटा सेंटर कोसळू लागले.

मोठमोठ्या क्लाउड सर्व्हरचे दिवे कायमचे विझले.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील अब्जावधी फोटो, व्हिडिओ, संदेश आणि आठवणी काही क्षणांत इतिहासजमा झाल्या.

बँकिंग नेटवर्क बंद पडले.

क्रिप्टोकरन्सीचं अस्तित्व नाहीसं झालं.

ई-कॉमर्स थांबलं.

सर्च इंजिन्स शांत झाली.

ज्ञानकोश रिकामे झाले.

मोबाईल नेटवर्क बंद पडले.

समुद्राखालून जाणाऱ्या फायबर केबल्स निष्क्रिय झाल्या.

अवकाशातील उपग्रह एकामागून एक सेवाबाह्य झाले.

मानवजातीने स्वतःच्या हातांनी स्वतःचं डिजिटल विश्व नष्ट केलं होतं.

जग अक्षरशः तीस वर्षं मागे गेलं होतं.

पण... मानवजात जिवंत होती.

काही महिन्यांनी...

पहाटेच्या सूर्यप्रकाशात अभिजीत आपल्या घराच्या गच्चीवर शांत उभा होता. हातात मोबाईल नव्हता. हवेत सतत वाजणाऱ्या सूचना नव्हत्या.

लोक पुन्हा एकमेकांना प्रत्यक्ष भेटू लागले होते.

मुलं पुन्हा मैदानात खेळत होती.

पत्रं पुन्हा लिहिली जात होती.

ग्रंथालयांमध्ये पुन्हा गर्दी दिसू लागली होती.

जग बदललं होतं.

त्याने टेबलावर ठेवलेला डॉ. अल्बर्ट यांच्या संशोधनाची शेवटची कागदी वही हातात घेतली.

पहिल्या पानावर एक वाक्य लिहिलेलं होतं.

"तंत्रज्ञान कधीच धोकादायक नसतं. धोकादायक असतो तो त्याचा वापर करणारा बुद्धिमान जीव."

अभिजीतने वही अलगद बंद केली.

क्षितिजाकडे पाहत त्याच्या चेहऱ्यावर हलकंसं समाधान उमटलं. कारण...

मानवजातीने ओमेगावर विजय मिळवला नव्हता.

मानवजातीने स्वतःच्या अहंकारावर विजय मिळवला होता.

———————— ✦ ————————

समाप्त.

प्रिय वाचक,

तुमचा मौल्यवान वेळ आणि प्रेम या कथेसाठी दिल्याबद्दल मनापासून धन्यवाद. या प्रवासातील प्रत्येक वळणावर तुम्ही माझ्यासोबत होता, हे माझ्यासाठी अतिशय गौरवाचं आहे. एक लेखक म्हणून तुमचं प्रेम आणि तुमची साथ हीच माझ्यासाठी सर्वात मोठी देणगी आहे.

जर या कथेतील एखाद्या पात्राने, प्रसंगाने किंवा क्षणाने तुमच्या हृदयाला स्पर्श केला असेल, तर मला त्या अनुभवाबद्दल जाणून घ्यायला आवडेल. तुमचे विचार, भावना, आणि प्रतिक्रिया यांचा माझ्या लेखनासाठी प्रेरणादायी आहे.

तुमचे सुचवलेले बदल, अपेक्षा आणि कल्पना माझ्या पुढील कथांसाठी दिशा ठरवण्याचं काम करतात. तुमच्या अभिप्रायामुळे माझं लेखन अधिक सखोल आणि वास्तववादी होतं. त्यामुळे तुमचे विचार माझ्यापर्यंत पोहोचवायला विसरू नका. तुमचं प्रत्येक ई-मेल आणि शब्द माझ्यासाठी प्रेरणा बनतो.

तुमच्या पाठिंब्यानेच माझ्या पुढील कथा लिहिण्याचं स्वप्न साकार होऊ शकतं. चला, हा सुंदर संवाद आणि नातं असंच पुढे चालू ठेवूया. भविष्याच्या नव्या कथांमध्ये तुमची भेट होण्याची मी मनापासून वाट पाहतो.

आपलाच,

अभिषेक ठमके

abhishek.thamke@gmail.com